# माणूस

शनिवार । ३ मार्च १९७९ । ७५ पैसे


## ग्रामायन मेळावा

श्री. ग. मा.



गेल्या वर्षीच्या डिसेंबरात दिल्लीला चरणसिंगांनी किसानांचा भव्य मेळावा संघटित केला. त्यानंतर महाराष्ट्रातही ठिकठिकाणी लहानमोठे किसानमेळावे घेण्यात आले. यांपैकी बरेचसे मेळावे राजकीय असले तरी देशभर किसानांची शक्ती जागृत होत असल्याची ही पूर्वचिन्हे आहेत, यात शंका नाही. चरणसिंगांनी गोळा केलेले किसान छोटे होते की मोठे होते हा वादाचा विषय असला, तरी प्रथमच किसानांचा आवाज देशभर त्यांनी घुमवला हे मान्य केले पाहिजे. या जागृत होत असलेल्या किसानांचे प्रश्न काय आहेत, हे प्रश्न सध्याची अर्थव्यवस्था कायम ठेवून सोडवता येणे शक्य आहेत का, शक्य नसल्यास या किसानांपुढे कोणते भवितव्य वाढून ठेवलेले आहे वगैरे प्रश्नांची निर्विकार व राजकीय हितसंबंधांपासून अलिप्त अशी चर्चा करण्यासाठी 'ग्रामायन' या संस्थेने १८ फेब्रुवारीला मुंबईत एक छोटा मेळावा योजला होता. स्थळ दादरचे कीर्ती कॉलेज. मेळाव्यातील चर्चा केवळ पुस्तकी राहू नये, या दृष्टीने प्रत्यक्ष ग्रामीण भागात केलेल्या विकासकार्याच्या अनुभवावर आधारित अशी दोन टिपणे मेळाव्यापूर्वी उपस्थितांना विचारार्थ देण्यात आली होती. ही दोन टिपणे दोन दृष्टिकोन मांडणारी होती. पहिले टिपण मुलुंड कॉलेजचे प्राचार्य डॉ. भगवानराव बापट यांचे होते. मुलुंड कॉलेजचे विद्यार्थी, काही सर्वोदयी कार्यकर्ते, सीमेन्ससारखी एक बहुराष्ट्रीय कंपनी या सर्वांचा सहभाग असलेल्या ठाणे जिल्ह्यातील चरीव व आंदाड या आदिवासी गावातील विकासकार्याचा, म्हणजेच तेथील लहान व मध्यम शेतकऱ्यांच्या परिवर्तनाचा डॉ बापट यांचा अनुभव काय आहे? नवीन खते, जंतुनाशके, भांडवलपुरवठा, पाण्याची सोय इत्यादींमुळे शेतकऱ्यांचे 'उत्पादन' वाढले; पण 'उत्पन्न' कमी झाले असा डॉ. बापट यांचा दावा आहे. अर्थशास्त्रीय परिभाषेत याचे वर्णन त्यांनी 'Immiserizing growth—दारिद्र्यकारी विकास' असे केले. ते टिपणात व त्या आधारे केलेल्या भाषणात म्हणतात : "आपल्या साऱ्या नियोजनातच बाजारव्यवस्था हा कच्चा दुवा आहे शेतकऱ्यापुढे आणि त्यातल्या त्यात लहान शेतकऱ्यापुढे तो एक अनुल्लंघ्य पर्वत आहे. वाढीव उत्पादनाचा योजनाकारांना आनंद वाटला तरी लहान उत्पादक शेतकऱ्याला त्यामुळे भीती वाटू लागते." स्वयंसेवी संस्था, विधायक कार्यकर्ते यांनी आजवर लोकशिक्षणाद्वारे शेतकऱ्याला उत्पादनवाढीची प्रेरणा दिली, प्रत्यक्ष मदतही पोचवण्याचे कार्य केले, ते बऱ्याच प्रमाणात यशस्वीही ठरले, हे डॉ. बापट यांनी मान्य केले; परंतु यापुढे वाढलेल्या उत्पादनातून निर्माण होणाऱ्या बाजारभावांच्या समस्येला विधायक कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्था कसे काय तोंड देऊ शकतील, याबद्दल त्यांनी शंका व्यक्त केली. थोडक्यात चालू आर्थिक व्यवस्था गृहीत धरली तर लहान शेतकऱ्याला भवितव्य नाही असा डॉ. बापट यांचा दृष्टिकोन होता. उद्या स्वयंसेवी संस्थांनी या क्षेत्रात पदार्पण करायचे ठरविले, तरी त्यांना हे न झेपणारे काम आहे; पण त्यांनी प्रयत्न करून पहावा असेही डॉ. बापट आपल्या टिपणात म्हणतात. त्यामुळे त्याच्या प्रतिपादनात थोडी विसंगती डोकावते; पण मुद्दा स्पष्ट आहे. व्यवस्था बदलल्याशिवाय आजचा किसान—मध्यम व लहान शेतकरी जगू सुद्धा शकत नाही. दुपारच्या सत्रात आंदाड व चरीव या गावचे ग्रामस्थ बोलले. त्यांनी तर आमची सगळी शेती ताब्यात घ्या व पाच वर्षात कर्जे फेडून दाखवा असे आव्हानच दिले. ग्रामस्थांचे म्हणणे असे: गावात राहणाऱ्या १८ वर्षांवरील सर्वांना काम द्या. सचिवालयातील

मुखपृष्ठ २ वर

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे-अंक चाळीसावा

३ मार्च १९७९

मूल्य ७५ पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४५९

¤



....मुखपृष्ठ १ वरून


पट्टेवाल्याला मिळतो त्याच्या निदान निम्मा-पाऊण पगार द्या. रोज आठ तास काम करून घ्या. बोनस-पगारवाढ नको आणि मग ठरवा आजची किंमतधोरणे—व्याजधोरणे बरोबर की चूक ! या ग्रामस्थांचा अनुभव ध्यानात घेऊनच डॉ. बा॰ट पुढे असा निष्कर्ष काढतात की, या नाही त्या स्वरूपात आपल्याला सहकारी शेतीव्यवस्थेचा एकदा पुनर्विचार करायला हवा. पूर्वी चुका झाल्या असतील; पण लहान व मध्यम शेतकऱ्याला सध्याच्या कोंडीतून बाहेर पडायला दुसरा पर्याय तूर्त तरी उपलब्ध नाही.

## शिवतक्रारचा अनुभव

ग्रामीण भागात सहकाराचा पर्याय कुठल्याही स्वरूपात यशस्वी करायचा तर नव्या प्रेरणा, लोकशाहीची—समानतेची नवी मूल्ये तेथे रुजवणे आवश्यक आहे. केवळ नोकरशाहीवर विसंबून सहकारी संस्था निर्माण करण्याचा आजवर प्रयत्न झाला म्हणून तो अयशस्वी ठरला. अशी प्रेरणा, नव्या जीवनमूल्यांचे शिक्षण फक्त कार्यकर्ता किंवा स्वयंसेवी संस्था याद्वाराच लाभ शकते. म्हैसाळ येथील दलितांचा अवघड असा शेती सहकारी संस्थेचा प्रयत्न यशस्वी ठरतो आणि हजारो ठिकाणचे प्रयत्न फसतात याचे एकमेव कारण 'कार्यकर्ता' हे आहे. म्हैसाळला मधुकरराव देवलांसारखा समर्थ संघटक व निरपेक्ष मार्गदर्शक लाभला. बहुतेक ठिकाणी असे संघटक व मार्गदर्शक लाभत नाहीत म्हणून अपयश पदरी येते. 'ग्रामायन' चे अध्यक्ष प्रा. वसंत देशपांडे यांनी आपल्या भाषणात व टिपणात या मुद्द्यावर विशेष भर दिला. गेल्या सहा महिन्यांपासून पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील शिवतक्रार (म्हाळुंगी) या गावी ग्रामायनद्वारा एक विकास-प्रकल्प चालविला जात आहे एक बंद पडलेली पाणीपुरवठा योजना ग्रामायनच्या कार्यकर्त्यांनी सुरू केली व एक मोडून पडलेले गाव पुन्हा उभे राहू लागलेले आहे या ठिकाणचा अनुभव सांगून प्रा. देशपांडे म्हणाले : शिवतक्रारचा अनुभव लक्षात घेता असे दिसते की, तरुण गावकऱ्यांना बाहेरच्या कार्यकर्त्यांकडूनच जास्त प्रोत्साहन मिळू शकते. नवीन कल्पना आकर्षक वाटतात; पण धाडस नसते. म्हणून बाहेरचा कार्यकर्ता मिळाला तर त्याच्या मदतीने ते उभे राहू शकतात. लोकशाही,

समता, बंधुभाव या मूल्यांचे शिक्षण
कोठेही मिळत नाही. कार्यकर्त्यांकडून हे
गेले तर शिवतक्रारसारखी मोडून प
अनेक गावे पुन्हा उभी करता येतील.
शेतकऱ्याला गावात राहूनच आपला
तार्थ बऱ्यापैकी चालवता येईल.
यासाठी कर्जपुरवठा, बाजारभाव या
कडेही लक्ष पुरवायला हवे, हा डॉ.
यांनी मांडलेला मुद्दा महत्त्वाचा आहे
प्रा. देशपांडे यांनी आपल्या टिपणात आ
सांगितलेच आहे; पण व्यवस्था पूर्ण बद
सहकारी शेतीची कास धरली तरच
वर्तन व प्रगती शक्य आहे हा वाप
आग्रह व दृष्टिकोन देशपांडे यांनी नाक
चालू व्यवस्थेतही—काही बदल अ
घडवून, प्रगतीला खूप वाव आहे, त्य
विधायक कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्था
त्वाची भूमिका बजावू शकतील, असे
आग्रहपूर्वक प्रतिपादन होते. प्रश्न माण
त्यांच्या प्रवृत्ति—प्रेरणांचा आहे, व्यवस्थ
ठिकाणी आडवी येतेच असे नाही, हा
काल तसा लोकप्रिय नसलेला विचार
पण देशपांडे यांनी तो मांडला खरा.
तक्रार प्रयोगाचे यशापयश वर्षानंतर त
पाहिल्यावर या त्यांच्या विचारातील
सत्यता पडताळून पाहता येईल, हे उ
आहे.

शिवतक्रारवरून आणखीही एक
लढाई जुंपली. 'नॅशनल इन्स्टिटयूट
बँक मॅनेजमेंट' या संस्थेचे कार्यकर्ते श्री.
सावळे यांनी शिवतक्रारसारखे प्रयोग शे
मांजरांनी उंदरांचे संघटन करण्यास
ठरतात, बडे शेतकरी अशा प्रयोगातून अ
बडे होतात व खालचे लोक खालीच र
तात, अशा आशयाचे विधान आप
भाषणात केले. सावळे यांच्या या टी
शिवतक्रार येथील ग्रामायनचे का
नामदेव माळी यांनी थोडा तापूनच वि
केला. गुंडगिरी, खावुगिरी यामुळे शिवत
येथील पाणीपुरवठा योजना बंद पड
होती. ग्रामायनचे कार्यकर्ते तेथे गेल्य
त्यांनी गावातील तरुणांना हाताशी धरू
परिस्थिती बदलली. मनगटशाहीकडून सु
दाकडे जाण्याचा प्रयत्न आज तेथे य
ठरतो आहे असे नामदेव माळी यांनी ठ
वून सांगितले दत्ता सावळे यांचे सम
झाले की नाही कल्पना नाही; पण त्या

वक्ते, उद्योग-राज्यमंत्री श्री. विनायकराव पाटील यांनी मात्र माळी यांचा आत्मविश्वास वाढावा असेच काही अनुभवाचे बोल ऐकवले. एकाच नदीवर असलेल्या दोन पाणीपुरवठा योजनातील एक उत्तम चालते, एक कर्जात बुडून बंद पडते याला माणसामाणसांतील, गावागावातील फरक याशिवाय दुसरे कोणते कारण असू शकते, असा सवाल विचारून विनायकराव पाटील यांनी आपल्या नासिक भागातील अनेक उदाहरणे सांगितली. भौतिक स्थिती समान असूनही मानसिक–सामाजिक स्थितीतील वेगळेपणामुळे एकीकडे यश व दुसरीकडे अपयश असा फरक पडतो, असे त्यांचे म्हणणे पडले इस्रायलमधल्या किबुत्सचे आपण कौतुक करतो; पण नासिक भागात दोन-दोनशे वर्षे सुरळीतपणे चाल असलेले ग्रामीण सहकार्याचे नमुने आहेत, ही त्यांनी दिलेली माहिती तर अनेकांचे कुतूहल जागे करून गेली.

तळासरी भागात गोपालन समितीचे काम करणारे श्री. विनोद गुप्ता यांनी विक्री विभागावर भर दिला व मुंबई–तळासरी अशी विक्रीव्यवस्थेची साखळी निर्माण करण्यातील आपले अनुभव थोडे विस्ताराने कथन केले. मधले दलाल हटवले तर आदिवासी उत्पादकाला किती व कसा फायदा होतो याची त्यांनी काही आकडेवारीही दिली. स्वयंसेवी संस्थांनी विक्रीव्यवस्थेला हात घातला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. बापट यांनी सुरुवातीला केले होते. एका अर्थाने विनोद गुप्ता यांनी बापट यांच्या प्रतिपादनाला दिलेली ही साथच होती. गोपालन समितीबद्दल वृत्तपत्रातून नेहमी उलटसुलट येत असते. या समितीचे कार्य व तेथील उत्पादकाकडून थेट ग्राहकाकडे उत्पादने पोचवण्याचा प्रयोग यापुढे तरी नीट समजावून घेतला गेला तर गुप्तांच्या भाषणाचे चीज झाले असे म्हणायला हरकत नाही.

## पूरक कामे – जोडधंदे

या सगळ्याहून एक वेगळाच मुद्दा मुंबई विद्यापीठातील शेती-अर्थशास्त्राचे प्राध्यापक स. ह. देशपांडे यांनी मांडला. सहकारी शेती, कार्यकर्त्यांचे बळ, विक्री-संघटन यांबद्दल हवी तशी अनुकूल परिस्थिती आहे असे वादाकरिता क्षणभर गृहीत धरले, तरी शेतीवर लोकसंख्येचा मुळात भारच इतका आहे की, ग्रामीण भागात रोजगारहमीसारख्या योजना राबवून अतिरिक्त लोकसंख्या शेतीतून बाहेर काढल्याशिवाय ग्रामीण पुनर्रचनेला फारसा वाव व अर्थ नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. शेती एके शेती हा विचार त्यांना अमान्य होता. यावरून उघडच दोन पडल्यासारखे झाले. मेळाव्याचे सूत्रचालक प्रा. शरद कुलकर्णी व ग्रामयनचे अध्यक्ष प्रा. देशपांडे यांनी स. ह. देशपांडे यांच्या आकडेवारीला आक्षेप घेतला नाही; पण प्रयत्नांचा केंद्रबिंदू मात्र लहान शेती-शेतकरी कसा सुधारेल हाच असला पाहिजे, असे आवर्जून सांगितले. लहान शेतकरी जगवला–वाढवला पाहिजे, त्याला साधनसामग्री–भांडवल पुरवले पाहिजे, विक्री-व्यवस्था त्याची पिळवणूक करणार नाही हे पाहिले पाहिजे, यावर कुलकर्णी–देशपांडे यांचा अधिक भर होता. रोजगारहमीसारखी पूरक कामे, इतर जोडधंदे यांची मदत हवीच पण परवडत नाही म्हणून छोटी–मध्यम शेती निकालात जाऊ देणे चूक आहे, असा समारोप करून त्यांनी हा विषय संपवला. ◻

विझरचे चंदुकाका रायरीकर, निरानरसिंगपूरचे प्रा. सुरू, वाड्याचे सुदाम पवार, टाटा इन्स्टिट्यूटचे एस्. डी. पुणेकर, पिंगुळीचे वसंत गंगावणे, शेडगेवाडीच्या कुसुम कर्णिक, कर्जतजवळील कर्मा प्रकल्पाचे गोरख कांबळे, भारतीय किसान संघाचे श्री. राम बगाडे वगैरे मंडळी या विषयावर मधूनमधून आपापले विचार व्यक्त करीत होती. त्यामुळे मेळाव्यात कुठेही कंटाळवाणे-पणा डोकावला नाही. सकाळी ९॥ ते १॥ व पुन्हा भोजनोत्तर २॥ ते ४॥ असा सलग वेळ मेळावा चालू होता. ग्रामायनचे यापूर्वीचे मेळावे दोन दिवसांचे होते. मुंबईतला हा पहिलाच मेळावा. मुंबईतील कामाची धावपळ लक्षात घेऊन मुद्दाम एकच दिवस मेळावा योजला होता. तरीही एकूण शेसव्वाशे कार्यकर्ते उपस्थित होते व जवळजवळ वीसएक जणांनी आपले विचार मेळाव्यासमोर मांडले, शिवाय ग्रामायनच्या पुढील वाटचाली संबंधानेही त्यात शेवटी तासभर मनमोकळी चर्चा होऊ शकली. औद्योगिक क्षेत्र आता स्वयंस्फूर्तीने म्हणा, सक्तीने म्हणा, ग्रामीण विकासाकडे वळू पाहत आहे. उद्योगधंद्यांची आर्थिक शक्ती प्रचंड. ती केवळ दिखाऊपणात खर्च होऊ नये म्हणून ग्रामायनसारख्या संस्थांनी निरनिराळ्या उद्योगधंद्यांशी संपर्क वाढवला पाहिजे अशी पुढील वाटचालीसंबंधी एक सर्वसाधारण सूचना पुढे आली व बऱ्याच जणांनी ती उचलूनही धरली. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंटचे प्राध्यापक शरद कुलकर्णी यांनी मुंबईत शेकडोंच्या संख्येने असलेल्या ग्रामविकास मंडळांशी संपर्क साधले जावेत अशीही एक उपयुक्त सूचना मांडली. अर्थात या सर्व सूचनांचा उपयोग तेव्हाच होईल, जेव्हा मुंबईतही नित्यस्वरूपाचे काही ग्रामायनचे काम सुरू होईल. हे काम कसे सुरू करता येईल यासंबंधी शेवटी काही वेळ चर्चा झाली आणि मेळावा आटोपला. ◻

कार्यकर्ते परतताना गाडीत, नंतरच्या बैठकीत चर्चा करीत होते की, अशा मेळाव्यांचा खरोखर उपयोग काय? हजार-दीड हजार रुपये खर्च होतात, शेदीडशे लोक जमतात, काही नवीन ओळखी होतात–कार्यक्षेत्रे गवसतात, एखाद–दुसरा नवीन कार्यकर्ताही पुढे येतो. हे सर्व लाभ आजवरच्या मेळाव्यातून झाले हे सर्वांना मान्यच आहे; पण एवढ्यावर संतुष्ट राहायला ग्रामायनचे तरुण कार्यकर्ते तयार नाहीत. त्यांना अशा मेळाव्यातून आणखी काही घडायला, दृष्टोत्पत्तीस यायला हवे आहे. मेळाव्यासंबंधी मुंबईच्या 'विवेक' साप्ताहिकाने एक स्फुट लिहिले आहे. (२५ फेब्रुवारी अंक) या स्फुटात शेवटी ग्रामायनने निश्चित विचारसरणी व ठोस कार्यक्रम पुढे ठेवला नाही तर तो एक 'चव्हाटा' ठरेल असा अभिप्राय व्यक्त केलेला आहे. ग्रामीण प्रश्नांची प्रत्यक्ष अनुभवाधिष्ठित अशी चर्चा करणारा एखादा 'चव्हाटा' निर्माण होण्यात चूक ती काय आहे? का 'चव्हाटा' या शब्दाऐवजी 'व्यासपीठ' म्हटले गेले तर ते 'विवेक'च्या स्फुटलेखकाचे असमाधान कमी करू शकणार आहे? शहरे आणि खेडी यात आज अस्तित्वात असलेली प्रचंड दरी कमी करून, सहजीवनाचे लहानमोठे पूल निर्माण करणे हे ग्रामायनचे उद्दिष्ट आहे. हे दोन विभाग प्रथम समपातळीवर यायला हवेत. एखादी नवी घोषणा देऊन हे कार्य होणार नाही. गावाचे प्रश्न आज गावात कोंडून घेऊनच सुटणारे नाहीत. मुंबई-पुण्यासारख्या शहरांच्या वेशीवर ते टांगावे लागतात. नोकरशाहीचे किस्से शहरात आहेत. अगदी शिवतक्रारसारख्या लहान गावची पाणीपुरवठा योजना सुरू करायची तर मुंबई-पुणे अशा सारख्या खेपा कराव्या लागतात. शासकीय सोयीसवलतींचा लाभ अखेरच्या ग्रामीण माणसापर्यंत पोचविणे, नोकरशाहीच्या लाल फितीच्या जाचातून त्याची सुटका करणे हीच केवढी तरी मोठी प्रगतीची झेप आहे! ही क्रांती नसेल; पण प्रगती निश्चित आहे. या दृष्टीने ग्रामायनने आजवरची आपली वाटचाल केली व पुढे जसजसे कार्यकर्ते लाभतील तसतसा वाटचालीचा वेग वाढत राहीलही. आज खंडीभर बोलणे आणि तोळाभरसुद्धा न करणे ही वस्तुस्थिती आहे. याऐवजी न बोलता करत राहणे हा ग्रामायनचा उपक्रम नक्कीच अधिक श्रेयस्कर आहे. तरी पण असे आत्मपरीक्षण नेहमी होत राहिलेच पाहिजे. कार्यकर्ता संतुष्ट राहिला, की कार्य संपलेच म्हणून समजावे. या दृष्टीने मेळाव्यानंतरच्या आढावा-बैठकीत शिवतक्रारचे आव्हान पेलण्याचे तरुण कार्यकर्त्यांनी ठरवले आहे ते योग्यच म्हटले पाहिजे. ◻

मुक्काम पुणे

# सुलश्री प्रतिष्ठान

## पुढचे पाउल

आज विसाव्या शतकात संगीताचा प्रसार मोठ्या जोमाने होताना दिसतो आहे. संगीत ही परफॉर्मिंग आर्ट असली तरी श्रवणीयतेपलीकडे त्याचा अभ्यास, संशोधन यांची गरज महत्त्वाची आहे. याबरोबरच संगीताचे अध्ययन आणि अध्यापन करणाऱ्या लक्षणीय संस्थांचीही गरज आहे. प्रसिद्ध मराठी संगीतकार आणि गायक श्री. सुधीर फडके यांनी गेल्या वर्षी 'सुलश्री प्रतिष्ठान' ची स्थापना केली. श्री. सुधीर फडके, सौ. ललिता फडके व त्यांचे चिरंजीव आणि नवोदित संगीतकार श्री. श्रीधर फडके यांच्या आद्याक्षरांनी या प्रतिष्ठानाची स्थापना झाली. अध्ययन, अध्यापन, वर्धापन व प्रसारण करण्याच्या उद्देशाने हे प्रतिष्ठान केले गेले. श्री. फडके यांचे गुरुवर्य स्व. गायनाचार्य वामनराव पाध्ये यांच्या नावे दरमहा रु. २०० ची शिष्यवृत्ती, शास्त्रीय संगीतात योग्य उमेदवारास या प्रतिष्ठानतर्फे देण्याची त्यांची योजना आहे.

याच उद्देशाने गेल्या शतकात १८७० साली मुंबईतील काही पारशी गायनप्रेमी मंडळींनी 'गायन उत्तेजक मंडळी' या नावाने ट्रस्ट स्थापन केला होता. हा ट्रस्ट सुलश्री प्रतिष्ठानमध्ये विलीन करण्याचा समारंभ दि. १८ रोजी पुण्यामध्ये संपन्न झाला. धर्मादाय आयुक्तांनी त्याला रीतसर मान्यताही दिलेली आहे. १८७० साली तेव्हाचे मुंबईमधील पत्रकार व नाटककार श्री. काब्रावाला यांनी पुढाकार घेऊन गायन उत्तेजक मंडळीची स्थापना केली होती. मंडळी आपल्या ट्रस्टचे कार्य अधिक जोमाने सुरू रहावे या विचारात होती. या समारंभात त्या ट्रस्टची ३८ हजार रुपयांची सर्टिफिकिटे वगैरे मिळकत 'सुलश्री' कडे सुपूर्त करण्यात आली. ही मिळकत गायन उत्तेजक मंडळीचे मुख्य विश्वस्त श्री. पेस्तनजी कापडिया (वय ९१) यांच्या कन्या डॉ. बानू कोयाजी यांनी श्री. सुधीर फडके यांच्या स्वाधीन केली. श्री पेस्तनजी कापडिया व्यवसायाने आर्किटेक्ट असले तरी गुजराथी लेखक व कवी आहेत. ६४ वर्षे हा व्यवसाय करीत असतानाही ते भारतीय शास्त्रीय संगीताचे उपासक असून हार्मोनिअम, तबला इत्यादि वाद्ये सहजतेने वाजवितात.

समारंभाच्या प्रारंभी श्री. अजय पोहोनकर यांचे गायन झाले. त्यांनी राग मारव्यातील ख्याल व द्रुत चीज आणि खमाज ठुमरी पेश केली. नंतर सुधीर फडके यांनी स्वागत केले. 'संगीताची परंपरा असलेला हा ट्रस्ट माझ्या स्वाधीन होत आहे, हा माझा सन्मान होत असून मी त्याच्या विश्वासाला अपात्र ठरणार नाही,' असे सांगून त्यांनी ट्रस्टचे दुसरे उपस्थित विश्वस्त श्री. दुधमलजी यांचे आभार मानले. त्यानंतर केलेल्या भाषणात श्री. कापडिया म्हणाले, 'आपले मूल इतरांच्या स्वाधीन करताना वास्तविक दुःख होते; पण आज मला आनंद वाटत आहे. कारण ते आता अधिक सुरक्षित अशा व्यक्तींच्या हातात पडत आहे. त्यामुळे त्याची जोपासना निश्चित चांगली होईल!' आपल्या भाषणात श्री. कापडिया यांनी स्वतःची एक फारसी कविताही म्हणून दाखविली.

समारंभाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. बानू कोयाजी आपल्या भाषणात म्हणाल्या, 'माझ्या वडिलांनी मुंबईला जोपासलेली संस्था आता या रूपाने पुण्यात आली याचा मला आनंद वाटतो.'

प्रसिद्ध संगीततज्ज्ञ श्री. वामनराव देशपांडे यांनी पं. भातखंडे, कावसजी, भिलवडीकर अलादिया खाँ आदी मंडळींनी भूषविलेली मुंबईची ही गायन उत्तेजन मंडळी असल्याचे सांगितले. ते म्हणाले, 'ही शंभर वर्षांपूर्वीची परंपरा असलेली संस्था आज सुलश्रीमध्ये विलीन होत असल्याने या क्षेत्रातील हा दिवस ऐतिहासिक महत्त्वाचा आहे.'

यापुढे कै. सौ. बापाई पेस्तनजी कापडिया आणि फ्रेनी एम. कामा यांच्या नावाने गायन आणि वादनक्षेत्रातील दोघांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्याशिवाय संगीताची स्पर्धा घेऊन त्याकरता चांदीचा तंबोरा असलेली प्रतिकृती ट्रॉफी म्हणून 'सुलश्री'चे संस्थापक श्री. सुधीर फडके यांना समारंभाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. बानूबाई कोयाजी यांच्या हस्ते देण्यात आली. या प्रतिष्ठानच्या वतीने स्व. वामनराव पाध्ये, कै. सौ. बापाई पेस्तनजी कापडिया व कै. फ्रेनी एम. कामा या नावाने तीन शिष्यवृत्त्याही देण्यात येतील. *

# प्रायोगिक रंगभूमी

'का? कसं? आणि काय? ह्या प्रश्नांची उत्तरे देणारी आणि त्यांचे महत्त्व जाणणारी रंगभूमी म्हणजे प्रायोगिक रंगभूमी. प्रायोगिक नाटके ही नेहमीच 'प्रोसेस ओरिएन्टेड' असावीत, 'रिझल्ट ओरिएन्टेड' नव्हेत. मनात आणि विचारात जेथे अस्थिरता आहे, विद्यार्थीदशा आहे आणि मागोवा घेण्याची वृत्ती आहे तेथे तेथे प्रायोगिकता आढळते. तुमचा दृष्टिकोन आणि मनोवृत्तीच प्रायोगिकता म्हणजे काय हे ठरवत असते.' प्रा. विजया मेहता प्रायोगिक रंगभूमीविषयीच्या त्यांच्या कल्पना सांगत होत्या. कै. के. नारायण काळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे व्याख्यान १९ फेब्रुवारीला आयोजित केले होते. त्याच वेळी वि. भा. देशपांडे यांनी लिहिलेल्या 'नाटककार खानोलकर' ह्या पुस्तकाचे प्रकाशनही विजयाबाईंच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. विजया मेहतांची प्रायोगिकतेविषयी मते ऐकायला अनेकजण उत्सुक होते. 'संध्याछाया', 'जास्वंदी', 'अजब न्याय वर्तुळाचा', 'बॅरिस्टर' यांसारखी समर्थ नाटके तितक्याच समर्थपणे रंगभूमीवर उभी करण्यात त्यांचा काय दृष्टिकोन होता हे जाणून घ्यायची इच्छा होती.

व्याख्यानाच्या सुरुवातीलाच त्यांनी 'प्रायोगिक' ह्या शब्दप्रयोगावर टीका केली. 'त्या शब्दाच्या सतत वापराने त्याचा मूळ अर्थच नष्ट होत चालला आहे', असे सांगून त्या म्हणाल्या की, 'ज्यांची रंगभूमीवर उभे राहण्याचीसुद्धा पात्रता नाही ती माणसे आज प्रायोगिक रंगभूमीचे पाईक म्हणून मिरवत आहेत. प्रायोगिक नाटके बसवताना ते नाटक आपण आताच का

पृष्ठ २२ वर

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# हिरे–माणिक–मोती

'मराठी विज्ञान परिषद : चर्चा : रत्ने, नवरत्ने आणि उपरत्ने : (कित्येक रत्नांनी इतिहास घडविला. लाभदायी अशुभ, स्वयंप्रकाशित रत्ने, ढेकणासंगे हिरा तो भंगला-समज-अपसमज : मनोरंजक शास्त्रीय माहिती : टिळक स्मारक मंदिर सभागृह, टिळकरस्ता, सायं. ६–३०.'

एवढा मोठा विषय, मी 'हिरे-माणिक-मोती' असा सुटसुटीत लक्षात ठेवला. 'मराठी विज्ञान परिषद' ही संस्था विज्ञानाचा गंभीरपणे प्रचार करीत असते. चांद्रयुगाला आरंभ झाल्यापासून (माणूस चंद्रावर गेला तेव्हांपासून) विज्ञानविषयक संस्था-त्यांची मासिके किंवा विज्ञानाची पुस्तके यांची लोकांतली आवड वाढली असावी असे मला वाटत होते; पण परिस्थिती फारशी बदललेली दिसत नाही. अजूनही त्या संस्था भरभराटत नाहीत, त्या मासिकांचे खप वाढत नाहीत आणि विज्ञानविषयाच्या पुस्तकांना खप नाही. धार्मिक संस्था, मासिके आणि पुस्तके किंवा ललित संस्था आणि मासिके ही किती तरी पुढे आहेत. याचा अर्थ लोकांना वैज्ञानिक शोध व त्यापासून मिळणारी सुखे नको आहेत असे नाही. ट्रँझिस्टर रेडिओ निघाले व ते पहाता पहाता घरोघर झाले; पण या शोधांबद्दल ज्ञान देणाऱ्या वैज्ञानिक मासिकांचे खप मात्र हजारांच्या जवळपास राहिले. बरेच ठिकाणी ती न वाचण्यासाठी घेतली जातात. लोकांना वैज्ञानिक शोधांची सुखे हवी आहेत, पण वैज्ञानिक दृष्टिकोन नको आहे. ही परिस्थिती फार चमत्कारिक आहे. म्हणजे विज्ञानाच्या दृष्टीने फार चमत्कारिक आहे. मध्ययुगीन कालातला कर्मठपणा व बंधने तोडून माणूस सृष्टीचा शोध घेऊ लागला आणि विज्ञानयुग सुरू झाले. माणसाला कर्तेपण, नवा आवेश, नवा पंथ मिळाला असे वाटले; पण पुढे लक्षात येऊ लागले की 'शोध' हे 'अपौरुषेय' आहेत म्हणजे ते कुणा एकाचे राहत नाहीत. लाउडस्पीकर हा वैज्ञानिक व सनातनी दोघेही आपल्या प्रचारासाठी वापरू शकतात. म्हणूनच हा प्रश्न येतो की, वैज्ञानिकतेचे तत्त्वज्ञान होऊ शकेल का? वैज्ञानिक पंथ किंवा धर्म म्हणून निघू शकेल का? की विज्ञानाचे स्थान हे माणसाच्या सुखसोयी वाढवण्याइतके मर्यादित राहणार?

टिळकमंदिरातील सभागृहातले 'हिरे–माणिक–मोती' यावरचे व्याख्यान काहीसे वैज्ञानिक दृष्टी देण्यासाठी होते. व्याख्याते होते फर्ग्युसनचे प्राध्यापक डॉ. सोहोनी. वर्तमानपत्रांत 'चर्चा' म्हणून आले होते; पण ते व्याख्यानच झाले व नंतर प्रश्नोत्तरे.

हिरे–माणिक–मोती यांची माहिती होण्याच्या दृष्टीने सोहोनी यांचे व्याख्यान उद्बोधक झाले. त्यांनी सांगितले की, माणिक व नील ही खरी रत्ने होत; पण हिरा हा रत्नात जमा नाही. हिऱ्याचा काठिण्यक्रमांक सर्वांत जास्त म्हणजे दहा आहे. सर्वत्र सापडणाऱ्या क्कार्टझचा (वालुका) नंबर सात. या दोहोत बाकीची खनिजे येतात. तसा हिरा हा ओळखायला सोपा जातो. क्षकिरणांखाली हिरा पारदर्शक असतो तर हिऱ्यासारखी वाटणारी काच किंवा इतर खनिज अपारदर्शक असतात. हिरा ओळण्याची आणखी एक रीत आहे. निळ्या मखमलीवर हिरा निळसर दिसत नाही. काचेचा खडा मात्र निळसर दिसतो. तसेच हिरा हा स्पर्शास थंडगार लागतो. काच तेवढी थंड किंवा उष्ण (हवामानाप्रमाणे) लागत नाही. कारण हिरा हा उत्तम वीजवाहक आहे, तर काच ही वीजवाहक नाही. हिरा खरा की खोटा ओळखण्याचे हे उपाय असले तरी सर्वसामान्य माणसाला हिरा ओळखणे कठिणच आहे. खऱ्या हिऱ्याच्या कसोटीला उतरणारे नकली हिरे अमेरिकेतील जी. ई. कंपनीने केले आहेत; पण त्यांची किंमत खऱ्या हिऱ्यांहूनही अधिक झाली. माणसाला हिरे करता येतात एवढेच एक समाधान त्यांतून मिळाले.

किंमतीच्या दृष्टीनेही हिरे-माणिक-मोती वगैरेंची श्रेणी त्यांनी सांगितली. ती श्रेणी अशी : १. हिरा २. पुष्कराज ३. पाचू, ४. माणिक, ५. नील, ६. मोती, ७. गोमेज, ८. लसण्या, ९. पोवळे.

मोत्यांबद्दल व्याख्याते म्हणाले, 'खरा मोती हा थरावर थर बसत हळूहळू तयार झालेला असतो. त्यामुळे वापरण्याने वरचा थर उडाला तरी खालचा थर तेवढाच चकचकीत राहून मोती वापरता येतो. याउलट नकली मोती एकाच वेळी थर देऊन झालेले असल्यामुळे तो थर उडताच मणी वाया जातो. स्पॅनिश पर्ल्स म्हणून नकली मोती येतात. मासे पकडल्यावर खाली चकचकीत खवले पडतात त्याचे पाणी काचेच्या मण्यावर देऊन ही मोती बनवितात.'

जवाहिरे कसे फसवितात याचे त्यांनी एक उदाहरण दिले. हिऱ्याच्या बाबतीत अशी एक समजूत आहे की, ऐरणीवर हिरा ठेवून घण मारला तर ऐरण फुटेल, हिरा फुटणार नाही. या लोकभ्रमाचा फायदा जवाहिरे घेतात. खरे म्हणजे कोणत्याही हिऱ्याचा, ऐरणीवर ठेवून घाव घालताच चक्काचूर होतो. जिथे वज्रकोंडेसारख्या ठिकाणी पावसाळ्यानंतर जमिनीवर हिरे सापडतात तिथे, अनेक गरीब लोकांचा ते वेचून विकण्याचा धंदा असतो. असे हिरे घेऊन हे लोक जवाहिऱ्याकडे गेले की, जवाहिरे त्या हिऱ्यांतील एक दोन हिरे ऐरणीवर ठेवून घाव मारतात व त्यांचा चक्काचूर झालेला दाखवून हिऱ्यांना काचेची किंमत देऊन विकत घेतात.

प्राचीन काळी भारत देश हिरे व सोने यात अग्रेसर होता असे प्रा. सोहोनी म्हणाले. त्यातील सोन्याबद्दलचे विधान मला बरोबर वाटत नाही. रोमने अनेक देश जिंकून गोळा केलेले सोने भारतात आणून ओतले होते. ते हे सोने होते. भारतात सोने फारच कमी सापडत होते. भारताचा रोमशी मोठा व्यापार होता. त्यांना मसाल्याचे पदार्थ दारूत घालण्यासाठी लागत ते आपल्याकडून जात. त्याबद्दल त्या काळचा त्यांचा इतिहास-

कार प्लीनी याने लिहिले आहे की, दारूच्या पेल्यात घालण्यासाठी लागणारे मसाल्याचे पदार्थ घेण्यापायी आम्ही जगभर जिंकून आणलेले सोने भारतात ओतले आणि रोम दरिद्री केला!' मात्र हिऱ्यांचेबाबतीत वक्त्यांनी सांगितले ते खरे असावे. त्यांनी म्हटले की १८५६ सालापर्यंत भारतात सापडणारे हिरे सर्व जगात अग्रेसर होते; पण नंतर आफ्रिकेतील केंबरले क्षेत्रात प्रचंड प्रमाणात व मोठमोठे हिरे सापडल्यावर भारताचे अग्रेसरत्व गेले. त्या खाणींतून शंभर कॅरेटहून मोठे असे दोन हजार हिरे केवळ १०० वर्षांत निघाले आहेत. सर्वांत मोठा हिरा अर्धा किलोग्रॅमचा सापडला आहे व पाचशे ते हजार कॅरेटचे चौदा हिरे मिळाले आहेत; पण भारताला आता दुसरे महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतात हिऱ्यांना पैलू पाडण्याचे काम होऊ लागले आहे. पूर्वी हे काम ॲमस्टरडॅम येथे होत असे.

हिऱ्यांबद्दलचे लोकभ्रम सांगताना प्रो. सोहोनी म्हणाले, 'हिरकणी गिळून आत्महत्या' ही कथा व कादंबऱ्यांतील नायिकांची जीव देण्याची लाडकी तऱ्हा आहे; पण हिरा किंवा हिरकणी गिळून काही अपाय होत नाही. किंबरले येथील हिऱ्यांच्या खाणींतून हिरे चोरणारे, हिरे गिळूनच बाहेर आणतात आणि ते परसाकडच्या वाटेने अपाय न करता बाहेर पडतात. हिरा गिळून माणूस मरत नसून हिरा बसवलेल्या खोबणीत विष ठेवून ते गिळल्याने मरतो. हीरकभस्म जहाल असते, हीही एक चुकीची समजूत आहे. कारण हीरकभस्म असूच शकत नाही. हिरा जाळल्यावर खाली काही उरत नाही. त्याचा कार्बन डायऑक्साइड वायू होऊन उडून जातो. हिऱ्याला धारदार टोक असते अशी समजूत आहे; पण त्याचे पैलू काहीसे गोलसर व बोथट असतात. हिरे हे कोळशाच्या खाणीत सापडतात, ही समजूतही चूक असून ते स्वतंत्रपणे खाणीत सापडतात. त्यांना स्वतःचा प्रकाश नसतो. अंधारात ते प्रकाश देतात, हा एक लोकभ्रम आहे.

हिरे किंवा खड्याच्या अंगठ्या वापरण्याबद्दल निघाले तेव्हा तांब्याच्या भांड्यात पाणी ठेवतात, त्यावद्दलही प्रश्न विचारण्यात आले. वक्ते म्हणाले, 'तांबे पाण्यात विरघळणारे आहे व तांबे काही प्रमाणात जंतुघ्नही आहे. तेव्हा तांब्याच्या भांड्यांतून पाणी पिण्याचा काही तरी परिणाम असतो असे म्हणता येईल; पण हिरा किंवा इतर खडे पाण्यांत ठेवून किंवा अंगावर बाळगून काही परिणाम होण्याचे कारण नाही. ते पाण्यात विरघळत नाहीत किंवा शरीराशी संबंध येऊन कसलाही औषधी परिणाम करू शकत नाहीत. नवग्रहाची अंगठी किंवा हिरे वापरून काही परिणाम होतो हा लोकभ्रम आहे. चुकीच्या समजुतीने चालत आलेला संस्कार आहे. तसेच खड्यांना वेगवेगळे ग्रह दिले आहेत ते का हे कळत नाही आणि त्या त्या ग्रहाचे खडे वापरल्याने ते ते ग्रह अनुकूल होतात हाही लोकभ्रम आहे.

पुन्हा पुन्हा वक्ते, खडे अंगावर बाळगून काही परिणाम होत नाहीत, ग्रहांचा व खड्यांचा संबंध नाही असे सांगत होते; श्रोत्यांत काहीशी अस्वस्थता आल्यासारखी वाटत होती. हिरे–माणके–मोती यांबद्दल शास्त्रीय माहिती श्रोत्यांना नसेल, पण हिरे-माणिक–मोती यांच्याबद्दलची 'अशास्त्रीय' माहिती त्यांना वक्त्यांपेक्षा अधिक होती. एका श्रोत्याने कुड्यांतील हिऱ्यांमुळे दोन मृत्यू कसे झाले हे सांगितले. बहुधा सभेतील शास्त्रीय वातावरण पाहून तो म्हणाला, 'हे दोन मृत्यू ते हिरे जवळ बाळगल्याने झाले नाहीत. तो केवळ योगायोग होता, दैवी चमत्कार नव्हता, यात मला संशय नाही.' तेही श्रोत्यांना फारसे पटलेसे वाटले नाही. खडे कसे लाभतात व लाभत नाहीत याच्या वर्षानुवर्षे चालत आलेल्या गोष्टी सर्वांना ठाऊक होत्या.

व्याख्यानाचे वेळी गोडबोले सराफ यांच्या मुलाला (डॉ. रघुनाथ गोडबोले) मुद्दाम बोलावले होते. वक्ते अधूनमधून हिरे-माणिक मोती यांच्याबद्दलची व्यावहारिक माहिती त्याला सांगायला सांगत होते. त्यानेच सांगितले की, हिऱ्याची किंमत सर्वांत जास्त पडते याचे कारण त्याची दुर्मिळता. तसेच खाणीतले हिऱ्याचे खडे स्वस्त असतात; पण त्यांना पैलू पाडण्याचे काम इतके जिकिरीचे आहे की, त्या मेहनतीचे पैसेही फार होतात. व्याख्यानाचे नंतर त्याने प्रात्यक्षिक दिले. टेबलापाशी बसून हातातल्या हिऱ्याच्या व नवग्रहांच्या आंगठ्या तो श्रोत्यांना दाखवीत होता. आम्ही सर्वजण गटागटाने टेबलाभोवती उभे राहून पाहत होतो. नवग्रहांचे खडे त्याने दाखविले. माणिक, हिरा, पाचू, पुष्कराज, मोती, पोवळे, नील, गोमेद व लसण्या हे ते नऊ खडे व रवि, शुक्र, बुध, गुरु, चंद्र, मंगळ, शनि, राहू व केतु हे त्यांचे अनुक्रमे ग्रह होत.

व्याख्यान संपल्यावर खडे किंवा हिरे यांच्यात कोणताही दैवी किंवा औषधी गुण नसल्याचे जे व्याख्यात्यांनी वारंवार सांगितले होते तेच आठवत होते. लोकांच्या भावना दुखू नयेत म्हणून ते सांगताना त्यांनी सांभाळून शब्द वापरले होते तरी त्या समजुतींना भ्रम म्हणण्यात सर्व येऊन गेले होते.

तसे पाहिले तर त्यांचे म्हणणे शास्त्रीयदृष्ट्या खरे होते; पण प्रत्येक वस्तूकडे बघण्याचे दोन दृष्टिकोन असतात, एक शास्त्रीय व दुसरा अशास्त्रीय. या दोन्ही दृष्टिकोनांतून पाहिले तरच ती वस्तू बरीचशी कळते. हिरे, माणिक, मोती यांच्यावरून असे दिसते की, लोकांना त्यांच्यातील अशास्त्रीय वैशिष्ट्यांचे जास्त प्रेम आहे. दुर्मिळतेने वस्तूंना महत्त्व येते व त्यात दैवी गुण वाटू लागतात. त्यांची किंमतही वाढते. पावलोपावली मिळणाऱ्या गोमेदच्या खड्यांची किंमत त्यामुळेच हिऱ्यांपेक्षा कमी असते; पण त्याहीपेक्षा आयुष्यातील गोष्टी ठरवाव्यात तशा घडत नाहीत, अनपेक्षित कलाटणी मिळते, प्रयत्नांनी सर्व साध्य होते असे नाही. जीवनातील सुखदुःखांचे कार्यकारण कळत नाही, हे लक्षात येऊन मनाप्रमाणे गोष्टी घडण्यास माणूस अशास्त्रीय तोडगे करू लागतो. दृष्ट पडेल म्हणून तो पोवळे गळ्यात घालतो, ब्लडप्रेशरसाठी रुद्राक्षाची माळ घालतो. शास्त्रीय उपचारांनी किंवा माहिती मिळून त्याचे समाधान होत नाही त्याचे लक्ष पुढे पुढे असते. त्याच्या कल्पना अशास्त्रीय होतात. चंद्रावर पोहोचताच चांद्रवीरांच्या मनात अशास्त्रीय विचार आले. कुणाला परमेश्वर आठवला, कुणाला माणसाच्या नैतिक अधःपाताची (व्हिएटनामयुद्ध) चिंता वाटली. चंद्र साध्य झाल्यावर शास्त्र संपले व विचार सुरू झाले. अशास्त्रीय विचार सुरू झाले. म्हणूनच मला वाटते की, शास्त्र व अशास्त्र या दोन वृत्तींतूनच माणसाची प्रगती होत असते.

यासाठीच शुद्ध शास्त्रीयवादी जरी किती म्हणाले तरी हिऱ्याचे दैवी गुणधर्म, नवग्रहांच्या खड्यांची शुभाशुभता या गोष्टी लोकांच्या मनातून जाणार नाहीत. फ्रान्समध्ये आजही सोन्याचा तुकडा पायमोज्यात ठेवण्याने शुभ होते अशी समजूत आहे. हा भ्रम कसा घालवणार? उलट सोने पायाला लावणे आपण पाप मानतो. सोन्याचा पायातला दागिना फक्त सम्राट, सम्राज्ञी किंवा देव यांनीच वापरावयाचा अशी आपली समजूत आहे, तीही कशी घालविणार? □

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरन्दरे

# विएतनाम, चीन आणि वाजपेयी

देंग सिआओ पेंग ( या वर्षीच्या सुरुवाती-पर्यन्तचा तेंग सिआओ पेंग ) याची अमेरिका-भेट गाजून धूळ खाली बसते न बसते तोच विएतनाममध्ये चीनने सैन्य घुसवून चांगलेच वादळ उठवले. ते शमण्याचीही काही चिन्हे नाहीत !

हा हल्ला पूर्णत: अनपेक्षित म्हणता येणार नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि हिटलरच्या Blitzkrieg ( ब्लिट्स्क्रीग ) पद्धतीने तो होईल याची मात्र अपेक्षा नव्हती. अमेरिकेत असतानाच विएतनामला 'धडा' शिकवण्याची भाषा देंगने वापरली होती ही आता सर्वश्रुत गोष्ट झाली तेव्हाच आणखी एक महत्त्वाची घटना पुरेशा प्रकाशझोतात आलेली नव्हती; पण हल्ल्यानंतर, नव्या दृष्टीने देंगच्या अमेरिका-भेटीकडे पहाता ती घटना भावी उलथापालथीची निदर्शक होती असेच म्हणावे लागेल.

कंबोडियाचा प्रिन्स नरोदम सिहनुक याचा देश सोडून फ्रान्समध्ये स्थायिक होण्याचा परवापर्यंत विचार होता; पण अमेरिकेमध्ये असताना देंगने फ्रान्समध्ये स्थायिक होण्याऐवजी चीनमध्ये स्थायिक व्हावे असा सल्ला त्याला देऊन त्याचे मन वळवले अशी माहिती आता उजेडात आली आहे. याचे परिणाम पुढे पाहू.

### पार्श्वभूमी

एकूण आग्नेय आशियाच्या राजकीय घडामोडींच्या संदर्भात या गोष्टीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. दोन विएतनामच्या एकीकरणानंतर वर्षभराचाच काळ असा गेला की, विएतनामच्या सर्व सीमांवर शांतता होती. ४००० वर्षांच्या इतिहासात प्रथमच विएतनामला बाहेरून धोका दिसत नव्हता. अमेरिकेशी युद्ध जितका काळ चालू होते तितका काळ विएतनामला चीन आणि रशिया दोघांच्याहीपासून समान अंतरावर रहाण्याचे धोरण अवलंबता आले. कारण दोघांचा समान शत्रू अमेरिका होता; पण निक्सन-किसिंजर जोडीने हे चित्र बदलले आणि चीन-अमेरिका फारच वेगाने एकमेकांच्या जवळ आले. या परिस्थितीमध्ये भारतासारख्या अलिप्ततावादी राष्ट्रालाही योग्य सुवर्णमध्य साधणे कठीण गेले व जात आहे, तर विएतनामसारख्या कम्युनिस्ट राष्ट्रापुढे अडचण उत्पन्न व्हावी यात नवल नव्हते.

आग्नेय आशियाचे एकूण चित्र पहाता विएतनाम आणि रशिया यांची धोरणे परस्परपूरक ठरू लागली. विशेषत: १९७८ च्या मध्यापर्यंत ही गोष्ट अगदी स्पष्ट झालेली होती. फिलिपाइन्स आणि थायलंडमधले अमेरिकेचे तळ अगदी हलवले गेले नाहीत, तरी त्यांचे सामर्थ्य कमी व्हावे व त्यायोगे आग्नेय आशियातील अमेरिकेचे वर्चस्व कमी व्हावे यासाठी विएतनाम उत्सुक होता. स्वत: पोळल्यामुळे विएतनामने ही भूमिका घेणे रास्त होते तर आग्नेय आशियात फारसा शिरकाव न करू शकल्यामुळे अस्वस्थ असणाऱ्या रशियाची भूमिकाही निराळ्या कारणासाठी का होईना, तशीच होती. चीनला हे खपण्यातले नव्हते. रशिया हा क्रमांक एकचा शत्रू हे चिनी राज्यकर्त्यांनी इतके पक्के डोक्यात घेतले आहे की, त्यांच्या संपूर्ण आंतरराष्ट्रीय राजकारणाचा कणाच तो झालेला आहे.

विएतनामपुढचा पहिला प्रश्न पुनर्वसनाचा आहे. अपरिमित हानी भरून काढून नवनिर्माण करणे यासाठी विएतनामला अमेरिकेपासून रशियापर्यंत कोणालाच दुखवणे परवडण्यासारखे नव्हते. चीनला हेही पसंत पडले नाही. अलिप्त राष्ट्रगटात विएतनामने सामील होणे, International Monetary Fund, World Bank, Astan Development Bank यासारख्या 'प्रतिक्रियावादी' शक्तींची मदत घेणे या गोष्टींनी चीनच्या असंतोषात भर पडत गेली. अमेरिकेविरुद्धच्या दीर्घ लढ्यात आपण मदत केलेले राष्ट्र केवळ स्वत:च्या ताकदीवर पुढे जाऊ पहाते ही भावना व त्याहूनही जास्त म्हणजे आपल्याला न विचारता पुढे जाऊ पहाते ही दुखावल्याची जाणीव यांचा संयुक्त परिणाम चीनवर झाला. अस्सल कम्युनिस्ट देश म्हणून इथले मार्क्सिस्ट, लेनिनिस्ट, कम्युनिस्ट चीनचा कितीही उदोउदो करोत, विस्तारवादाचा मोह चीनलाही सुटलेला नाही. प्रत्यक्ष भूभाग नाही तरी त्यावर अप्रत्यक्ष नियंत्रण तरी करायला मिळावे या धोरणानेच चीनची पावले पडत आलेली आहेत आणि याच धोरणाला धक्का लागतो आहे म्हटल्यावर चीनचे पित्त खवळले. दुसरे कारण म्हणजे लाओस हा विएतनामचा शेजारी देश. थायलंडच्या व त्याच्या सीमा लागून आहेत व चीन, रशिया आणि विएतनाम या तीनही कम्युनिस्ट देशांची व्यवस्थित मदत घेऊन लाओस तारेवरची कसरत करीत जगत आहे. तिथेही, लाओस आणि विएतनाम यांच्यात विशेष सलोखा प्रथम फ्रेंचांविरुद्ध आणि नंतर अमेरिकेविरुद्ध लढल्यामुळे एक प्रकारची भावनिक जवळीक त्यांच्यात निर्माण झाली. भौगोलिकदृष्ट्याही परस्परपूरक अशीच धोरणे आखणे त्यांना फायदेशीर होते. रशिया आणि विएतनाम जसजसे आंतरराष्ट्रीय राजकारणात उपरिनिर्दिष्ट कारणांनी जवळ येऊ लागले, तसतसा लाओसच्या अंतर्गत राजकारणातला चीनचा प्रभाव कमी होऊ लागला.

### कंबोडिया

अर्थात् साऱ्या प्रश्नाच्या मुळाशी कंबोडिया (किंवा काम्पूचिया) आहेच. दोन विएतनाम एकत्र झाल्यापासून संपूर्ण इंडोचायनाचे एक संघराज्य बनवावे या विएतनामच्या जुन्या स्वप्नाला नवी झिलई चढली. मूलत: एका मानसिक प्रक्रियेचा परिणाम लष्कर घुसवण्यात झाला. मागच्या वर्षीच्या जानेवारीमध्येच कंबोडिया-विएतनाम सरहद्दीवर कुरबुरी सुरू झाल्या होत्या. कंबोडियात अस्तित्वात असणारे पोल पोत याचे सरकार हे जगातले सगळ्यात निर्दय व क्रूर सरकार म्हणून कुप्रसिद्धी पावलेच होते. त्यात विएत-

# एल्. आय. सी. ची कॅप
## आपल्या बाळाच्या भविष्याला आकार



नवीन

# चिल्ड्रेन्स अँटिसिपेटेड पॉलिसी

खास आपल्या लाडक्या बाळासाठी एल्.आय्.सी. ने एक विशेष नफ्यासहित योजना तयार केली आहे. [या नव्या चिल्ड्रेन्स अँटिसिपेटेड पॉलिसी (संक्षिप्त रूप कॅप) द्वारा,] आपले बाळ जेव्हा १८ किंवा २१ वर्षांचे होईल तेव्हा त्याचेसाठी एकरकमी भरपूर तरतूद होऊ शकते. शिवाय पॉलिसीची मुदत पुरी होईतो अगदी माफक दरात विम्याचे संरक्षण सुरुच राहते.

अुदा. आपल्या एक वर्षाच्या बाळासाठी ३९ वर्षे मुदतीची रु. १५००० ची पॉलिसी द. म. फक्त ३१ रुपयात मिळते. (वार्षिक हप्ता रु. ३६७.२०) १८ व्या वर्षी त्याच्यासाठी ३१२१.२० रु. हाती येतात. यातून त्याच्या भविष्याला आकार लाभू शकतो. नंतरही पूर्ण संरक्षण मिळत राहते; आणि वयाच्या ४० व्या वर्षी त्याला १५००० रु. अधिक बोनस (चालू दराने रु. ६,६००) अशी २१६०० रु. ची भरघोस रक्कम प्राप्त होते. १८ व्या वर्षानंतर मृत्यु ओढवला तर पूर्ण रक्कमेची हमी असतेच. वय १८ पूर्वी मृत्यू आल्यास भरलेले सर्व हप्ते परत केले जातात.

१८ व्या वर्षी रु. ३,१२१.२० किंवा ४० व्या वर्षी अधिक रु. २१,६०० किंवा जास्त रक्कम मिळण्यासाठी एल्.आय्.सी. ला जास्तीत जास्त रु. ३६७.२० × ३९ = १४,३२०.८० (या रकमेवर कर सूट मिळते.) द्यावे लागतील.

१४ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी एक आदर्श भेटवस्तु– कॅप आजच आपल्या बाळासाठी ही योजना स्वीकारा, हप्ता अगदी किमान असेल.

अधिक माहितीसाठी लिहा : जनतासंपर्क आणि प्रसिद्धी अधिकारी, एल्.आय्.सी. ऑफ इंडीया, जीवन वीमा मार्ग, मुंबई-४०००२१.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

**आयुर्विम्याला पर्याय नाहीं**

daCunha-LIC-60 Mar

नाम-लाओस-कंबोडियाच्या संघराज्याच्या कल्पनेने विएतनाम भारलेला. हा हा म्हणता वातावरण बिघडले; पण फार काळ लढाई तेव्हा चालली नाही. मात्र सहाएक महिन्यात विएतनामने सरळ सैन्य नॉम पेन्हपर्यंत घुसवून पोल पोतला पदच्युतच केले! ही सरळ चीनच्या तोंडात मारलेली चपराकच होती. कारण चार कम्युनिस्टांपैकी रशियाला विएतनाम जवळचा म्हणून चीनने कंबोडियाला दत्तक घेतलेला होता.

त्यामध्येच विएतनाममध्ये असणाऱ्या चिनी वंशाच्या लोकांना मुद्दाम त्रास दिला जात आहे अशा बातम्या प्रसृत झाल्या. विएतनाममधून निर्वासितही मोठ्या प्रमाणात थायलंडमध्ये जाऊ लागले. त्यांच्यात चिनी वंशीयांची संख्या जास्त आहे असा दावा चीनने करायला सुरुवात केली. कंबोडियाच्या ख्मेर रूज राजवटीचा पाडाव अपेक्षेपेक्षा फारच चटकन् झाला आणि जगातही त्याची चीनला अपेक्षित इतकी तीव्र प्रतिक्रिया उमटली नाही. नव्या राजवटीला मान्यताही काही देशांनी दिली. चीनला हे सहन झाले नाही आणि त्याने विएतनामवर पूर्ण तयारीनिशी प्रचंड हल्ला केला!

### हल्ल्याचे गांभीर्य

अगदी ताजी वार्ता आली त्यानुसार चीनने विएतनामच्या चार प्रांतिक राजधान्या जिंकलेल्या होत्या आणि हनोईकडे जाणाऱ्या मार्गावर प्रचंड संख्येने चिन्यांची वाटचाल चालू होती. 'धडा' शिकविणे हा चीनचा उद्देश (त्याच्या मते) आहे. 'धडा' शिकवला का नाही याचा एकमेव निर्णयकर्ता चीनच आहे. कोणत्याही देशाच्या सीमेच्या फार आत घुसणे नेहमीच जड जाते; पण चीनला लोकसंख्येची काळजी नाही. 'तुमच्या गोळ्या संपतील, आमची माणसे संपणार नाहीत!' हे १९६२ च्या युद्धातील चीनचे उद्गार प्रसिद्धच आहेत. तरीही विएतनामची पुनर्वसनाची सद्यःस्थिती ध्यानात घेता हा फटका त्यांना बराच जड जाणार आहे.

दुसऱ्या आघाडीवरही विएतनामला लढायचे असल्याने त्याची पंचाईत झालेली आहे. नाम पेनमधले सत्तांतर झाले पटकन्; पण ते पचवणे कठीण आहे. नवी राजवट काही काळ तरी विएतनामच्या लष्करी पाठिंब्या-खेरीज स्वत:च्या जोरावर स्थिर होऊ शकणार नाही हे ओळखून विएतनामने तेथे घुसलेल्यांपैकी बरेचसे लष्कर पोल पोतवाद्यांना तोंड देण्यासाठी तिथेच ठेवले. पोल पोतचा जरी लोकप्रियतेच्या नावाने अंधार असला तरी कंबोडियाचा प्रिन्स नरोदम सिहनुकला अजूनही थोडाफार पाठिंबा आहे. त्याच्या बाजूने असणारे लष्कर व जनतेचा काही भाग चढाईखोर विएतनामच्या लष्कराविरुद्ध गनिमी काव्याने लढू लागेल. सिहनुकला देंगने केलेले आवाहन या दृष्टीने महत्त्वाचे आहे. चीनमध्येच आज एक रेडिओकेंद्र स्थापून कंबोडियाच्या ख्मेर रूज राजवटीचे अधिकृत रेडिओस्थानक म्हणून चीनतर्फेच कार्यक्रम प्रसारित करण्यात येतात. याच धर्तीवर सिहनुकला हाताशी धरून कंबोडियात अंतर्गत यादवी माजवायची, विएतनामवादी व विएतनामविरोधी अशा या दोन शक्तीत रस्सीखेच सुरू करून देऊन दोन्ही पुरेशा दमल्या की, पोल पोतऐवजी सिहनुकचे बाहुले तिथे बसवून विएतनामला शह द्यायचा असा चीनचा एका दगडात दोन पक्षी मारायचा डाव आहे. या डावाला खीळ फक्त रशियाच घालू शकतो. विएतनाम-रशिया यामध्ये नुकत्याच झालेल्या करारान्वये लष्करी बाबतीत सल्लामसलत करता यते. (त्यासाठीच तो करार झालेला आहे.) रशियाने स्वत: चीनच्या विरुद्ध संयुक्त सीमेवर अजून तरी हालचाल केलेली नाही आणि आन्द्रे ग्रोमिकोची वक्तव्ये वाचता नजीकच्या भविष्यात तो तसे करेल हेही संभवत नाही. ७,२०० किलोमीटर लांबीच्या या सीमेवरून चीनने नागरिक मात्र हालवल्याची बातमी आहे; पण एकूण calculated risk याच स्वरूपात चीनचे हे कृत्य आहे. युद्धातील हानीचे आकडे परस्परविरोधी नेहमीच असतात; पण त्यावरून पूर्ण परिमाणाचे युद्ध सुरू आहे हे उघड आहे.

### परिणाम

खालील प्रमुख परिणाम या कारवाईचे होतात.

१) चीनच्या इतिहासात प्रथमच राजकीयदृष्ट्या प्रतिकूल असणाऱ्या देशाव र कंबोडियासारख्या देशाच्या निमित्ताने चीनने सैन्य घातले आहे. पाकिस्तानने काराकोरम् हायवे पुढेमागे भारताशी युद्ध झालेच तर चिनी सैन्यास येण्यास उपयोगी म्हणून बांधला; पण दोन्ही युद्धांत चीनने कोरडी सहानुभूती दाखवून पाकिस्तानच्या तोंडाला पाने पुसली. आता मात्र त्याने आपण लष्करी कारवाई करायलाही मागेपुढे पहात नाही हे दाखवले आहे आणि आंतरराष्ट्रीय तणावाच्या संदर्भात ही फार चिंताजनक घटना आहे.

२) रशियाने आधुनिक शस्त्रसामुग्री व व लष्करीतज्ज्ञांची मदत एवढ्यावरच विएतनामला सहकार्य दिले आहे. जागतिक युद्ध पेटण्याची शक्यता असल्याने म्हणा किंवा स्वत:ची लष्करी तयारी नसल्याने म्हणा, रशियाने जी भूमिका घेतली आहे ती विएतनामच्या दृष्टीने कृतघ्नतेचीच आहे. कारण हनोईपासून ऐंशी कि.मी.वर चिनी सैन्य थडकूनही रशिया अजून त्याला पायबंद घालत नाही हे उघड आहे. रशियाची विश्वासार्हता कमी होण्याची शक्यता आहे.

३) विएतनामने फारसे सबळ कारण नसताना नको तिथे नाक खुपसले आणि त्याचे फारच गंभीर परिणाम त्याला भोगावे लागत आहेत. चीनविरुद्धचा द्वेष व संशय वंशभेदापासून विएतनामच्या रक्तात मुरलेला आहे. तो परत उफाळून आलेला आहे; पण खऱ्या अर्थाने अलिप्त रहाण्याचा धडा विएतनाम शिकेल अशी शक्यता आहे. (अर्थात् इथे चीनला तो अधिकार कोणी दिला हा प्रमुख प्रश्न आहेच.)

४) कंबोडियात दीर्घ काळ जर अंतर्गत फूट चालू राहिली आणि आता जरी विएतनामला तेथून सैन्य काढून घ्यावे लागले असले, तरी त्याच्या बाजूचे असे काही लोक तिथे आहेतच. त्यांच्यात व विएतनामविरोधकांच्यात लढाई पेटली तर कंबोडिया फुटण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

५) चीनच्या नव्या रूपाने आग्नेय आशियातील सत्तासमतोल बिघडला आहे. विशेषत: Association of South East Asian Nations (ASEAN) या संघटनेचे सभासददेश-थायलंड, फिलिपाइन्स, मलेशिया, सिंगापूर आणि इंडोनेशिया यांना जपान-रशिया करारामुळे वाटत असलेल्या भीतीमध्ये चीनच्या भीतीची भर पडली आहे. कंबोडियावर विएतनामने हल्ला केल्यावर

पृष्ठ २० वर

# गॉर्की कॉलनी

लेखक : ए. एस. मकरेन्को । अनुवाद : मीनाक्षी कोल्हटकर

कथासूत्र : कॉलनीत शेती सुरू करण्याची स्वप्नं रंगायला लागली. एक दिवस ओक वृक्षाची लाकडं आणायला सगळे जण गेले असताना त्या ठिकाणी असलेली सांठ एकर जमीन त्यांच्या मनात भरली. तिथेच पडलेली एक भली मोठी टाकीही मनाला भुरळ पाडीत होती. शेवटी स्थानिक कमिटीकडून जागा ताब्यात घ्यायला मंजुरी मिळाली. थोड्याच अवधीत एक धष्ट-पुष्ट उमदा घोडाही आयताच मिळाला आणि या नव्या जागेत ट्रेपकेवाडीत शेतीला सुरुवात झाली. सोफ्रोन गोलोवान हा लोहार कॉलनीत आला आणि कॉलनीला एक नवं चैतन्य प्राप्त झालं.

पण कॉलनीत नव्याने भरती झालेल्या मुलांनी कॉलनीतलं सामुदायिक जीवनसत्त्व मुळापासून हादरवलं. एका रात्री तर डॉरमिटरीत सुऱ्यांनी भोसकाभोसकीही झाली. शेवटी शोब्रोट या मुलाला आन्तोनने कॉलनीतून घालवून दिलं. महिन्यानंतर तो अतिशय दीनवाणा होऊन परत आला. आन्तोननेही त्याला क्षमा केली. पुन्हा एकदा डॉरमिटरीत चैतन्य निर्माण झालं.

## प्रकरण नववे

## युक्रेनमध्ये अद्याप स्त्रीदाक्षिण्य अस्तित्वात आहे

एका रविवारी असादची दारू पिऊन आला. तो सर्वांना डॉरमिटरीत त्रास देऊ लागला म्हणून त्याला माझ्याकडे पाठवून दिला. तो माझ्या खोलीत बसून नशेच्या तारेत बडबडत बसला होता. त्याच्या-बरोबर संभाषण चालू ठेवणे अशक्यच होते. मी त्याला मुकाट्याने झोपायला सांगितले. ते त्याने ऐकले व मग मी त्याला तिथेच ठेवले.

तिथून मी मुलांच्या डॉरमिटरीत गेलो. तर काय ? तिथेही दारूचा चांगलाच वास येत होता. काही मुले माझ्या आसपास फिरकायचे टाळीत होती. पुढाकार कोणाचा असावा हे सांगणे कठीण होते.

मी इकडे तिकडे पहात म्हटले, ' असादची काही एकटाच प्याय-लेला दिसत नाही. त्याला बरेच साथीदार असावेत असं वाटतंय. '

बऱ्याच दिवसांनी पुन्हा एकदा काहीजण पिऊन आले. काही-जणांनी मला टाळले; पण काही थोडे माझ्याकडे येऊन त्या नशेत पाघळायला लागले. माझ्यावर प्रेम असल्याचेही त्या नशेत सांगू लागले. आपण आजूबाजूच्या परिसरात जाऊन नशा-पाणी करतो असे त्यांनी अगदी निर्लज्जपणे सांगितले.

दुसऱ्या दिवशी डॉरमिटरीत ' दारू पिण्याचे दुष्परिणाम ' यावर मोकळी चर्चा झाली. पिण्याचा विक्रम केलेल्यांनी आपण आता पिणार नाही असे कबूल केले आणि या त्यांच्या शब्दांवर आपला विश्वास बसल्याचा मी पण बहाणा केला; परंतु आतापर्यंतच्या माझ्या अनुभवावरून या पोरांना बडवून दारूपासून परावृत्त करणे कठीण आहे, असे मला वाटत होते. त्याच्या उलट, म्हणजे दारू बनविणाऱ्यांचाच समाचार घेणे अत्यंत जरुरीचे आहे असे मी मनाशी ठरविले.

ते लोक आमच्यापासून फार दूर नव्हते. मला नुकतेच कळले होते की, आमच्या आजुबाजूला दारूच्या भट्ट्या राजरोस चालत. प्याय-लेली माणसे पुष्कळदा कॉलनीत येत. कॉलनीतला गोलोवान मुलांना जवळपास दारू आणण्यासाठी पाठवीत असे. त्याला विचारले असता त्याने कबूल केले व उलट विचारले, ' मी प्यायलो म्हणून तुमचं काय गेलं ? '

कालिनाने दारूला कधी स्पर्शही केला नव्हता. तो चिडून एकदम ओरडला, ' सोविएत सरकार कशासाठी स्थापन झालंय ? तुम्हाला हातभट्टीची दारू पुरविण्यासाठी ? '

यावर गोलोवानला चटकन् उत्तर सुचले नाही. तो जागच्या जागी चुळबुळ करीत राहिला. काही तरी आठवून त्याने विचारले, ' कोण पीत नाही ? सारेजण हवं तेवढं पितात. प्रत्येकाकडे भट्टी आहे. मग सोविएत सरकारनं पिणंच अजिबात बंद करून टाकावं. '

' सोविएत सरकार दारू पितं ? सारेजण शहरात, खेड्यात कुठेही बघा. '

'इथं दारू कोण कोण विकतं ते तुला ठाऊक आहे का?' असे सोफ्रोनला विचारता तो म्हणाला,

'मला काय ठाऊक? मी कधी कुणाला विकत आणायला पाठविलं नाही. तुम्हाला पाहिजे तर तुम्ही पाठवा. मला कशाला विचारता? जसे काही तुम्ही सारी दारू जप्त करणार आहात?'

'तुला काय खोटं वाटलं? मी नक्कीच करीन ते!'

'हं! आतापर्यंत थोडी का उपाययोजना झाली? पण सारं निष्फळ ठरलंय.'

दुसऱ्या दिवशी मी शहरात जाऊन ऑफिसातून परवाना काढून आणला. मी पक्का निश्चय केला की, आमच्या गावाच्या आसपासच्या भागातल्या साऱ्या चोरटचा भट्टचा अगदी उखडून काढायच्याच.

त्या रात्री मी व कालिनाने आपापसात विचारविनिमय केला; पण कालिना नेहमीप्रमाणे तेवढासा तयार नव्हताच.

'आन्तोन, कशाला त्या भानगडीत पडतोस? माझं ऐक. ते सारे चोर आहेत चोर! अगदी आपल्या गावच्या पाटलापासून सारेजण! तूही त्यांना चांगलं ओळखतोस. साले! नांगराला घोड्याऐवजी बैल वापरतात, सोडून दे! यातून काहीही निष्पन्न होणार नाही. सारे अधिकारी त्यांच्या हातात आहेत.'

'अरे, पण मला समजत नाही तुझं बोलणं, या सगळ्यांचा त्या भट्ट्यांशी काय संबंध कालिना?'

'तू तर महाविक्षिप्त आहेस! तुम्ही शिकलेले लोक; अहो, त्यांच्या हातात सत्ता आहे! त्यांना दुखविण्यात अर्थ नाही, ते उद्या तुलाच पिटून काढतील; त्यांचा नाद सोडून दे!

त्या दिवशी मी मुलांच्या डॉरमिटरीत जाऊन पोरांना सांगितले, 'बाबांनो, मी काही तुम्हाला दारू पिण्याची सवय लावू देणार नाही. इतकेच नव्हे तर आसपासच्या गावातील साऱ्या चोरट्या दारूच्या भट्ट्या उखडून टाकायचं मी ठरविलंय. माझ्याबरोबर कोण कोण येणार ते बोला.'

प्रथम जरा बरेचजण गोंधळात पडले; पण मग काही जणांनी माझ्या सूचनेचे स्वागत केले.

'उत्तम कल्पना आहे, या लोकांना धडा शिकवायला हवाच आहे.' काराबानोव म्हणाला.

मी त्यातून झादारोव्ह, वोल्कोव व तारानेटस् या तिघांची निवड केली.

शनिवारी रात्री उशीरापर्यंत बसून आम्ही धाड कशी घालायची त्याचा आराखडा तयार केला. तारानेट आराखडा बघता बघता डोके खाजवीत होता. तो एकदम म्हणाला, 'आन्तोन, आपण एकाच घरावर धाड घातली तर बाकी सारेजण आपल्या भट्ट्या लपवून ठेवतील. येवढेजण पुरेसे नाहीत.'

'म्हणजे घराघरातून भट्ट्या आहेत काय?'

'अर्थात मौसी ग्रेच्यानी, आड्रेई कारपोविच, ग्रेच्यानी. खुद्द आमचा सोविएतचा अध्यक्षसुद्धा त्यातलाच! हे सारे दारू बनवितात आणि यांच्या बायका शहरात नेऊन ती विकतात.'

'मला वाटतं आपण आणखी थोडेजण बरोबर घेऊ या, नाही तर ते आपल्याला मारझोड करतील व सगळाच मामला फसेल.'

वोल्कोव तिथेच एका कोपऱ्यात जांभया देत बसला होता. तो उसळून म्हणाला, 'हूँ, तो काय आम्हाला मारणार? शहाणाच आहेस. काही नाही, आणखी फक्त काटावानोवला घेऊ या. कोणी आम्हाला मारणार नाही. मी चांगला ओळखतो या चोरांना; ते आम्हा सर्वांना वचकून आहेत.'

वोल्कोव्ह तसा भाग घ्यायला फारसा उत्सुक नव्हता. माझ्यापासून हा पोर जरा दूरच राही. त्याला एकंदर शिस्तीचा तिटकारा होता; पण तरीही झादारोवबद्दल त्याच्या मनात एक प्रकारचा ओलावा होता. तो सांगेल ते ते तो ऐके.

झादारोवने नेहमीप्रमाणे त्याचे विश्वसनीय हास्य केले. त्याला आपली शक्ती वाया न घालविता काम करण्याची लकब होती. तसेच आपले व्यक्तिमत्त्वही तो वाया घालवीत नसे. नेहमीप्रमाणे दुसऱ्या कोणापेक्षाही झादारोववर माझा अतीव विश्वास होता. माझी खात्री होती की, तो कोणत्याही त्यागाला तयार राहील, त्यातही आपले व्यक्तिमत्त्व जराही वाया न घालविता.

तो तारानेटकडे वळून म्हणाला, 'उगाच वटवट नको. फ्योदर, कुठच्या झोपड्यांवर प्रथम धाड घालायची व कसं जायचं ते ठरवा. मग बाकी पुढचं पुढं पाहू. व्होल्कोव्हचं म्हणणं बरोबर आहे. काराबानोव्ह आपल्याबरोबर हवाच! त्याला त्या शेतकऱ्याबरोबर बोलायची रीत बरोबर ठाऊक आहे; कारण तो एके काळी त्यातलाच होता. आता लवकर झोपू या. ते सारेजण पिऊन तर्रर व्हायच्या आत. उद्या आपल्याला लवकर उठायचंय व तिथे पोचायचं आहे. खरं ना ग्रेच्यान्को?'

'होय तर!' असं म्हणून वोल्कोव्ह खुलला.

आम्ही उठलोच. लिडोचका व एकातेरीना बाहेर फिरत होत्या. लिडोचकाने मला हाक मारली,

'आन्तोन, मी ऐकते ते खरं का? तुम्ही म्हणे आसपासच्या लोकांना त्यांच्या भट्ट्या मोडण्यासाठी देवाची भीती घालणार आहात. हे कुठलं वेड तुमच्या डोक्यात शिरलं? याला काय शिक्षणतंत्र म्हणतात? ही तर विकृती झाली!'

'त्यालाच मी नवं शिक्षणतंत्र समजते. तू उद्या आमच्याबरोबर चल बघायला.'

'मी काय घाबरते असं वाटलं तुम्हाला? मी नक्की उद्या तिथं हजर होते; पण हे शिक्षणतंत्र नव्हे हं!'

'तू खरंच येशील?'

'अगदी नक्कीच येईन!'

एकातेरीना एवढा वेळ गप्प होती. ती म्हणाली, 'त्या पोरीला कशाला नेतोस बरोबर?'

'माझा निर्णय पक्का हं! आन्तोन, मी येणारच!' असे लिडोचका म्हणाली.

असे आमचे पाचजणांचे पथक जायचे ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता आम्ही सर्वांत जवळच्या शेजाऱ्याचे दार प्रथम ठोठावले. आमचे जाणे म्हणजे जणू काही कसली तरी बोलणी करायला जाण्यासारखेच होते.

आमची कृती अगदी बरोबर व योग्यच होती. जवळचा शेजारी आन्द्रेइ हा थोडा टक्कल पडलेला, दाढी चापूनचोपून बसविलेला असा होता. त्याने पुढे येऊन दरवाजा उघडला व विचारले, 'आज

का येणं केलंत ?' तो अगदी निर्विकार चेहऱ्याने पहात होता.

मी पुढे होऊन सांगितले, 'तुमच्याकडे बेकायदा दारू बनविण्याची भट्टी आहे व ती उखडून काढायची आम्ही ठरवलंय. त्यासाठी योग्य तो परवाना मी जिल्हा कमिटीकडून घेऊन आलोय!'

'बेकायदा भट्टी ?' असे आश्चर्योद्‌गार काढून आन्द्रेइने आमच्या चेहऱ्यांवरून व आमच्या मुलांच्या चित्रविचित्र पोषाखावरून नजर फिरविली.

पण याच वेळी आमचा तांडा हुश्शार झाला. काराबानोव गफारच्या बाजूने भट्टीच्या दिशेला आत घुसलाच. जाता जाता त्याने आणलेल्या काठीचा प्रसाद गफारच्या कुत्र्याला दिला त्यामुळे ते कुत्रे केकाटू लागलं आणि त्याला साथीदार मिळाले. एकंदर सातव्या पट्टीत त्या सर्वांचा सूर लागला.

त्या कुत्र्यांना बाजूला करून आम्ही पुढे सरकलो. वोल्कोव त्यांच्या अंगावर त्याच्या चिरक्या आवाजात जोराने ओरडला. त्याबरोबर ती कुत्री बाजूला झाली; परंतु त्यांचे केकाटणे अजून चालूच होते. काराबानोव झोपडीच्या आत पोचलाच होता. त्याने विजयी मुद्रेने दाखविले.

'ही पाहिलीत भट्टी ?'

गफार जोरजोराने झोपडीच्या आत फेऱ्या घालू लागला.

'तुम्ही काल भट्टी लावली होती काय ?' असे झादारोवनं विचारलं.

'होय, होय. लावली होती.' असे दाढी कुरवाळीत पण अर्धवट स्वगत असे तो बोलला. त्याचं सारं लक्ष तारानेटकडे होते; कारण तो एक गॅलनची भलीमोठी बाटली बाहेर ओढून काढून पहात होता. त्यात जांभळया रंगाचा द्रव होता.

गफार एकदम चिडला व तारानेटच्या बाजूला धावला. त्याला वाटले तारानेटला त्या कोपऱ्यात सहज पकडता येईल. त्याने तारानेटला पकडलं; परंतु त्याला चुकवून ती बाटली तारानेटने सावकाशपणे झादारोवच्या हातात दिली व इतक्या सगळया घडपडीनंतर गफारला तारानेटचे छद्मी हसू दिसू लागले.

'मारा, मारा! काका, मारा ना!' तारानेट.

गफार आणखीनंच चिडला. 'तुम्हाला असं करताना शरम वाटली पाहिजे! लोकांच्या घरात शिरून खुशाल चोऱ्या करता आणि तुमच्याबरोबर तुमची पात्रंही घेऊन येता. आम्हाला तुमच्यामुळे जराही शांतपणा मिळत नाही. तुमचं एकदा कधी निःसंतान होणार?'

काराबानोव त्याला वेडावीत म्हणाला, 'तुम्ही अगदीच शीघ्रकवी दिसताहात!'

काराबानोव अगदी शिस्तीत काठीवर रेलून गफारच्या समोर उभा होता.

'माझ्या घरातून चालते व्हा पाहू तुम्ही. चोर साले!' असं म्हणून त्याने एक लोखंडी तिवई हातात घेऊन ती वोल्कोवच्या खांद्यावर आदळण्याचा प्रयत्न केला. वोल्कोवने हसून ती वरच्यावर पकडली आणि त्याला 'तिकडे काय मिळालं ते बघ!' असं सांगितलं.

गफारने पाहिले तर तेच हसू तोंडावर ठेवून तारानेटनं आणखी एक बाटली कट्टयावरून खाली काढली. ते पाहून गफारची मान झुकली व तो शेजारच्या बाकावर धापकन बसला. लिडोचका त्याच्या बाजूला बाकावर बसली. त्याला समजावणीच्या सुरात ती म्हणाली, 'आन्द्रेइ कारपोविच, हे बेकायदा आहे, हे ठाऊक आहे ना? शिवाय तुम्ही दारूसाठी धान्य वाया घालविता आणि आजूबाजूला कित्येक लोक अन्नावाचून उपाशी मरताहेत!'

'हो!' काम करणारे काही उपाशी नाही रहात. जे काम चुकवतात त्यांना उपास पडणं योग्यच आहे.'

'तुम्ही मोठे कामगार नाही का गफारसाहेब? तुम्ही तरी कुठं काम करता? स्तेपान नेचिपोरेन्को हा काम करतो, होय की नाही?'

'स्तेपान? कोण म्हणतो स्तेपान म्हणून?'

'होय. तोच स्तेपान, ज्याला तुम्ही इथून घालवून दिलंत. त्याला पगार दिला नाही. त्याचे कपडे दिले नाहीत आणि तो बिचारा आमच्या कॉलनीत यायला मागतोय.'

तारानेटस बोलत बोलत खाली उतरला.

'या साऱ्याचं काय करायचं?' असे झादारोवने त्याला विचारले.

'ते सारं मोडून, तोडून टाकायचं.'

'भट्टीसुद्धा?'

'हो, भट्टीसुद्धा!'

गफार आपल्या जागी बसून होता. तो पुढे आला नाही. लिडोचकाने त्याला सामाजिक, आर्थिक आणि मनोवैज्ञानिक शास्त्रांचा मोठा डोस पाजला होता. ती सारी कुत्री जणू काही गफारच्या आवाराची मालकच होती व आम्ही जेव्हा बाहेर पडलो तेव्हा त्यांनी उगाचच जरा भुंकण्याचे सोंग केले.

झादारोव्हने तेवढयात समयसूचकता दाखवून लिडोचकाला गफारच्या झोपडीतून बाहेर काढले व 'आमच्याबरोबर चल पाहू, नाही तर हा गफार तुझा चांगल्यापैकी खिमा बनवील!' असं सांगितलं.

लिडोचका चटकन बाहेर आली. गफारला दिलेल्या व्याख्यानामुळे ती जणू भारावून गेली होती. ती सांगू लागली, 'खरंच! त्याला भट्टी चालवणं हे बेकायदा कृत्य आहे हे जाणवलं, बरं का!

मुलांनी मोठयाने हसून लिडोचकाला सांगितलं, 'वाहवा! वाहवा बाई, त्याला तुमचं म्हणणं पटलं हं! फारच उत्तम!! तुम्ही आणखी थोडा वेळ थांबला असता तर मला वाटतं त्यानं आपणहून ती भट्टी तोडून टाकली असती. काय, बरोबर आहे ना?'

यावर तारानेट म्हणाला, 'नशीब समजा, त्याची बायको घरी नव्हती. ती गोवच्यायेन्का गावात देवळात गेली होती. नाही तर समजलं असतं. आता वेरखोलाबाईशी तुम्हाला सामना द्यायचाय. सांभाळा जरा!'

दुसरा असामी वेरखोला ऊर्फ ल्यूका सेमियानोविच हा वरचेवर या ना त्या निमित्ताने कॉलनीत येत असे. आम्हीसुद्धा त्याच्याकडे कित्येकदा आमच्या छोटया गरजांसाठी जात असू. उदा. घोडयाची कॉलर किंवा कधी बैलगाडी किंवा एखादी टाकी वगैरे दुरुस्त करण्यासाठी. ल्यूका तसा मोठा धोरणी होता व सर्वांशी जमवून घेण्यात पटाईत होता. दिसायला तो बऱ्यापैकी होता. त्याने आपली कुरळी दाढी अतिशय व्यवस्थित ठेवली होती. त्याला तीन मुलगे होते. त्यापैकी मोठा इवान. तो अॅकॉर्डियन वाजविण्यात पटाईत होता व आसपासच्या परिसरात याबद्दल त्याची ख्याती होती.

ल्यूकाने आमचे अगदी मनःपूर्वक स्वागत केले.

'या, या मंडळी. बसा, बसा ! मला माहीत आहे तुम्ही मंडळी भट्टया उडविण्याच्या मोहिमेवर आहात. खरं ना ? चांगली गोष्ट आहे. बसा तर खरं ! तुम्हाला ट्रेपकेवाडी दुरुस्त करायला गवंडी मिळाला का ? नाही तर मी उद्या ग्रीगादीरोवका शहरात जाणार आहे. तेव्हा पाहून येईन कोणी चांगला गवंडी ! अरे, पण बसत का नाही तुम्ही ? माझ्याकडे भट्टीबिट्टी नाही हं ! मी असले धंदे करीत नाही. आपल्या सोविएत सरकारचा त्याला विरोध आहे. मी ते जाणतो आणि ते अगदी बरोबर आहे. अग ए, बाहेर ये ! ही आपलीच माणसं आहेत. घाबरू नकोस ! '

एक भलेमोठे पातेले भरून चक्का व एक बशी भरून केक लुकाने टेबलावर ठेवले आणि कुठल्याही तऱ्हेने न लाजता सर्वांना त्याचा समाचार घ्यायला सांगितले. लुकाला मिठ्ठास बोलण्याची व वागण्याची लकब होती. मला दिसले की, ते पदार्थ पाहून आमची पोरे पाघळली. वोल्कोव व तारानेटस् ते पहाण्यात अगदी गुंग झाले. झादारोव्ह दारात उभा राहिला. त्यानं ओळखलं की आता ही परिस्थिती पेचात टाकणारी आहे. काराबानोव माझ्या शेजारी बसला व माझ्या कानात पुटपुटला, 'साला ! काय हरामी आहे ! पण काही म्हणा आन्तोन,' आपल्याला तर हे खाल्ल्याशिवाय रहावणार नाही. अगदी कबूल करतो बुवा आपण. तुम्ही काहीही म्हणा !'

' ल्यूकाने एक खुर्ची ओढून झादारोवला बसायला सांगितलं; ' बसा मंडळी, खरं तर यावर उत्तम पेय पाहिजे; पण तुम्ही तर त्याच्या विरोधी मोहिमेवर निघाला आहात ! '

झादारोव मान खाली घालून माझ्यासमोर खुर्चीवर बसला व हळूच त्याने एक मोठा केकचा तुकडा तोंडात कोंबला – तारानेटचे तोंड तर संपूर्णपणे चीजने माखले होते. बोल्कोव जराही उसंत न घेता खातच राहिला होता.

' अग, आणखी आण ना थोडे केक ! ' ल्यूकाने आपल्या बायकोला फर्मावले.

' अरे इवान, तुझं अॅकॉर्डियन जरा ऐकव आपल्या पाहुण्यांना !'

' चर्चमध्ये प्रार्थना चालली आहे ना ?'ल्यूकाची बायको म्हणाली.

' असू दे ग ! त्यात काय बिघडलं ? पाहुण्यांसाठी वाजवायला हरकत नाही रे, वाजव तू ! '

इवानने ' चांदण्या रात्री ' ही गत वाजवली. काटाबानोव खूप हसला व म्हणाला, ' छान झाला हं पाहुणचार ! '

पाहुणचार झाल्यावर ल्यूका संभाषणाकडे वळला. ' ट्रेपके इस्टेट ताब्यात घेण्याचा जरूर विचार करा हं. मी त्या बाबतीत तुम्हाला जी काही मदत शक्य होईल ती करायला तयार आहे. तुम्ही उगीच या जंगलात जास्त दिवस राहू नका ! मी तुम्हाला तिथं जरूर मदत करीन ! तिथं जरूर लवकर हलवा सारं. तिथं एखाद्या भक्कम व्यक्तीची फार जरुरी आहे. तिथली ती पवनचक्की तुम्ही ताब्यात घ्या. त्याचं काय – कार्यकारी मंडळ आहे; पण त्यांना काही ते धंदा या दृष्टीनं नीट चालवता येत नाही हं. आजूबाजूच्या शेतकरी लोकांना आटा मिळत नाही, काही नाही. आता ईस्टर जवळ आला. लोकांना चार पदार्थ बनवायचे तर मुख्य आटाच नाही मुळी मिळत ! ते रोजच्या रोज तेथे खेपा घालतात. असंच तिथे चाललेलं आहे. लोकांना खायला तर मिळालं पाहिजे आणि आटा नसला तर गोडधोड कुठून बनविणार ? '

' आमच्याजवळ अजून एवढी साधनसामुग्री नाही हो ! ' असे मी म्हटले.

' असं कसं म्हणता ? तुम्हाला मदत जरूर मिळेल. आजूबाजूच्या परिसरात लोक तुम्हाला खूप मानतात हं. माहीत आहे, तुमच्याबद्दल लोक फार चांगलं बोलतात. '

हे इकडे बोलणे चालले होते तेवढ्यात तारानेटस् आत घुसला. त्याच्या हातात भट्टीचा काही भाग होता. त्याच्या पाठोपाठ ल्यूकाच्या घरवालीचा कर्कश आवाजात तणतणाट चालला होता. तारानेटस् आमच्यातून केव्हा उठून गेला ते संभाषणाच्या ओघात आम्हाला समजलेच नव्हते.

' मला ही वरच्या खिडकीत सापडली आणि तिथे तयार मालपण आहे. अजून चांगला गरम आहे. ' तारानेटस् म्हणाला.

ल्यूकाने आपली दाढी कुरवाळायला सुरुवात केली आणि तो जरा गंभीर झाला. दुसऱ्याच क्षणी काही झालेच नाही असे दाखवीत ल्यूका तारानेटस पुढे उभा राहून कान खाजवीत, डोळा उडवीत व तोंडावर हास्याचा आव आणून म्हणाला, ' हा तुमचा पोरगा खरोखर हुषार आहे. फार पुढं येईल तो ! असो, आता खरं तर बाहेर आलंच आहे. मला काही राग येणार नाही. कायदा तो कायदा ! भट्टी तुम्ही तोडून टाका ! चल, इवान त्यांना मदत कर. '

पण ल्यूकाची बायको वेरखोलीखा या आपल्या साधुपणाचा आव आणणाऱ्या नवऱ्याचे मानभावी बोलणे ऐकायला तयार नव्हती. तिने तारानेटसच्या हातातली नळी ओढून घेतली.

' कोण मोडतोय माझी भट्टी ते पहाते ! हरामखोरांनो, निघा येथून नाही तर टाळकी सडकीन एकेकाची. '

वेरखोलीखाची वटवट चालूच होती. लिडोचका इतका वेळ गप्प होती. तिने शांतपणे वेरखोलीखाशी बेकायदा दारू गाळण्याबद्दल बोलायचा प्रयत्न केला.

पण वेरखोलीखा काही अशी तशी ऐकणारी नव्हती, पोरांनी साऱ्या बाटल्या फोडून टाकल्या होत्या. काराबानोवने लोखंडी सळईने भट्टीचे राहिले-साहिले भाग तोडून टाकले. ल्यूकाने आम्हाला निरोप देताना पुन्हा जरूर येण्याचे आमंत्रण दिले. झादारोवने इवानशी हस्तांदोलन केले. इवान अॅकॉर्डियनवर शेवटचे सूर वाजवीत होता. इकडे वेरखोलीखा आरडाओरडा करीतच होती. आम्हाला नव्या नव्या असली शिव्या देत होती. आजूबाजूच्या झोपड्यांतल्या आया-बाया घाबरून आमच्याकडे पहात होत्या. पुरुषमंडळी रागाने आपल्याशीच चडफडत होती. या सगळ्यांच्या जोडीला कुत्री जोराने भुंकत होती. ती साखळीने वईला बांधलेली असल्याने सुटण्यासाठी धडपड करीत होती.

आम्ही रस्त्यावरती आलो. काराबानोवला उभेही रहावत नव्हते व तो एका कुंपणावर अडखळला.

' अरे देवा ! मी मरणार ! पाहुणेमंडळी, तुम्ही खच्चून खाल्लंय ना ? तुमच्या पोटात दुखतंय का रे वोल्कोव्ह ?' काराबानोवने विचारले.

त्या दिवशी संध्याकाळपर्यंत आम्ही सहा भट्टया तोडल्या. आम्हाला तसा काही त्रास झाला नाही. शेवटच्या झोपडीपाशी आम्हाला सर्गेइ पेट्रोवीच ग्रेच्यानी, गाव सोविएतचा अध्यक्ष भेटले. त्यांचे ते काळे-

लांब केस व वळवलेल्या मिशा यामुळे ते एखाद्या कोसॅकसारखा दिसत. तरुण वयातच ते उत्तमपैकी शेतकरी व सततोद्योगी म्हणून पुढे आलेले होते. आम्हाला लांबूनच पाहून त्यांनी ओरडून थांबण्याची खूण केली. आम्ही सारे थांबलो.

'नमस्ते! आपल्याकडे कसला परवाना आहे हे विचारू शकतो का? आपण म्हणे लोकांच्या घरात शिरून त्यांच्या भट्टया व साठे तोडताहात असे कळलं. हा अधिकार तुम्हाला कोणी दिला ते कळेल का?'

बोलता बोलता त्यांनी आपल्या मिशीला पीळ भरला व आम्हा सर्वांकडे रोखून पाहिले.

मी काहीएक ना बोलता परवान्याचा कागद त्यांच्यापुढे धरला. त्यांनी तो हातात धरून दोन-तीन वेळा उलटसुलट केला व नाखुषीने माझ्याकडे परत दिला.

'असं! एकंदरीत हा परवाना आहे तर ठीक आहे; परंतु लोक मात्र तुमच्यावर फार नाराज आहेत हं! अशा तऱ्हेनं कुठलीही कॉलनी कायदा हातात घेऊ लागली तर सोविएत सरकारचं काय होणार कुणास ठाऊक? मीसुद्धा खरं तर या चोरट्या दारू गाळण्याच्या विरुद्ध आहेच!'

'तरीही तुमच्याकडे एक भट्टी आहेच!' असे तारानेटस सावकाशपणे म्हणाला.

अध्यक्षमहाराजांनी एक जळजळीत कटाक्ष तारानेटसकडे फेकला व म्हणाले, 'जास्त शहाणपणा करू नकोस! तू स्वतःला कोण समजतोस? ही गोष्ट आम्ही वरच्या अधिकाऱ्यापर्यंत नेऊ व अशा कॉलनीतल्या मुलांना स्थानिक अधिकाऱ्यांचा उपमर्द करायची परवानगी मिळाली आहे काय, त्याची चौकशी करू!'

आम्ही दोन दिशांनी गेलो. तो आपल्या उद्योगाला व आम्ही आमच्या घराकडे परतलो. या आमच्या उपक्रमाचा चांगला परिणाम झाला. दुसऱ्या दिवशी झादारोवने आमच्याकडे येणाऱ्या गिऱ्हाइकांना म्हटले, 'पुढच्या रविवारी आम्ही सारे पन्नासजण धाड घालायला येणार आहोत.'

त्यावर त्या खेडुतांनी दाढ्या कुरवाळीत घाईघाईने सांगितले, 'जरूर या! धान्याची यात खरोखरच नासाडी होतेय. विगरपरवाना दारू गाळायला जर सोविएत सरकारने बंदी घातली आहे तर त्याची अंमलबजावणी पुरेपूर झालीच पाहिजे.'

अशा तऱ्हेने कॉलनीतील मुलांचे दारू पिणे बंद झाले; परंतु दुसऱ्या एका नवीन प्रकाराला तोंड देण्याची पाळी आली. ती म्हणजे जुगार. पुष्कळशी मुले जेवताना पाव घेत नसत. खोलीची साफसफाईसारखी कामे काही विशिष्ट मुलांकडून केली जात.

एक दिवस एकाला हटकून विचारले, 'तू आज साफसफाई का करतोस? आजची पाळी इवानोवची आहे.' त्यावर त्याने चटकन् उत्तर दिले, 'आजचाच दिवस करीत आहे.' पण आमच्या लक्षात एक गोष्ट आली की, एकाचे काम दुसरा विनंती करून करताना दिसला आणि असे नेहमीच होऊ लागले. कित्येक मुले आपल्या वाट्याचे जेवण न जेवता दुसऱ्या कोणाला तरी देत असलेले दिसून आले.

जुगाराचा उद्भव आमच्या या उन्मार्गी मुलांच्या कॉलनीत होणे म्हणजे एक महासंकटच. जुगाऱ्याला सामान्य जीवन मानवत नाही. त्याला सतत साठा ठेवायची आवश्यकता भासते व हा साठा विनकष्टाने मिळविण्याची त्याची धडपड चालू असते. हा साठा मिळविण्याचे सर्वांत उत्तम साधन म्हणजे चोरी! या जुगाराचा नायनाट करण्याचा मी निश्चय केला.

ओवचारेन्को हा मोठा आनंदी दिसणारा मुलगा. एकाएकी कॉलनी सोडून तो पळून गेला. मला चौकशी करता काहीही पत्ता लागला नाही. दुसऱ्या दिवशी हाच मुलगा शहरातल्या बाजारात भेटला. मी त्याला विनवले, 'तू कॉलनीत परत चल!' परंतु कॉलनीत यायचे त्याने साफ नाकारले. त्याला परत यायला तोंडच नव्हते हे त्याच्या एकंदर बोलण्यावरून माझ्या लक्षात आले.

जुगारामध्ये कर्ज काढणे ही गोष्ट म्हणजे आमच्या कॉलनीतल्या मुलांमध्ये एक बहुमान समजला जाऊ लागला. याउपरही हे कर्ज परत न करणे हे त्याहीपेक्षा मोठेपणाचे लक्षण समजले जाई. यापायी एकमेकात मारामारी व बदनामी करणे अपरिहार्य होऊन बसले.

मी कॉलनीत परत आल्यावर मुलांना संध्याकाळी विचारले, 'ओवचारेन्को का पळून गेला?' यावर मुले म्हणाली—

'आम्हाला काय माहीत?'

'तुम्हाला सर्व काही माहीत आहे.' असं त्यांना मी ठासून सांगितले. त्यानंतर यावर कोणीच काही बोलले नाही.

त्या दिवशीच रात्री कालिनासाहेबांची मदत घेऊन मी सगळीकडे सबंध कॉलनीभर कसोशीने तपास केला. आणि आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. मुलांच्या उशीखाली, ट्रंकांतून, पेट्यांमधून, खिशांमधून दडविलेल्या अनेक वस्तू विशेषतः साखर वगैरे हस्तगत झाली. या सगळ्यांमध्ये बुरुन सगळ्यात जास्त श्रीमंत होता. त्याने आमच्याच वर्कशॉपमध्ये करून घेतलेल्या पेटीमध्ये तीस पौंड सापडले. सगळ्यात गंमतीची गोष्ट म्हणजे मिटचागिनच्या उशीखाली एका कातडी टोपीमध्ये पन्नास रुबल एवढी तांबे व चांदीची नाणी सापडली.

बुरुनने कबूल केले की, ती सारी संपत्ती त्याने पत्त्याच्या जुगारांत मिळवली होती.

'दुसऱ्या मुलाकडून मिळवली होतीस काय?' असे विचारता त्याने 'होय' असे उत्तर दिले.

मिटचागिननं मात्र 'आपण काहीही सांगणार नाही.' असं उत्तर दिलं.

मोठ्या प्रमाणावर साखर, निरनिराळ्या वस्तू, अंगरखे, हातरुमाल व लहान–मोठे बटवे आमच्या तीन मुली रहात असलेल्या खोलीत सापडले. या तिघीजणी म्हणजे ओल्या, राबूसा, मरुस्या अशा होत्या. या वस्तूंचे मूळ मालक कोण हे या मुलींनी सांगण्याचे नाकारले. ओल्या आणि मरूस्या ह्या दोघी खूप रडल्या; परंतु राबूसाने मात्र तोंड उघडण्याचे नाकारले.

आमच्या कॉलनीत या तीनच मुली होत्या. या तिघींनाही कमिशनने चोरी करण्याच्या अपराधाबद्दल आमच्याकडे पाठवून दिलं होतं. या तिघींपैकी ओल्या हिला एक अत्यंत वाईट काम करण्याच्या अपराधाबद्दल पकडण्यात आले होते. कदाचित तो प्रकार अपघातही असू शकेल; परंतु असले अपघात लहान मुलींच्या बाबतीत अपरिहार्य असतात. दुसरी मुलगी मरुस्या व तिसरी मुलगी राबूसा या

दोघी कमालीच्या उडाणटप्पू व वाह्यात होत्या. कुठल्याही मुलाच्याबरोबर त्या फिरत. शिव्या देणे, दारू पिणे व जुगार खेळणे या सर्वांत त्या पारंगत होत्या. मरुस्या ही कमालीची कांगावखोर व ढोंगी होती. तिनं अनेकदा त्या दोघींचा अपमान केला होता. कधीकधी मारामारी केली होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुलांच्याबरोबर भांडायला ती कमी करत नसे. प्रसंगी शिक्षकवर्गाला वाटेल ती दुरुत्तरे करायलाही ती कमी करत नसे. कित्येकदा खोट्या उद्वेगाने ती चक्क म्हणायची, 'जाऊ द्या झालं. माझा जन्म फुकटचा.' राबूसा जरा स्थूलच असून आळशी होती; पण खत्रुड नव्हती. उलट थोडी खिलाडी वृत्तीचीच होती. तुलनेने पाहता ती थोडी शिकलेली असावी ती एका माध्यमिक शाळेत थोडं फार शिक्षण घेऊन आलेली होती. आमच्या स्त्री-शिक्षिका तिने शालांत परीक्षा द्यावी (राबफॅक) असा सतत आग्रह करीत असत. तिचा बाप आमच्याजवळच्या शहरात मोचीकाम करीत असे. दोन वर्षांपूर्वी कोणी तरी त्याचा खून केला होता. तिची आई खूप पिणारी होती व भीक मागून पोट भरीत असे. ते आपले खरे आई-वडील नव्हेत, असे राबूसा चिडून सांगत असे. उलट सोकोलोबाच्या दारात तिला लहानपणी कुणी तरी सोडून दिले होते; परंतु ही नुसती गप्प होती. आपले वडील एका राजघराण्यातले होते असे ती सर्वांना सांगत असे.

राबूसा आणि मरुस्या यांचे इतर मुलांच्याबरोबर एक स्वतंत्र नाते तयार झाले होते व त्यानुसार ती विशिष्ट मुले त्या दोघींना मान देत असत आणि मिट्यागिन वगैरे लोकांच्या यंत्रणेचा महत्त्वाचा तपशील या दोघींनाही माहीत होता. मिट्यागिन आल्यापासून कॉलनीत गुंडगिरीचा सुळसुळाट फारच वाढला होता. तो कॉलनीत आल्यापासून आमच्याकडे गुंडगिरी वारंवार व पद्धतशीरपणे होऊ लागली होती.

मिट्यागिन हा अट्टल, धैर्यवान व वाकबगार चोर होता. तितकाच तो दिसण्यात आकर्षक होता. तो सरासरी सतरा वर्षांचा असेल. त्याच्या चेहऱ्यावर एक नजरेत भरण्यासारखी खूण होती, ती म्हणजे त्याच्या जाडजूड व रुंद भिवया होत. त्याबद्दल तो अभिमानाने बोलत असे; परंतु या अशा ठळठळीत खुणेमुळे तो कुठेही लपून रहाणे अशक्य. त्याने चोरी कधीही न करता बाकी काहीही करावे हे त्याला कधीही कळले नाही. तो आदल्या दिवशी माझ्याशी बरोबरीच्या नात्यानं अघळ-पघळ गप्पा मारत होता.

'आन्तोनसाहेब, ही मुलं तुमच्याबद्दल फारच आदराने बोलतात.'

'मग बोलत असली म्हणून काय झालं?'

'तसं नव्हे! म्हणजे मुलांना तुम्ही आवडत असाल तर ते त्यांच्या दृष्टीनं चांगलंच आहे. मी कुठं इथं फार दिवस रहाणार आहे?'

यावर मी त्याला विचारलं, 'का बरं? का रहाणार नाहीस?'

'मी कशाला राहू? मी तर अट्टल धंदेवाईक चोर आहे!'

'पण ही घाणेरडी सवय तू केव्हाही सोडून देऊ शकतोस!'

'ते मला माहीत आहे; पण त्यामुळं काही फायदा होईल असं मला वाटत नाही.'

'तू उगाचच भलती समजूत करून घेतलेली आहेस मिट्यागिन.'

'नाही. चोरी करण्यामध्ये एक वेगळीच मजा असते. ती कशी व केव्हा करावी हे फक्त तुम्हाला माहीत असायला पाहिजे. वाटेल त्याची चोरी करू नये. जगात काही बदमाष लोक असतात आणि काही फार सज्जन असतात. दुसऱ्या प्रकारच्या लोकांकडून चोरी कधीही करू नये.'

मी त्याला म्हटले, 'तुझं म्हणणं बरोबर आहे; परंतु खरी गोष्ट अशी आहे की, ज्यांची चोरी होते त्यांच्यापेक्षा चोरी करणारेच जास्त दुःखी असतात!'

'दुःखी म्हणजे काय? मला नाही समजलं.' असं मिट्यागिन म्हणाला.

'थांब, मी तुला समजावून सांगतो. त्याचं असं आहे, एखाद्याला चोरी करायची सवय होते व त्याला काम करणं फार अवघड वाटतं. मग त्याला सर्व काही सोपं असल्यासारखं वाटतं. एखाद्याला पिण्याची सवय लागते आणि मग असा मनुष्य त्यातच सुख मानतो. मग एकवेळ शेवटी त्याला तुरुंगात जावं लागतं. त्यानंतर कोठेही जावं लागतं. असं सारं ते आहे समजलं?'

'जणू काही तुरुंगात कोणी माणसं किंवा माणुसकीच नाही, असं का तुम्हाला म्हणायचंय? खरं तर बाहेरच्या जगात तुरुंगातल्यापेक्षाही शेकडो लोक नीच सापडतील! तुरुंगाबाहेरच्या जगाबद्दल कोणीही असा निर्वाळा देऊ शकणार नाही!'

'तू कधी ऑक्टोबर-क्रांतीबद्दल ऐकलंस काय?'

'अर्थातच! मी ऐकलेलं आहे, किंबहुना मी 'रेडगार्डस्'बरोबरच होतो!' मिट्यागिन म्हणाला.

'ठीक आहे! आता सर्वांनाच प्रामाणिक व चांगलं आयुष्य जगायला मिळणार आहे. तुरुंगातल्यापेक्षाही हे आयुष्य खचितच चांगलं राहील!'

'पाहू काय होतं ते.', असे मिट्यागिन म्हणाला. 'सध्या तरी अनेक आळशी व कामचुकार लोक बऱ्याच प्रमाणात दिसतात. ते आपल्या फायद्यासाठी वाटेल ते करतील. लांब कशाला? आपल्या आसपास अशा तऱ्हेचे लोक पुष्कळ आहेत!'

कॉलनीतला जुगार जेव्हा पकडला त्या वेळी मिट्यागिनने त्याच्याजवळ सापडलेल्या पैशांचा उगम कुठे झाला ते सांगण्याचे नाकारले.

'हे पैसे तू चोरलेस का?' मी विचारले. त्यावर तो म्हणाला,

'आन्तोन, तुमची अगदी कमाल आहे हं! मी हे पैसे कधीच कमवून आणले नाहीत. या जगात पुष्कळ लुटारू आहेत. असा सर्व पैसा जमा करून हे लोक खुषीनं बदमाशांच्या हाती देत असतात. माझ्यासारख्याला वाईट वाटायचं काय कारण? मी माझ्यासाठी ते घेतले. तुमच्या या कॉलनीत लपवून ठेवायला जागा नाही. शिवाय तुम्ही झडती घ्याल असंही मला कधी वाटलं नव्हतं!'

'बरं! ठीक आहे! हे पैसे मी कॉलनीसाठी वापरायचे ठरविले आहे. ही ठेव म्हणून आपण ठेवू आणि नंतर त्याचा हिशोब लावू! याबाबत सध्या मी कोणाकडेही तुझं नाव सांगणार नाही!'

मी मुलांना चोऱ्यांबद्दल बोललो. यापुढे कोणीही पत्ते खेळायचे नाहीत अशी सर्वांना ताकीद दिली. कारण पत्ते खेळणे म्हणजे सर्वांना लुबाडणे. यावर काहींनी म्हटले, 'बरोबर आहे. पत्ते खेळायचे नाहीत!'

'पत्ते खेळणारे लोक मूर्खच आहेत. आपल्या कॉलनीत कित्येक लोक अर्धपोटी रहातात. साखर, भाकरी यांसारखे पदार्थ खात

नाहीत. आपल्यातल्या ओवचारेन्कोला या जुगारापायीच कॉलनी सोडून जावं लागलं आणि तो चोरबाजारात सध्या फिरत असतो!'

'ओवचारेन्कोचं नुकसान झालं हे तर खरं!' मिटयागिन म्हणाला.

'तुमच्यातल्या लहान सहकाऱ्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे आणि यापुढे मला या जुगारापायी कोणी अर्धपोटी किंवा उपाशी राहून आपली प्रकृती बिघडवून घेतलेली चालणार नाही. तुम्ही काय ते ठरवा! आपसात जुगार चालू ठेवायचा की कॉलनी सोडायची? तुमच्या वस्तूंची झडती घेण्यास मला कधीही आनंद वाटत नाही; परंतु ओवचारेन्कोला जेव्हा शहरातल्या बाजारात ओरडताना पाहिलं, त्याचा अधःपात दिसला तेव्हा मी ठरवलं की, कोणाचीही गय करायची नाही! मी पुन्हा एकदा तुम्हाला सांगतो की, यापुढे कॉलनीत जुगार चालणार नाही! मात्र हा नियम पाळण्यात प्रामाणिकपणा राखला पाहिजे. कारण बुरुनने पण असाच शब्द दिला होता; परंतु तो त्याने पाळला नाही!'

हे ऐकून बुरुन रागाने पुढे आला व म्हणाला, 'आन्तोन सेमियानोविच, हे खरं नाही! पत्ते खेळणार नाही याबद्दल मी कधीच शब्द दिला नव्हता! तुम्ही सपशेल खोटं बोलत आहात!'

यावर मी म्हणालो, 'तू म्हणतोस ते खरं आहे. दारू पिणार नाही असं तू कबूल केलं होतंस. त्या वेळी मी जुगार खेळणार नाही असं आश्वासन तुझ्याकडून घेतलं नव्हतं; ते घ्यायला पाहिजे होतं.'

यावर तो परत उसळून म्हणाला, 'मी दारू पीत नाही.'

कारावानोव हळूहळू सरकत पुढे आला. तो ज्या गवताळ प्रदेशातून आला होता तिथल्या काही लकबी चटकन लक्षात येत असत. तो गवताळ प्रदेशातल्या धष्टपुष्ट बैलासारखा होता. तो पुढे येऊन म्हणाला, 'मित्रहो! आपण आपल्याच मित्रांना जुगारात खेळून लुबाडणं हे खरोखरच फार वाईट आहे हे अगदी स्पष्ट आहे. तुम्ही माझ्यावर रागावलात तरी चालेल; परंतु जुगार खेळण्याच्या मी खरोखर विरुद्ध आहे. मी दुसऱ्या गोष्टीबद्दल आता आश्वासन देत नाही; पण मी जुगार खेळणार नाही. इतकंच काय, पण कोणीही खेळताना दिसला तर मीच त्याला शिक्षा करीन. ओवचारेन्को आपल्यातून गेला म्हणजे जणू काही आपण त्याची थडग्यातच रवानगी केल्यासारखं आहे. त्याच्या अंगात चोरी करण्याचा दुर्गुण नाही. बुरुन आणि राइसाने त्याला पुरापुरा बनवला. त्याची दशा कोणीही जाऊन बघावी आणि खात्री करून घ्यावी. बुरुन व राइसाने त्याला भेटल्याशिवाय परत येऊ नये.'

बुरुनने हे सारे मान्य केले; परंतु त्याला आणण्यासाठी राइसाला बरोबर न्यायची जरुरी नाही, असे तो म्हणाला.

सगळी मुले आपापसात गडबड करीत होती; परंतु सारेजण या झालेल्या खुल्या चर्चेबद्दल व करारावद्दल खूष दिसले. बुरुनने माझ्या कॉलनीतले पत्ते गोळा करून ते आपल्या हाताने तलावात फेकले. कालिनासाहेबांनी सगळी चोरीला गेलेली साखर गोळा केली व पोरांना त्याबद्दल धन्यवाद दिले.

मिटयागिन मला डॉरमिटरीच्या बाहेर भेटला. 'मी जाऊ की राहू?' त्याने मला विचारले.

'तू थोडे दिवस राहू शकतोस!' असे मी त्याला सांगितले.

'मी राहिलो तर चोऱ्या होतच रहाणार!'

'ठीक आहे. तू चोऱ्या करत रहा. मग एक दिवस खतम होऊन जाशील.' हे ऐकून त्याला धक्काच बसला व तो तिथून निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ओवचारेन्कोला शोधून परत आणण्यासाठी बुरुन गेला. धाकट्या मुलांनी राइसाला पण हाताला धरून ओढत आणले. कारावानोवने बुरुनच्या पाठीवर थाप मारून काम फत्ते करून येण्यास सांगितले.

स्त्रीदाक्षिण्याचे युग युक्रेनमध्ये अजून संपलेले नाही.

झादारोव्हने लोहारखान्यातून बाहेर डोकावून पाहिले. माझ्याकडे त्याच्या नेहमीच्या पद्धतीने स्मितहास्य करून तो म्हणाला, 'मूर्ख आहेत लेकाचे; पण वाईट नक्कीच नाहीत हं!'

काराबानोवने त्याला जरा घुश्श्यातच विचारले, 'लेका, तू कोण आहेस?'

त्यावर त्याने उत्तर दिले, 'मी होय? मी पूर्वीचा वंशपरंपरागत असाच मूर्ख होतो. आता तर मला म्हणतात, 'अलेक्झांडर झादारोव.' मॅक्झिम गॉर्की कॉलनीचा मी प्रख्यात लोहार!'

'बरं, बरं, माहीत आहे!' असे म्हणून काराबानोव लोहारखान्यातून निघून गेला.

संध्याकाळी बुरुन ठरल्याप्रमाणे ओवचारेन्कोला खरोखरच घेऊन आला. ओवचारेन्को कमालीचा थकलेला व खूप दिवसांचा उपाशी दिसत होता; पण तरीही मनाने तो तृप्त वाटत होता. ¤

## प्रकरण दहावे

# समाजसेवेचे मानकरी

माझ्यासकट आम्ही पाचजण होतो व आम्हा पाचजणांना मिळून समाजसेवेचे मानकरी या नावाने ओळखत. आम्ही स्वतः असे कधीच म्हणवून घेतले नाही आणि आम्ही काही विशेष करतो आहोत असे कॉलनीच्या सुरुवातीच्या काळात आणि नंतरही म्हणजे कॉलनीच्या आठव्या वाढदिवसापर्यंतही कधी भासवले नव्हते.

'हीरो' हा शब्द गॉर्की कॉलनीच्या बाबतीत वापरला असला तरी आम्हाला पुरेपूर खात्री होती की, हा किंवा अशासारखे शब्द आम्ही स्वतःसाठी न वापरता विशिष्ट मुलांचे नैतिक बळ वाढवायला त्यांचा उपयोग करीत होतो. कारण त्या वेळी आमच्या देशाचे एकंदर जीवन म्हणजेच क्रांतिकारी जीवन हे कर्तृत्वाने भरलेले होते. त्यामुळे आमच्यासारख्यांचे काम व त्यातून मिळविलेले यश म्हणजे अगदीच क्षुल्लक म्हणायला हरकत नाही.

आम्ही बोलूनचालून अनेक प्रकारचे दोष असलेली सामान्य माणसे. आम्हाला आमचे कामसुद्धा माहीत नसलेले, आमचे रोजचे रहाटगाडगे, अपुरे मार्गदर्शन, त्यामुळे घ्यावी लागलेली माघार व झालेल्या अनेक चुका यांनी भरलेले होते. समोरची वाट जणू

धुक्याने भरली होती आणि आम्ही त्यातून भावी काळातले नवीन शिक्षणतंत्र कसेबसे शोधण्याची पराकाष्ठा करीत होतो.

आमचा निर्णय घेण्यामागे पद्धतशीरपणा नसल्याकारणाने आम्ही घेतलेला प्रत्येक निर्णय कडाडून टीका करण्यासारखा होता. तर याउलट त्या निर्णयाचा अनेक बाजूंनी विचार करण्यासारखा होता आणि आम्ही चर्चा करीत बसलो की चर्चेतून निष्पन्न तर काहीच होत नसे; पण त्या चर्चेला कधी अंतही नसे.

तरीही दोन गोष्टी निर्विवादपणे ठरविलेल्या होत्या. एक म्हणजे घेतलेले काम टाकायचे नाही, ते पुरे करायचे. भले त्यात अपयश येवो, काही पर्वा नाही व दुसरे म्हणजे आमचे रोजचे कॉलनीतले व कॉलनीबाहेरचे दैनंदिन आयुष्य चालू ठेवायचे.

आसीपोव-मंडळी कॉलनीत आली त्या वेळी त्यांना आमच्या विद्यार्थ्यांची घृणा वाटत असे. आमच्या नियमाप्रमाणे शिक्षकमंडळींनी ड्युटीवर असताना मुलांच्याबरोबर जेवण घेतले पाहिजे होते; परंतु इवानोविच व त्याची पत्नी यांनी मुलांबरोबर जेवावयास बसण्यास सक्त विरोध केला होता. त्यांनी कबूल केले होते की, आपण आपला चोखंदळपणा सोडू शकत नाही!

यावर मी म्हटले, 'बरं! ठीक आहे.'

इवानची संध्याकाळची पाळी असे तेव्हा तो डॉरमिटरीत मुलांच्या खाटांवर बसण्याचे कटाक्षाने टाळीत असे. इतकेच नव्हे तर त्या ठिकाणी जर दुसरे काही बघायला नसले, तर तो आपली ड्यूटी उभ्याउभ्यानेच करीत असे. मुलांच्या त्या घाणेरड्या खाटांवर कसे बसायचे याबद्दल तो आश्चर्य व्यक्त करी.

मी म्हणे, 'त्यात काय आहे? अहो, सारे काही शेवटी व्यवस्थित होईल. बिछाने स्वच्छ होतील, उवांचा नाश होईल आणि इतरही अनेक गोष्टी होतील.'

तीन महिन्यांनंतर इवान मुलांच्यात बसून त्यांच्याबरोबर एकाच टेबलावर जेवण घेऊ लागला. इतकेच नव्हे तर त्याने आपला खास चमचा आणण्याचेसुद्धा बंद केले. उलट सगळ्या चमच्यांच्या जुडग्यातून तो चमचा तिथल्या तिथे साफ करून घेण्यात समाधान मानी. डॉरमिटरीतसुद्धा संध्याकाळच्या वेळी तोच इवानोविच एखाद्या मुलाच्या खाटेवर बसून काही मुलांबरोबर 'चोर–शिपाई' खेळ खेळण्यात भाग घेऊ लागला. हा खेळ म्हणजे चोर, शिपाई, शोधक व न्यायाधीश आणि खबऱ्या वगैरे सर्वांचा मिळून असतो. असे शब्द लिहिलेल्या चिठ्ठ्या एकत्र ठेवल्या जात. खबऱ्याची चिठ्ठी ज्याला सापडेल त्याच्या हातात एक छडी असते व त्याने चोर शोधून काढायचा असतो. सगळ्या मुलांनी हात पुढे करायचे व शोधणाऱ्याने एक एक छडी देऊन अंदाजाने चोर शोधून काढायचा असतो. यात कधीकधी न्यायाधीश व नागरिक यांनाही छडीचा प्रसाद मिळतो. असा संशय घेतल्याबद्दल जज्ज व नागरिक यांची पाळी येईल त्या वेळी खबऱ्याला सपाटून झोडपून काढून त्याचा बदला घेतात. हे असे चोर सापडेपर्यंत चालते. मग खबऱ्याची डोकेदुखी संपून चोराची डोकेदुखी सुरू होते. मग न्यायाधीश चोराला पाच फटके, दहा फटके अशी शिक्षा फर्मावतो. पोलीस ती शिक्षा अमलात आणतात.

ह्या खेळात चोर व पोलीस, न्यायाधीश व शिक्षा देणारा अशा आलटूनपालटून भूमिका वेगवेगळ्या मुलांवर येत असतात. मुले त्या त्या भूमिकेची योग्य अंमलबजावणी करीत रहात. पहिल्या वेळी न्यायाधीश झालेला दुसऱ्या वेळी चोरही होऊ शके. एखादा कडक न्यायाधीश किंवा बेपर्वा शिपाई जेव्हा दुसऱ्या खेळात चोर किंवा खबऱ्या होई तेव्हा ते आधीच्या खेळात कडक वागलेल्या न्यायाधिशाला चांगलाच हात दाखवीत. मग त्याला आपण उगाचच कडक वागलो होतो असे वाटू लागायचे.

एकातेरीना आणि लिडीया यांनीही ह्या खेळात भाग घेतला; परंतु मुलांनी या दोन्ही स्त्रियांना कमालीच्या सौजन्याने वागविले. तसेच चोर शोधून काढतानासुद्धा या दोघींना छडीचा प्रसाद अत्यंत मृदुपणाने देण्यात आला.

एकदा मीही या खेळात भाग घेतला होता. मुलांनी जास्तीत जास्त छड्या मारून माझी सहनशक्ती अजमावण्याचा प्रयत्न केला व मी बरोबर साथ दिली. मी न्यायाधीश म्हणून निवडल्यावर कडक शिक्षा दिल्या. त्याबद्दल शिपायांनाही आश्चर्य वाटले व माझ्यावर जेव्हा दिलेली शिक्षा अंमलात आणण्याचा प्रसंग आला तेव्हा मी पण चांगलाच हात दाखवला. शेवटी एक वेळ एका चोर झालेल्या मुलाने ओरडून सांगितले की, 'आन्तोन, शिक्षा फार झाली.'

माझे उट्टे काढण्यासाठी मुलांनी तशीच कडक शिक्षा मला दिली. मलाही माझा सुजलेला डाव हात घेऊन घरी जावे लागले. कारण शिक्षा घेताना हात बदलायचा नसतो व उजवा हात मला माझ्या लिखाणासाठी राखून ठेवणे जरुरीचे होते. इवानोविच आसीपोव नेहमी घाबरून वेगळीच बायकी तंत्रे वापरीत असे. मुलेही त्याला फाजील सौजन्याने वागवीत; परंतु एक दिवस मी इवानला बजावले,

'हे तुझं तंत्र बरोबर नाही! आपली मुलं घाबरट व भेकड होता कामा नयेत. त्यांनी धीट व सोशिक बनलं पाहिजे.'

परंतु इवानला माझे म्हणणे पटले नाही.

एका संध्याकाळी मी व इवान दोघेही मुलांच्याबरोबर 'चोर-शिपाई' खेळ खेळत होतो. माझ्यावर न्यायाधिशाची पाळी आली व दुसऱ्या पाळीत मी जेव्हा शिपाई झालो, तेव्हा त्याला मिळालेली शिक्षा देण्याचे काम माझ्यावर आले व मी त्याला चांगलाच बदडून काढला. मग त्याच्यावर जेव्हा पाळी आली तेव्हा त्याने माझा पुरेपूर सूड उगवला; परंतु माझ्या चाहत्यांना – मुलांना – ते रुचले नाही व एका मुलाने इवानला चांगलाच प्रसाद दिला. त्यामुळे त्याला दोन्ही हातांवर फटके खावे लागले!

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी इवानने या खेळातून निसटायचे ठरवले; परंतु मुले कसली ऐकतात? त्यांनी त्याला खेळात ओढलेच. पण त्या वेळी तो डगमगला नाही. न्यायाधिशाची भूमिका घेताना सूडबुद्धी वापरली नाही; तसेच चोर किंवा खबऱ्या याची भूमिका पार पाडताना माघारही घेतली नाही.

आसीपोव मंडळी नेहमी कुरकुर करायची, 'आपली मुले मुलांच्यात मिसळण्यामुळे उवा, ढेकूण वगैरे त्यांच्या बरोबर आपल्या घरी जातात!' मी एकदा त्यांना सांगितले, 'उवांचा उगम आपल्या घरात न होता डॉरमिटरीत होतो. तेव्हा खरी स्वच्छ व्हायला पाहिजे ती डॉरमिटरी.'

आम्ही खूप प्रयत्न करून प्रत्येक मुलाला कपड्याचे दोन दोन जोड मिळविले व चादरीचेही दोन दोन जोड मिळविले. हे सूट

खूपशी ठिगळे वगैरे लावलेले होते; परंतु ते आम्ही भट्टीत घालू शकत होतो व कपडे धुतले जाऊ लागल्यामुळे उवांचा आपोआपच नायनाट झाला. तरीही नवीन भरती झाली की, परत उवांचा सुळसुळाट होई. त्याचा समूळ नायनाट करायला आम्हाला बराच वेळ लागला.

कर्मचाऱ्यांमधील कामाची वाटणी–दिवसभराचे काम, सकाळचे काम व संध्याकाळचे काम अशी करण्यात आली होती. याशिवाय शिक्षकवर्ग सगळ्या शालेय शिक्षणाचे वर्ग घेत असत. दिवसभराचे काम हे शारीरिक कष्टाचे काम व ते सकाळी पाचपासून रात्री झोपायच्या वेळेपर्यंत चालत असे. त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होई–

सबंध दिवसाचे वेळापत्रक पाळणे, जेवणाचे साहित्य काढून देणे, निरनिराळ्या वर्गांवर देखरेख ठेवणे, भांडण-तंटे सोडविणे, भांडारातील वस्तूंची नोंद ठेवणे, कपडे व बिछाने साफसूफ करून घेणे इत्यादी. हे काम एवढे जबरदस्त व पद्धतशीर होत असे की, वर्षाच्या अखेरीस आमची जुनी मुले शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना मदत करण्यात तरबेज व्हायची.

या कामाला असलेले शिक्षक स्वतःच अंगमेहनत करीत. विशेषतः नवीन आलेल्या मुलांबरोवर व बऱ्याच मोठ्या मुलांच्या घोळक्याबरोबर ते जातीने काम करीत. प्रत्यक्ष कामाला हातभार लावणे हे आमच्या शिक्षकांचे कर्तव्यच होते. नाही तर आमच्या या असल्या शिक्षणपद्धतीत फार घोटाळे झाले असते. शिक्षक वर्कशॉपमध्ये काम काम करीत. कुठे मोडतोड झालेली असेल तर तिथेही धावून जात. संध्याकाळची ड्यूटी तशी औपचारिकच असे. सर्व शिक्षक डॉरमिटरीत जमत असत. यात काही फारसे कौतुक नव्हते. कारण आम्हाला फिरावयास जायला कुठेच जागा नव्हती. आमच्या रिकाम्या खोल्यांतून मिणमिण दिव्याशिवाय काहीच नव्हते. ह्याच्याउलट संध्याकाळचा चहा झाल्यावर आमची सर्व कॉलनीची प्रजा आमच्यासाठी डॉरमिटरीत उत्सुकतेने वाट पाहत असे. त्यांचे प्रसन्न व उत्सुक चेहरे, त्यांचे न संपणारे प्रश्न, खऱ्याखोट्या गोष्टी, राजकीय व सामाजिक विषयांवरचे विशेष प्रश्न, उंदीर-मांजर किंवा चोर-शिपाई हे खेळ हेच आमचे करमणुकीचे साधन होते. याशिवाय इतरही अनेक गोष्टींचे उदा. आमचे रोजचे जेवण, आमच्या शेजाऱ्यांचे वर्तन, कुठे दुरुस्ती किंवा आमच्या भविष्यातल्या सुखी जीवनाची स्वप्ने वगैरे गोष्टींची चर्चा चाले.

कधीकधी मिटचागिन एखाद्या गोष्टीचा धागा पकडून सुरुवात करी. तो अतिशय कुशलतेने गोष्टी सांगे. मधूनच नकला करणे किंवा अभिनय करणे त्याला चांगले अवगत होते. त्याला लहान मुलांची खूप आवड होती. त्याच्या गोष्टी ऐकण्यात लहान मुले रंगून जात. मिटचागिनच्या गोष्टीत चमत्कार कधीच नसत. त्या मुख्यतः मूर्ख व धूर्त शेतकरी, लबाड, ऐदी श्रीमंत, चलाख, कसबी लोक, धाडसी चोर, गबाळ पोलीस, शूर शिपाई व सुस्त धर्मोपदेशक यांच्याबद्दलच असत.

पुष्कळदा आम्ही काही काही गोष्टी डॉरमिटरीत एकत्र वसून वाचीत असू. मी सुरुवातीपासूनच वाचनालयासाठी तरतूद करीत आलो होतो. त्यासाठी मी पुस्तके विकत घेत असे किंवा कुणाकुणाकडून मागून आणीत असे. हिवाळ्याच्या अखेरीस आमच्या वाचनालयात रशियन भाषेतील उत्तमोत्तम पुस्तके, तसेच राजकीय व शेतीविषयक मासिके जमा झाली होती. जिल्हा शिक्षणखात्याच्या विभागातून शास्त्रीय विषयावर मी निरनिराळी पुस्तके जमविली होती.

आमच्या बऱ्याचशा मुलांना वाचनाची आवड होती; परंतु सर्वांनाच वाचलेल्याचा सुसूत्रपणे अर्थ लावता येत नसे. म्हणून आम्ही सामुदायिक वाचनाची प्रथा पाडली होती. पाळीपाळीने प्रत्येकजण त्यात भाग घेई. प्रामुख्याने झादारोव्ह किंवा मी वाचनाचे काम करीत असू. झादारोव्हचे उच्चार व वाचन अतिशय स्पष्ट असे. पहिल्या हिवाळ्यात आम्ही पुश्किन, कोरोलेन्को, यामीन सिबीरीयाक्, वेरसायेव वगैरेंची पुस्तके वाचून काढली. सर्वांत जास्त संख्येने वाचलेले ग्रंथ म्हणजे मॅक्झिम गॉर्कीचेच.

गॉर्कीच्या लिखाणाचा जबरदस्त व दुहेरी परिणाम होत असे. विशेषतः गॉर्कीच्या कल्पनाविलासाने काराबानोव, तारानेटस् आणि होल्कोव इत्यादी मुले भारावून जात. तितकाच त्यांना गॉर्कीच्या वर्णनशैलीचा कंटाळा येई. विस्फारित कानांनी ते गॉर्कीचे 'मकरचंद्रा' ऐकत. इव्कान गुर्दयेवची व्यक्तिरेखा ऐकताना त्यांच्या मुठी आपोआप वळत; पण गफार अर्कीव आणि लेन्का यांच्या करुण कहाण्या ऐकताना ते जांभया देऊ लागत. काराबानोव्हला विशेषतः गुर्दयेवचे स्वभावचित्रण फार आवडे. त्याला त्यातील विशेषतः बोयारिन्याच्या विध्वंसाचा 'सीन फार आवडे. काराबानोव कडक चेहरा करून म्हणे, 'अरे, तुम्हाला आवडेल असाच हा आहे. प्रत्येक जण असाच झाला तर?' 'द थ्री' मधल्या इल्याच्या मृत्यूचे वर्णन काराबानोव्हला फार आवडे. तितक्याच उत्साहाने तो ते ऐकत असे. तो म्हणे, 'धन्य ते लोक!'

मिटचागिन, झादारोव्ह आणि बुरुन आमच्या कॉलनीवाल्यांच्या अतिउत्साही कल्पनाविलासाला हसत हसत म्हणत, 'अरे, तुमच्या कानांवर पडते; पण ते कानात शिरत नाही.'

'काय माझ्या कानात शिरत नाही?'

'अरे, पण तुम्ही काय ऐकता? भिंतीवर डोके आपटून घेण्यामध्ये काय आनंद आहे? तो तुमचा इल्या मूर्खच होता. कुठल्या तरी बाईने म्हणे त्याच्याकडे रागाने पाहिले आणि त्याच्या डोळ्यांत अश्रू जमा झाले. आम्ही जर त्याच्या जागी असतो तर आम्ही असल्या लोकांना पकडून चांगली शिक्षा दिली असती. तुमच्या गुर्दयेवचासुद्धा गळा दाबून टाकला असता!'

'द लोअर डेप्थ' या पुस्तकाचा नायक ल्यूका याच्याबद्दलच्या मतप्रदर्शनात विरोधी बाजूचे लोक सहमत झाले. काराबानोव आपले डोके हालवीत म्हणाला, 'तुम्ही काय वाटेल ते म्हणा; पण हे जुने लोक एकंदर वाईटच. काही तरी करतील आणि नाहीसे होतील! मी असल्यांना चांगले ओळखतो.'

'तो वयस्क ल्यूका कसा मजेदार आहे! त्याला सर्व काही समजतं. कधी चोरायचं, कधी फसवायचं, कधी कुठे शिरायचं व आपल्यासारखं करून घ्यायचं आणि तरीही नेहमी त्यांचंच बरोबर असंच की नाही?' मिटचागिन म्हणाला.

'गॉर्कीचं बालपण व विद्यार्थीदशा' या पुस्तकांचा मुलांवर

चांगलाच परिणाम झाला. ते श्वास रोखून ती पुस्तके ऐकत असत. कधीकधी रात्री बारा-बारा वाजेपर्यंत वाचन न थांबवण्याची विनंती करीत. प्रथम गॉर्कीच्या आत्मचरित्रातल्या मी सांगितलेल्या गोष्टीवर त्यांनी विश्वास ठेवला नाही; परंतु ते वाचल्यानंतर ते भारावून गेले व त्यांना एक कल्पना सुचली. 'गॉर्की आमच्यासारखाच एक दरिद्री माणूस होता,' या कल्पनेने त्यांना अगदी आनंदित केले. मॅक्झिम गॉर्कीचे चरित्र म्हणजे आमच्याच जीवनाचा एक भाग झाले होते. त्यातल्या निरनिराळ्या गोष्टी व उदाहरणांचा तुलनेला उपयोग होत असे. त्याच्या जीवनातल्या गोष्टी वादविवादासाठी उपयोगी पडत. तसेच मानवी जीवनमूल्यांची मोजदाद करता येई. 'कोरलेन्को चिल्ड्रेन्स कॉलनी' आमच्यापासून तीन किलोमीटरवर उभारलेली होती. परंतु मुलांना त्याच्या नावाचा हेवा वाटला नाही. 'ते असतील भले कोरलेन्को! आम्ही आहोत गॉर्काइट,' कालिना इवानोविच याचे पण तेच मत होते. त्यांनी एकदा मला सांगितले की, 'कोरेलेन्को भेटले होते व त्यांच्याशी संभाषणही केले. ते खरोखरच सभ्य व चांगले लोक आहेत, आणि तुम्ही लेको नुसती हुल्लडबाजी करणारे आहात!'

आम्ही आमच्या कॉलनीला गॉर्की कॉलनी नाव दिले. शासकीय-दृष्ट्या हे नाव दिले गेले नव्हते; परंतु जवळच्या शहरात आम्हाला गॉर्काइट म्हणून ओळखू लागले. वरच्या अधिकाऱ्यांनीही या नावाला विरोध दर्शविला नाही. म्हणून आम्ही आमचे रबरी शिक्के व सिले त्याच नावाची बनविली. अलेक्सी मक्झीमोविच यांचा पत्ता आम्हाला माहीत नसल्याने दुर्दैवाने त्यांच्याशी आम्ही सुरुवातीच्या काळात पत्रव्यवहार करू शकलो नाही.

१९२५ मध्ये प्रथमच एका इटालियन साप्ताहिकात आम्ही 'गॉर्कीचे इटलीतले आयुष्य' असा लेख वाचला. आम्ही अंदाजाने त्यांना आमच्या बुद्धीनुसार 'मक्झिमो गॉर्की, इटाली' असे एक पत्र लिहिले.

लहान व मोठ्या, सर्वच मुलांना गॉर्कीच्या गोष्टी व त्याचं चरित्र यांची आवड उत्पन्न झाली होती; परंतु छोट्या मुलांना वाचता येत नव्हते.

आमच्याकडे दहा वर्षे आणि जराशी मोठी अशी बारा मुले होती. ती सगळीच मोठी गडबडी, धडपडी व वखवखलेली अशी असत. कॉलनीत प्रवेश करतेवेळी प्रत्येकजण दुबले-पतले आणि अतिशय घाणेरड्या स्थितीत आलेले होते. एकातेरीना हीच आमची कॉलनीची आरोग्याधिकारी होती आणि तिला भरपूर काम मिळे. तिला स्वच्छतेचे कमालीचे वेड होते. तरीपण ती मुले तिच्याकडे ओढली जात. त्यांना हळुवारपणे कसे रागवावे हे तिला चांगले माहीत होते. त्यांच्या बारीकसारीक गोष्टी तिला माहीत असत. त्यांच्या गोष्टींवर ती कधीच विश्वास ठेवीत नसे. आणि त्यांचा क्षुल्लक गुन्हाही तिच्या नजरेतून कधी सुटत नसे. त्यांना शिस्त लावण्याचे धोरणही तिने कधी सोडले नाही.

कॉलनीत एका तेरीनाशिवाय इतक्या मायेने त्यांची घरची परि-स्थिती, आई-वडिलांची माहिती किंवा त्यांच्या भविष्याचे चित्र कोणीही रंगवू शकत नसे. त्यांच्या दुर्दैवाची कहाणी इतक्या सहृदय-तेने कोणीही ऐकून घेत नसे. किंबहुना सगळे नियम धाब्यावर बसवून मोठ्या युक्तीने कालिनासाहेबांच्या कडक शिस्तीला चुचकारून अशा मुलांना पोटभर जेवण मिळालेच पाहिजे असा ती आग्रह धरीत असते.

एकातेरीनाचा लहान मुलांबद्दलचा जिव्हाळा मोठी मुले समजून घेत व तिला फार मान देत. तिने केलेली कोणतीही विनंती मान्य करीत. उदा. लहानांनी आंघोळ केली की नाही, कपडे नीट घातले की नाही, आपापसात ती भांडत नाहीत ना, वगैरेवर नीट लक्ष ठेवीत. कॉलनीतल्या मोठ्या मुलांना छोट्या मुलांचा लळा किंबहुना त्यांच्या-बद्दलची भ्रातृभावना या गोष्टी म्हणजे आमच्या एकातेरीनाबाईंच्या कामाचे फळ होते. ◻

प्रकरण अकरावे

## औत मिळविण्याची करामत

शेतीच्या कामात प्रगती होत नसल्यामुळे आमच्या कॉलनीतल्या लोकांचा शेतीकडे कल नसावा असे मला वाटू लागले. त्यामुळे कोलोमॅक नदीच्या पलीकडच्या तीरावरील राई वसंतऋतूच्या आगमनामुळे फुलायला लागली होती तिकडे आमचे डोळे लागले. ती जमीन खरोखरच चांगली असावी असे वाटत होते.

कॉलनीच्या डागडुजीचे काम अतिशय मंदगतीने चालले होते. आम्ही नेमलेल्या सुताराला फक्त लाकडाचे मोठे खोके कसे बनवावे एवढेच येत होते. इमारतीच्या लाकूडकामाच्या बाबतीत तो जवळ-जवळ निकामीच होता. दारेखिडक्यांना काचेची तावदाने आम्ही पैशाच्या अभावी लावू शकत नव्हतो, तरीही उन्हाळा संपेपर्यंत दोन-तीन मोठ्या इमारतींची आम्ही डागडुजी केली. खिडक्यांना तावदाने नसल्यामुळे आम्ही त्या इमारतीचा रहाण्यासाठी उपयोग करू शकलो नाही. आजुबाजूची छोटी घरकुले वगैरे आम्ही दुरुस्त करून घेतली. मुख्यतः त्याचा उपयोग सुतार, गवंडी, विटा पाडणारे व दरवान यांना रहाण्यासाठीच झाला. त्यामुळे मुलांना तिकडे जाऊन रहाणे अशक्य होते. शिवाय कुठचीही वर्कशॉप्स् तेथे नव्हतीच. त्यामुळे तिथे काही कामही नव्हते.

आमची मुले नव्या कॉलनीत जा-ये करीत असत. बरेचसे कामही त्यांनी पुरे करीत आणले होते. जवळजवळ दहा मुलांनी तेथे छोट्याशा झोपड्या तयार केल्या व ते त्या बगीच्यात काम करीत. त्यांनी गाड्या भरून सफरचंदे व पेअरफळे पाठवून दिली. मुलांनी केलेल्या मेहनतीमुळे ट्रेपकेवाडी-बगीचा चांगला दिसू लागला तरी तिथे अजूनही बरीचशी सुधारणा व्हायला हवी होती.

गोन्चारोवका गावाचे रहिवासी ट्रेपकेवाडी आमच्या ताब्यात आल्या-जरा नाराज झाले होते. विशेषतः आमची ओंगळ, ओबधोबड फौज, त्यामुळे ट्रेपकेत वावरताना त्यांना कसेसेच दिसत होते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आम्हाला मिळालेल्या साठ एकर जमिनीचा करार नुसता कागदावरच होता. कारण आम्हाला दिलेली जमीन व तिच्या आजुबाजूची नांगरटीखाली आलेली दुसरी जमीन या गावचे लोक

वहिवाटीने १९१७ पासून लागवडीखाली आणीत होते.

शहरामध्ये हा निवाडा झाला तेव्हा ते सारेजण आम्हाला हिणवून हसले.

ते म्हणाले, 'तुमच्याकडे हुकूम आहे ना ? मग जमीन तुमचीच ! तुम्ही जमिनीत खुशाल नांगर घाला !' सर्गेइ पेट्रोविच ग्रेच्यानी, व्हिलेज सोविएटचा अध्यक्ष, यांनी आपले दुसरेच मत दिले.

'खरं सांगायचं तर या हुकुमाप्रमाणं तुम्ही न वागणं बरं असा मी सल्ला देईन ! कारण असं की, एखाद्या कष्टाळू शेतकऱ्याला जमीन कायद्याप्रमाणं मिळाली व ती तो करू लागला असताना हे सारे नियम व कायदे पुढं करणं म्हणजे कष्टकऱ्याच्या पाठीत खंजीर घालण्यासारखं आहे !'

पाऊलवाट कोलोमॅक नदीच्या काठापर्यंतच होती. आम्ही आमची स्वतःची थोडी वाहतूक सुरू केली. आमची मुले पाळीपाळीने होडी वल्हवायचे काम करीत; परंतु माल नेणे–आणणे यासाठी आम्हाला चक्कर घेऊन गावातून पुलावरूनच जावे लागे. तिथे गावातली पोरे आमच्या मुलांना जाता–येताना हिणवीत व त्रास देत, 'पोरट्यांनो, ट्रपकेवाडी आम्ही तुम्हाला पचू देणार नाही ! आमच्या गावातून जातायेता तुम्ही आमच्या गावात अंगावरच्या उवा व घाण टाकीत जाऊ नका !'

गोच्यारोवका गावात आम्ही शेजारी म्हणून शिरलो नव्हतो तर आम्ही ते मिळवले होते. तसे आम्ही अजून रुळलोही नव्हतो. तिथे आमच्यातील कमतरता ते दाखवू शकत नव्हते; परंतु आम्ही कमकुवतपणा दाखवला असता तर आम्ही ट्रेपकेवाडी घालविली असती. त्या शेतकऱ्यांना पक्के माहीत होते की, हा तंटा कुठच्याही कोर्टात मिटवला जाणार नसून खुद्द तो त्या वाडीतच मिटवला जाणार होता. गेली तीन वर्षे ते ट्रेपकेवाडीची जमीन कसत होते. त्यांनी तिथे वहिवाटीचा हक्क प्रस्थापित केला होता व तो हक्क अबाधित रहावा यासाठी त्यांची धडपड चालू होती.

यावर तोडगा म्हणून लवकरात लवकर वाडीतली जमीन नांगरायला घेण्याचा आमचाही निश्चय पक्का होता.

उन्हाळ्यामध्ये मोजणीअधिकारी मोजणी करायला आले. आमच्या मर्यादा त्यांनी आखून दिल्या. हे काम प्रत्यक्ष शेतात फिरून न करता त्यांनी आम्हाला ते नकाशावरच दाखविले व आमची समजूत घातली. ते सारे साहित्य घेऊन मी आमच्या काही मोठ्या मुलांसह गोन्चारोवका गावाच्या गावकऱ्यांकडे गेलो.

व्हिलेज सोविएतचा अध्यक्ष लूका सेमियानोविच वेटखोला हा तसा आमचा जुनाच दोस्त. त्याने आमचे चांगले स्वागत केले; परंतु नकाशा बघायची टाळाटाळच केली.

तो म्हणाला, 'मित्रहो ! मी तुमच्यासाठी काहीही करू शकणार नाही! आमचे हे या गावचे शेतकरी बऱ्याच दिवसांपासून ती जमीन करीत आहेत. मी त्यांना दुखवू शकत नाही. तुम्ही दुसरीकडे जमीन मिळवा; पण त्यांना दुखवू नका !'

याउपरही गावकऱ्यांनी जमीन नांगरायला सुरुवात केली. तेव्हा 'ही जमीन नांगरण्याबद्दल कॉलनी तुम्हाला काहीही मोबदला देणार नाही !' अशा अर्थाची सूचना मी बोर्डावर लिहून ठेवली.

मला अर्थातच याचा फारसा उपयोग होईल असे वाटले नव्हते. मी तर आतल्या आत चांगलाच खचलो होतो. शेतकऱ्यांची जमीन काढून घेणे हे माझ्या सदसद्विवेकबुद्धीला पटत नव्हते. कारण जमीन म्हणजे शेतकऱ्यांचा प्राणच !

काही दिवसांनंतर एका संध्याकाळी झादारोव एका अनोळखी माणसाला घेऊन डॉरमिटरीत आला. हा मनुष्य त्या गावातलाच होता. झादारोवला अतिशय आश्चर्य वाटले. तो अतिशय उल्हसित झाला होता.

तो घाईघाईने म्हणाला, 'हा काय म्हणतो ते ऐका हं !'

काराबानोव आवेगाने उड्या मारीत साऱ्या कॉलनीभर ओरडत फिरू लागला, 'ऐका, ऐका, आता या वेर्खोलाला चांगलाच हात दाखवू आम्ही !'

सगळी मुले आमच्या घोळक्यात सामील झाली.

तो आलेला पाहुणा गोन्चारोवका गावातला कोम्सोमोल पथकाचा होता.

'गोन्चारोवका गावात बरेच कोम्सोमोल आहेत का ?' मी त्यांना विचारले.

'नाही हो. आम्ही फक्त तिघेजण आहोत !'

'फक्त तिघेच ?'

'होय हो. त्यामुळेच आम्हाला खरोखर खूप त्रास होतो, कारण या गावातले सारे शेतकरी सधन शेतकरी आहेत. ते आम्हाला दाद देत नाहीत. म्हणून तर माझ्या सहकाऱ्यांनी मला तुमच्याकडे पाठविले आहे. तुम्ही येऊन जर आम्हाला मिळालात तर आपण दोघे मिळून त्यांना चांगलाच हात दाखवू ! ही तुमची मुलं फार चांगली आहेत. अशी जरी थोडी आमच्याकडे असती तरी आम्हाला चिंता नव्हती.'

'या जमिनीच्या प्रश्नाबद्दल काय करायचं ते आम्हाला समजत नाही !'

'तेच तर सांगायला मी आलो आहे ! तुम्ही त्या लूकावेर्खोला म्हाताऱ्याकडे जराही लक्ष देऊ नका. ती जमीन जबरदस्तीने आपल्या ताब्यात घ्या. ही जमीन कोणकोण करते त्यांची नावं तुम्हाला माहीत आहेत काय ? कोण सांगा पाहू स्पिरिदॉन ? लवकर सांगा.'

स्पिरिदॉन नावं सांगू लागला. 'ऐका तर, ग्रेच्यानी आन्द्रेइ कारपोविच, गफार आंद्रेइ, पेट्रोग्रेच्यानी, ओनोप्री ग्रेच्यानी, चर्चच्या बाजूला रहाणारा स्टोमुखा सिर्योझा, स्टोमुखा एवतूक व खुद्द ल्यूका सेमियानोविच हे पाचसहाजण आहेत. ह्या प्रत्येकाची स्वतःची वेगळी जमीन आहे.'

'अरे पण तुमचे सहकारी काय करतात ?'

'त्यांचं काय घेऊन बसलात ? या सहाजणांनी त्यांना दारू पाजून विकत घेतलंय. गावचे सोविएत या सहाजणांच्या मुठीत आहे. म्हणून आपल्या जमिनी असूनही त्यांनी ही जमीन आपसात वाटून घेतली !'

'आता खरी गंमत येणार ल्यूकासाहेब, जरा जपून !' काराबानोव मोठ्याने ओरडला.

सप्टेंबरच्या सुरुवातीला एके दिवशी मी शहरातून दुपारी दोनच्या सुमाराला कॉलनीकडे परत येत होतो. आमची गाडी हळूहळू फरफटत होती. ब्राचेन्कोच्या रेडबद्दलची बडबड कानवारून जात होती. परंतु त्याच वेळी मी कॉलनीबद्दलच्या निरनिराळ्या समस्यांवर

विचार करीत होतो.

ब्राचेन्को एकाएकी गाडी चालवता चालवता थांबला. तो बडबडायचा थांबला म्हणजे त्याला कसला तरी आवाज ऐकू आला असावा. तो उभा राहिला. त्याने रेडचा लगाम खेचला व रेडला झोडपायला सुरुवात केली. एकीकडे तो तोंडाने ओरडतच होता. 'आन्तोन, आपला नांगर व औत...' एवढेच शब्द मी ऐकले.

कॉलनीच्या जवळ आल्यावर आम्हाला एक नांगर व औत जोरजोराने आवाज करीत समोरून येताना दिसला. त्याचा होणारा विचित्र आवाज जरा घाबरून सोडणाराच होता. तो नांगर व औत मोठ्या रस्त्यावरून धाडधाड आवाज करीत आले व कॉलनीच्या रोखाने जाताना दिसले.

ब्राटचिन्कोने लगाम माझ्या हाती दिला व खाली उतरून तो एकदम धावत तिथे गेला. त्याने ते मोठ्या शिताफीने थांबविले. काराबानोव व प्रिखोदकोव कसेबसे त्याच्यावर बसले होते. ते खाली उतरले. धापा टाकीतच त्यांनी आम्हाला काय झाले ते सांगितले. 'आमच्या आवारात आम्ही विटा लावीत होतो. इतक्यात चार-पाच माणसं हे नांगर व औत ओढून घेऊन जाताना आम्हाला दिसले. त्यांचा मनोदय आमच्या लक्षात आला. आम्ही चौघेजण होतो— काराबानोव, चोलोट, प्रिखादको व सोरोका. आम्ही त्यांना निघून जाण्यास सांगितले. ते काही ऐकायला तयार होईनात. 'तुम्ही ही जमीन नांगरू शकत नाही'. त्यातला एका जिप्सीसारख्या दिसणाऱ्या काळ्या रंगाच्या माणसाने चोबोटवर चाकू उगारला. इतक्यात बुरुन काठी घेऊन धावत येताना दिसला. मी घोड्याचा लगाम हातात घेतला तेव्हा चेअरमनने माझा शर्ट पकडला.'

'कोणता चेअरमन ?'

'तो आपला लूका सेमियानोविच. त्याला प्रिखोदखोनं चांगलाच हात दाखवला ! त्याच्या ढुंगणावर लाथ मारली. तो खाली पडला. त्याचं नाक चांगलं जमिनीत घुसलं. आम्ही तर त्या नांगरावर बसून मग गोन्चारोन्को गावातून वेगानं बाहेर पडलो. गावातली सारी पोरं ओरडत आहेत; परंतु आमचे बाकीचे तिघेजण सहकारी अजून तिथं आहेत. त्यांना लूकाच्या लोकांनी कदाचित मारहाण केली असेल !'

काराबानोव विजयानंदाने नुसता नाचत होता. प्रिखोदखोव शांतपणे सिगरेट बनवीत होता व एकीकडे हळूच हसत होता आणि मी पुढील सगळ्या परिणामांची चित्रे – चौकशी, तपासणी, उलटतपासणी वगैरे......रंगवीत होतो.

'वेड्यांनो ! तुम्ही हे भलतंच लफडं करून बसलात'. काराबानोव्ह उसळून म्हणाला, 'आन्तोन, असं कसं म्हणता ? त्यानंच प्रथम खोडी काढली आहे !'

'बरं, बरं – चला आता. आपण कॉलनीत जाऊन याच्यावर विचारविनिमय करू या !'

कॉलनीत शिरल्याबरोबर बुरुनने आमचे स्वागत केले. त्याच्या कपाळावर भलेमोठे खरचटलेले दिसत होते. बरीचशी पोरे त्याच्याभोवती जमून खिदळत होती. चोबोट व सोरोका दोघे हात धूत होते. काराबानोवने बुरुनचे खांदे धरून हालविले. तो म्हणाला, 'याला घालवून देण्याचं मस्त काम केलंत !'

'अरे, प्रथम ते नांगराच्या मागे धावायला निघाले होते. ते हातचे सुटले असं पाहिल्यावर त्यांनी आपला मोर्चा आमच्यावर वळवला ! आम्ही काय पळालो ! पण ?'

'बरं; पण आता ते कुठं आहेत ?'

'नदीच्या पलीकडे आम्हाला शिव्यागाळी करीत उभे आहेत. आम्ही आपल्या होडीत बसून पळून आलो !'

'आपली कोणी पोरं तेथे अडकली नाहीत ?'

'टोस्का व आणखी दोघेजण तिकडे अडकले आहेत; पण त्यांना हात लावायची त्यांची हिंमत नाही !'

एकी तासाभरानें लूका सेमियानोविच दोन-तीन गावकऱ्यांना घेऊन कॉलनीत आला. पोरांनी मोठ्या कौतुकाने त्यांना विचारले, 'तुमचा औत-नांगर न्यायला आलात काय ?'

माझ्या खोलीत साऱ्या पोरांनी गर्दी केली. बसायला कशीबशी जागा ठेवली होती. तो सारा प्रकार फार विचित्र होता.

लूका सेमियानोविच टेबलाजवळ बसला होता. त्यानेच प्रथम बोलायला सुरुवात केली, 'मला व माझ्या सहकाऱ्यांना मारणाऱ्या मुलांना ताबडतोब बोलवा.'

'हे पहा लूकासाहेब, तुम्हाला जर मार बसला असला तर तुम्ही कोठे वाटेल तिथं जाऊन तक्रार करा. मी माझ्या पोरांना बोलावणार नाही. आणखी तुम्हाला काय पाहिजे ते चटकन बोला व कॉलनीत यायचं तुम्हाला काय कारण आहे ते सांगा.'

'मग तुम्ही आमचं म्हणणं अमान्य करता तर ?'

'हो, मी अमान्यच करतो.'

---

# साप्ताहिक माणूस

## मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन

**( अधिनियम ४, नियम ८ अन्वये )**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : पुणे |
| २. | प्रकाशन काल | : साप्ताहिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : श्री. ग. माजगावकर<br>: १०२५ सदाशिव, पुणे ३० |
| ४. | नागरिकत्व | : भारतीय |
| ५. | प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदारांची नावे व पत्ते | : राजहंस प्रकाशन<br>: १. ब. मो. पुरंदरे १०२५ सदाशिव, पुणे ३०<br>२. श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

प्रकाशकाची सही

दिनांक ३ मार्च १९७९ श्री. ग. माजगावकर

---

'बरं, ठीक आहे. याचा निकाल आपल्याला दुसरीकडे लावावा लागेल. तुम्ही अमान्य करा.'

'ठीक आहे. बघून घेऊ.'

'आमच्या औताचं काय ? ते परत करा पाहू.'

'ते परत कुणाला द्यायचं ?'

लूकाने एकाकडे बोट केले. तो मनुष्य जरासा काळा, कुरळया केसांचा होता. त्यालाच काराबानोवने बहुधा जिप्सी म्हटले असावे.

'हे तुमचं औत आहे का ?' मी विचारले. त्यावर त्याने होय असे म्हटले.

'ठीक आहे. मी ते जिल्हा-पोलिसांच्या ताब्यात देतो. तुमचं नाव सांगा. कारण तुम्ही ते औत बेकायदेशीर आमच्या वार्डात घातलं होतंत.'

'माझं नाव ओनोप्री ग्रेच्यानी. दुसऱ्याची जमीन असं कसं तुम्ही म्हणता ? माझीच जमीन आहे ती पूर्वीपासून ती माझीच होती.'

'बरं आहे. या वादात मी आता शिरत नाही. आता आपण बेकायदेशीरपणे आमच्या कॉलनीत घुसून काम करीत असताना आमच्या मुलांना मारलंत त्याचा निकाल लावू.'

इतक्यात बुरुन पुढे आला. तो म्हणाला, 'यानंच मला बेदम मारलं बरं का !'

'हे साफ खोटं आहे. तुमचं डोकं फिरलं असलं पाहिजे. असल्या माणसाला मारून आम्ही आमचे हात विटाळणार नाही.'

या सगळया भानगडीत आम्ही जेवण-खाण साफ विसरून गेलो. झोपायला जाण्याची घंटा झाली, तरीही आम्ही गावकऱ्यांशी चर्चा करीत तिथेच बसलो होतो. चर्चेचा सूर कधी रागाचा, कधी समजुतीचा होता.

परंतु मी माझी भूमिका सोडली नाही. औत परत देण्याचे साफ नाकबूल केले. झालेल्या मारामारीचा परिणाम गावकऱ्यांच्या शरीरावर कुठेही जखमांच्या रूपाने दिसत नव्हता. उलट आमच्या मुलांच्या अंगांवरच जखमांच्या खुणा दिसत होत्या. झादारोवने या सगळया गोष्टींचा शेवट केला. त्याने टेबलावर हात आपटून छोटेसे मुद्देसूद भाषण केले. तो म्हणाला,

'हे पहा, जमीन आमची आहे आणि तुम्ही उगाच गडबड करू नका. आम्ही पन्नासजण आहोत व कसे आहोत ते तुम्ही पाहिलंच आहे.'

लूका सेमियानोविच दाढी कुरवाळीत विचार करीत होता, 'ठीक आहे. तसंच होऊ द्या; परंतु आम्ही नांगरट केली आहे, त्याच्याबद्दल तरी आम्हाला पैसे द्याल की नाही ?'

'नाही. मी ते कधीही देणार नाही.' असे मी ठासून सांगितले.

'ठीक आहे. आमचं यंत्र तरी परत कराल काय ?'

'करू; परंतु तुम्ही तसं लेखी लिहून द्या.'

'बरं आहे. आम्ही लिहून देतो.'

शेवटी एकदा त्या वर्षीच्या हिवाळयात आमच्या जमिनीत नाचणीचे बी पेरले. आम्ही आमचेच शेतीनिष्णात होतो. कालिनासाहेबांना शेतीविषयक फार थोडी माहिती होती. बाकी आम्ही सर्वजण तर अगदीच अनभिज्ञ होतो. सर्वजण मोठ्या उत्साहाने काम करीत होते. एकटा ब्रॅटचिन्को मात्र त्याच्या घोडयाचे हाल पाहून आमच्यावर चरफडत होता. तो रागाने म्हणाला,

'काय, यांना गहू पुरेसा होत नाही म्हणून नाचणी पाहिजे ?'

ऑक्टोबरपर्यंत आमची आठ बिघे जमीन हिरव्यागार पिकाने खुलली होती. कालिनासाहेब मोठ्या अभिमानाने व कौतुकाने लांबवर सर्वांना दाखवीत.

रेड व बॅंडिट दोघेजण नांगराला सतत जुंपलेले असत व झादारोव संध्याकाळी नांगरावर काम करून दमून भागून येत असे. तो कधी कधी म्हणायचा, 'नको बुवा हे शेतकीचं काम ! मी आपला परत माझ्या वर्कशॉपकडे जातो !'

आमचे काम अर्धेअधिक पुरे होत आले होते. एवढयात हिमवर्षावाला सुरुवात झाली; पण एकंदरीत सुरुवात काही वाईट झाली नाही असे आम्हाला वाटले. (क्रमशः)

---

## परराष्ट्रीय घडामोडी : पृष्ठ ७ वरून

आणि राजवट उलथल्यावर विएतनामच्या लष्करी सामर्थ्याने दिपून ही राष्ट्रे संत्रस्त झालेली होतीच, त्यात हे नवीन राष्ट्र पटावर अवतीर्ण झाले आहे.

### वाजपेयींचा पचका

या चिनी आक्रमणाचा वाजपेयी भेटीच्याच वेळी झालेला उद्रेक हा योगायोग खासच नव्हता. चीनच्या दरबारात आपली काय किंमत आहे हेच या निमित्ताने कळून आले आहे. वाजपेयींचे यशाचे तुणतुणे चालूच आहे. 'सीमाप्रश्न' आहे हे तरी चीनने कबूल केले. या गोष्टीला जर यश म्हणायचे असेल तर या हिशेबाने आणखी शंभर-दीडशे वर्षे सीमेचा नकाशा काढण्यातच जातील !

विशेषतः कंबोडियातील नव्या राजवटीला मान्यता देण्याचे मोरारजी देसाईंनी आश्वासन देऊनही सरकारने वाजपेयींच्या चीनभेटीआड ते येऊ नये याची खबरदारी म्हणून ही मान्यता दिली नाही. ह्या कृतीची चीनने दखलही घेतलेली नाही. वाजपेयींना आक्रमणाची बातमी कळली तीही टाइम्सच्या वार्ताहराकडून. दिल्लीच्या परराष्ट्रमंत्रालयातून नव्हे. या दर्जाची आपली आंतरराष्ट्रीय प्रश्नांबद्दलची जागृती ! संसदेतही 'आक्रमण' हा शब्द उच्चारायला वाजपेयींची जीभ का आढेवेढे घेत होती कोण जाणे. सरळ राष्ट्रीय अस्मितेला धक्का लावणारा हा प्रसंग असताना बोटचेपे धोरण स्वीकारण्यात अर्थ नाही. याच्यावर उपाय एकच आहे–लष्कर वाढवणे ! एकूण जागतिक शक्तींच्या रस्सीखेचीमध्ये चीनची धोकादायक भर पडली आहे याची वस्तुनिष्ठ दखल घेणे तरी किमान पक्षी अपेक्षित आहे. दुबळयाची अहिंसा आता तरी सोडणे एवढाच ती दखल घेतल्याचा पुरावा असू शकेल.

चीनने हीच वेळ हल्ल्याला का निवडावी, १९६२ च्या आक्रमणाशी या आक्रमणाची तुलना करता येईल काय हे प्रश्न पुढील लेखात पाहू. (अपूर्ण)

रंगभूमी

# काय वाट्टेल ते

## वरून प्रायोगिक, आतून पारंपरिक

उदय कला केंद्रनिर्मित, जया दडकर यांनी लिहिलेले, श्री. अरुण होर्णेकर यांनी दिग्दर्शित केलेले 'काय वाट्टेल ते' या नाटकाचे प्रयोग सध्या छबिलदासच्या रंगमंचावर सुरू आहेत.

छबिलदासच्या रंगमंचावर पडदा आणि प्रॉपर्टीशिवाय हे नाटक सादर होते तेव्हा रंगभूमीच्या रूढार्थाने त्याला प्रायोगिक म्हटले पाहिजे; परंतु प्रयोगशीलता येथे कोठेच प्रत्ययास येत नाही. खरे म्हणजे कोणत्याही क्षेत्रात जेथे जेथे पारंपारिक चाकोरी सुटते तेथे तेथे प्रायोगिकता आपोआप जन्म घेते; परंतु 'प्रायोगिक' या शब्दाचा रंगभूमीपुरता प्रयोगशीलतेशी संबंध आज उरलेला दिसत नाही. हा शब्द एका विशिष्ट शैलीने नाटके सादर करणाऱ्या संप्रदायाचा निदर्शक झाला आहे. प्रायोगिक म्हटली जाणारी बरीच नाटके पाहिल्यावर त्यांच्यात फॉर्म आणि आशय या दृष्टीने काही सामान्य लक्षणे दिसून येतात. फॉर्मच्या दृष्टीने पाहिले तर, या नाटकांना १. पडदा नाही, २. प्रॉपर्टी नाही, ३. मॉबसीन असतात, ४. पात्रे शिव्या देतात. या नाटकांचा आशय सामान्यपणे असा असतो — १. सत्तारूढ किंवा मध्यम वर्गीयांच्या स्वार्थी वृत्तीचे दर्शन, २. गरिबांच्या पिळवणुकीचे प्रदर्शन, ३. समाजातील दंभाचे दर्शन. जेथे जेथे हे आढळते ते ते प्रायोगिक संप्रदायात समाविष्ट केले जाते.

या सर्व लक्षणांनी युक्त असे 'काय वाट्टेल ते' आहे. म्हणूनच केवळ ते प्रायोगिक म्हणावयाचे. मंत्री आणि तदनुषंगिक राजकारणे, लफडी हा या फार्सचा मुख्य विषय आहे. हा विषय आजच्या काळात नाटक, चित्रपट, कथा, कादंबऱ्या, कविता सर्वत्र हाताळला गेला आहे. यामुळे एखादे उत्तम नाट्यबीज शोधण्याचा प्रयोग केल्याचे श्रेय लेखकाला दिसत नाही. अर्थात विषयात नाविन्य नाही, एवढ्यावरून काही कलाकृती कमी दर्जाची ठरत नाही. विषयाचा आविष्कार सखोल असेल तर नेहमीच्याच प्रेमत्रिकोणातून उत्तम कलाकृती निर्माण झाल्याचे अनेकदा दिसते. प्रस्तुत नाटकात आविष्काराच्या दृष्टीनेही निराशाच पदरी येते. एका सत्तालोभी मंत्र्याचे सत्ता टिकविण्यासाठी आणि सुखोपभोगासाठी चाललेले उद्योग दाखविताना इतर अनेक गोष्टी दाखविल्या आहेत. मंत्र्याच्या पी. ए. चा स्वार्थ आणि चातुर्य, 'सो कॉल्ड' साधूंचा भोंदूपणा, पत्रकार, पुढारी यांची मिंधी वृत्ती हेही दाखविले आहे. सच्चा कार्यकर्ता, त्याच्याशी कृतघ्न झालेले लोक यांचे दर्शन घडविले आहे; परंतु या सगळ्याचा रंगभूमीवरील आविष्कार तपशीलवजा आहे. आपल्याला नाटकात काय काय दाखवायचे आहे याची यादी करून तपशील भरून दिला आहे, असे मला वाटते.

याला कारणे अनेक आहेत. पहिले म्हणजे पत्रकाराची अगतिकता, पी. ए. चे चातुर्य हे सगळे नाटकातले सुटे सुटे घटक आहेत. यात एकजिनसीत्व नाही. सगळ्या घटकांचा एकजीव होऊन मुख्य आशय परिपुष्ट होणे हे घडत नाही. दुसरे म्हणजे वर्ण्य विषयात खोल शिरून लेखकाने त्याचा वेध घेतला आहे असा प्रत्यय येत नाही. तिसरे म्हणजे, कोणत्याही कलाकृतीत आशय आणि फॉर्म यांचा अतूट संबंध अपेक्षित असतो. यांचा पूर्ण मेळ बसल्याशिवाय परिपूर्ण कलाकृती खरे म्हणजे निर्माणच होत नाही. येथे हा मेळ नाही. प्रायोगिक संप्रदायाची बांधिलकी पत्करून या फॉर्ममध्ये आशय कोंबून टाकला आहे. प्रायोगिक संप्रदायाचा हा फार्म कोणता ते आधी सांगितलेच आहे. त्याशिवाय आणखी असेही म्हणता येईल की, व्यावसायिक रंगभूमीवर जे जे नाही ते काहीही येथे चालते. म्हणूनच सुरुवातीच्या नांदीत सूत्रधार पँट आणि फेटा अशा पोषाखात येतो. नटी नऊवारी पातळ आणि केसांचा बॉबकट अशी येते. तेव्हा हे असे का, असा प्रश्न पडतो. उत्तर एकच मिळते, आता आपल्याला 'काय वाट्टेल ते' पहायचे आहे. विचार करायचा नाही. पी. ए. आणि मोलकरीण यांच्या प्रवेशात दोघांच्या हालचाली कार्टूनसारख्या आहेत. मंत्री आणि बाई या प्रवेशातील हालचाली आणि शब्द संगितिकेसारखे तालबद्ध आहेत. (बाई : मला तुमची वाटते भीती. मंत्री : असे? पण मला वाटते प्रीती) या ठिकाणी आशयाच्या अभिव्यक्तीसाठी या प्रकारचा अभिनय आवश्यक आहे, असे वाटत नाही. त्यामुळे या अभिनयाला तऱ्हेवाईकपणा एवढेच नाव देता येते. अशा हालचाली आणि दृश्ये बऱ्याच ठिकाणी आहेत. मंत्री कारमध्ये बसून जातो तेव्हा चार-पाचजण मिळून उभे-आडवे होऊन कारचा आकार तयार करतात. आवाज काढतात. हे कशासाठी? केवळ एक टेक्निक दाखवायचे म्हणून. व्यावसायिक रंगभूमीवर विमानतळावरचा सर्च लाइट, आगगाडीचे दृश्य या तांत्रिकतेचे भांडवल केले जाते. तसेच ही असली तांत्रिक दृश्ये हे प्रायोगिकवाल्यांचे भांडवल आहे. या भांडवलावरच प्रायोगिक संप्रदायाचा संसार थाटलेला आहे. एका गीतात 'मंत्री शिखरी जाउनी बैसला' अशी ओळ येते. रंगमंचावर एका बाजूला तिघेजण उभे असतात. त्यातले दोघे या शब्दांबरोबर एकाला खांद्यावर उंच उचलतात. हे दृश्य कसे वाटते? गल्लाभरू चित्रपटात कधी कधी प्रतीके वापरतात. मजूर पोती वाहून नेतो आहे असे दृश्य. लगेच दुसऱ्या बाजूला ऊस चरकातून पिळला जाण्याचे दृश्य. या चालीतले 'मंत्री शिखरी जाउनी बैसला'चे दृश्य वाटते.

विडंबनाची एकच जागा अचूक साधली आहे. मंत्री म्हणतो, 'हे असे शास्त्रोक्त गाऊ नका! भऊजन समाजाला समजावं म्हणून शास्त्रीय संगीत सुगम संगीतात गा!' मंत्र्याचे मंत्रीपण कायम राहून, त्याची बौद्धिक मर्यादा विनोदाने दाखविणे येथे जमले आहे. जमेच्या बाजूला फारसे काहीच नसताना नाटक अगदीच रटाळ वाटत नाही, याचे कारण तबला-ऑर्गनच्या साथीत अधूनमधून चाललेले संगीत. फालतू चित्रपट ठेक्याच्या गाण्यामुळे सह्य होतो तसाच हा प्रकार आहे. संगीत ही काही या फार्सची प्रकृती नाही, ते आगांतुकच वाटते.

हा फार्स पाहताना सई परांजपे यांचे 'नांदा सौख्यभरे' आणि दया डोंगरे—अरुण जोगळेकर यांनी टीव्हीवर 'गजऱ्यात' सादर केलेला फिल्मी गाण्यांचा चुटका यांची आठवण होते. प्रस्तुत फार्समधाल नाट्यसंगीताचे थोडे बहुत विडंबन थेट 'नांदा सौख्यभरे' मधील नांदीच्या विडंबनासारखे आहे, पी. ए. चे प्रसंगानुरूप गाणी म्हणणे दया डोंगरे—अरुण जोगळेकर चुटक्यांसारखे वाटते.

वाद्याला संगीताची बाजू चंद्रचूड वासुदेव (योजक), सुधीर वखारे (साथ—तबला); प्रकाश वगळ (साथ—ऑर्गन), अशोक

कुळकर्णी (सूत्रधार) यांनी जबाबदारीने सांभाळली आहे. विद्या पटवर्धन, शशिकांत कारेकर, चारुशीला साबळे, अलकनंदा सार्दल, वसंत दातार, मधु आंगणे, प्रकाश जोशी, यशवंत सोनावणे, विसू कामरेकर, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रकाश पळ, रामनाथ थखल, विलास महाबळ, किशोर विजूरी, शाम कामत, प्रतिभा वाघ यांनी आपापल्या भूमिका व्यवस्थित सांभाळल्या आहेत. शशांक वैद्य यांची प्रकाशयोजनाही ठीक वाटते.

अर्थात उत्तम नाटक गवसल्यास आणि प्रायोगिक फॉर्मचा अट्टाहास सोडल्यास कलाकारांचा हा गट काही सुंदर कलानिर्मिती करण्यास समर्थ आहे असे मात्र वाटते.

**—विनया खडपेकर**

---

**मुक्काम पुणे :** पृष्ठ २ वरून

बसवतो आहोत, त्यात नवीनपणा काय आहे, त्यात लोकांना धडा द्यायचा आहे की पेलेल इतपतच द्यायचे आहे, या सगळ्याचा विचार अगदी सुरुवातीसच व्हायला हवा. एक निश्चित असा कार्यक्रम समोर ठेवून सुरुवात करायला पाहिजे.'

'रंगायन' ह्या संस्थेविषयी, तिच्या कामकाजाविषयी, ते बंद का पडले त्याची कारणे, अल्काझींच्या इन्स्टिटयूटचा आपल्याला झालेला फायदा याविषयीही त्या खूप काही बोलल्या.

व्यावसायिक रंगभूमीवरच्या पैसा, प्रसिद्धी यांसारख्या आमिषांचा प्रायोगिक रंगभूमीवर फार मोठा परिणाम होतो, ह्या मताशी त्यांनी सहमती दर्शविली. 'पाश्चात्य राष्ट्रांत ज्याप्रमाणे प्रयोगशील अशा छोटया-छोटया 'ग्रुप्स्'ना अनुदाने दिली जातात तशी सोय आपल्याकडे नाही', अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. 'आज युवकांच्यात अमाप उत्साह आहे; पण ह्या उत्साहाला ओघाचे स्वरूप येत नाही. त्यांना एकत्र आणणाऱ्या संस्था निर्माण व्हायला हव्यात', असे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले.

स्वतःविषयी काही माहिती देताना त्या म्हणाल्या, 'आज मी जे काही करते आहे त्यात 'रंगायन'चे सर्व विचार आहेत. संस्था म्हणून माझ्यातली प्रायोगिकता संपली असली तरी व्यक्ती म्हणून संपलेली नाही. गेल्या तीन वर्षांत मला माझ्या 'बिंदू'चा स्पर्श जाणवायला लागला आहे.' □

---

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# कर्मयोगी

**प्रेक्षण्ये वाधिकारस्ते मानंदेषु कदाचन।**

---

प्रत्येक चित्रपटाबरोबर 'वाईट' या विशेषणाची मर्यादारेषा अधिकाधिक खाली आणण्याचा सामुदायिक विडा हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकांनी उचलला असावा. शालिमार तुम्ही वाईट म्हणता काय? ठीक आहे, मग आम्ही असा चित्रपट काढून दाखवतो की, त्यापुढे शालिमार चांगलाच नव्हे; तर उत्कृष्ट, अत्युत्कृष्ट वाटायला पाहिजे! कर्मयोगी हा अशाच जातीचा एक चित्रपट.

नेहमीप्रमाणेच देवपार्टी व दानवपार्टी यांच्यातील संघर्षाने कथा सुरू होते. देवदानव किंवा देवी-दानव एकाच घरातील नवरा–बायको असल्यामुळे या संघर्षाला कौटुंबिक रोगणही चढले आहे. यातील देवी दुर्गा (माला सिन्हा) म्हणजे सत्त्वगुण, आदर्शवाद आणि अशुद्ध संस्कृत सुभाषिते अधिक भारतीय स्त्री (म्हणजे पातिव्रत्य, कष्ट वगैरे वगैरे) यांची पुतळी; तर तिचा नवरा शंकर (थोरले राजकुमारराव) म्हणजे अंधारगुण, खलप्रवृत्ती (यात चोऱ्यांपासून माऱ्यांपर्यंत सगळ्यांचा अंतर्भाव) आणि जडजड शब्द यांचे किटण चढलेला असद्गृहस्थ. चित्रपटाच्या सुरुवातीलाच शंकरराव आपल्या थोरल्या मुलाला–मोहनला (मोठा मोहन–सवाई राजकुमारराव) घेऊन दुर्गादेवींना सोडून आपल्या वाटेने निघून जातात. त्या वेळी दुर्गादेवी गरोदर. पुढे यथावकाश त्या प्रसूत होतात. (बाळ–बाळंतीण सुखरूप. काळजी नसावी.) आपला पिढयान् पिढया चालत आलेला देव-दानवसंघर्ष पुढे चालवायला वारस ठेवून शंकर फाशी जातो; तर दुर्गा निवृत्त होते. मग मोहन आणि अजय (जितेंद्र) या भावांमधील संघर्ष. या मुख्य संघर्षणाबरोबर मोहन व त्याचा स्मगलर सायीदार–कम स्पर्धक–केशवलाल (अजित), पत्रकार अजय व स्मगलर केशवलाल, कॅब्रे–डान्सर रेखा (रेखा) व तिची सभ्य बहीण किरण (रीना रॉय) इत्यादी बारीक बारीक उपघर्षणेही चालूच असतात. या सगळ्या घासाघिशीतून शेवटी दानवपार्टीने 'परिस्थितीमुळे आम्ही वाईट बनलो,' अशा तडजोडीवर कज्जा मिटवायचे ठरवले; पण अखेरीस दानव–पार्टीचा पूर्ण बीमोड करून देवपार्टी अश्रू ढाळायला मोकळी झाली. या सगळ्यात दुर्गाबाई मेल्यामुळे देवपार्टीचा एक मोहरा खर्ची पडला!

तर अशी ही जुनी-पुराणी, गंजलेली–रंजलेली कथा. या शिळ्या कढीला पुन्हा 'कर्मयोगी'तून ऊत आणला आहे. 'कर्मयोगी'चे दिग्दर्शक आहेत राम माहेश्वरी, संगीतकार कल्याणजी आनंदजी, गीतकार वर्मा मलिक, संवादलेखक सागर सरहदी. या सर्व लोकांच्या वैयक्तिक कामगिरीवर काही कोरडे ओढून आपल्या हाताला आणि मुख्य म्हणजे त्या चाबकाला दुःख न देता मी 'कर्मयोगी'चे संपूर्ण सामुदायिक अपश्रेय या सगळ्यांच्या व अन्य कलाकारांच्या (अपवाद फक्त आणि फक्त अजितचा.) पदरी बांधून 'कर्मयोगी'तील काही ठळक विशेष फक्त ऐकवतो.

'कर्मयोगी'त कर्मपणा, योगीपणा अन् संयुक्त कर्मयोगीपणा यासाठी पार सुरुवातीपासून भगवान कृष्ण, त्यांचा कुरुक्षेत्रावरील रथ, घोडे, अर्जुन आणि गीता यांना जे वेठीला धरले आहे ते पार (त्यांचा) शेवट होईपर्यंत! सुरुवातीला सुबक लाकडी रथावर साकारलेले हे दृश्य स्वतःभोवती गरगरत श्रेयनामावली सादर करते. मग संपूर्ण चित्रपटभर या गोष्टी पिच्छा पुरवतात. एकूणच 'कर्म ण्येवाधि कारस्तेमाफ लेषुक दाचन।' हे सूत्रवाक्य ठरल्यानंतर इराणमधील क्रांतीपासून 'आज नळाचे पाणी लौकर गेले' पर्यंतच्या सर्व घटनांमागे हेच कारण अस-

त्याचे चित्रपटभर ठासून सांगितले जाते. चित्रपटात गीतेच्या बाकी काही श्लोकांनाही हिसका दिला आहेच. उदाहरणार्थ — शेवटी दुर्गा 'वासांसि जीर्णानि...'चा एकेक भाग म्हणते आणि मोहन त्याचा अर्थ सांगतो. त्यातील दुसरी ओळ 'तथा शरीराणि विहाय जीर्णा'—इति दुर्गा, मग मोहनचा अर्थ आणि मग 'न्यन्यानि संयाति नवानि देही।' अशा रीतीने पूर्ण होते. 'जीर्णानि अन्यानि'ची ही ओढताण व धरपकड पाहून 'संधी' हा प्रकार शोधून काढणारे आमचे व्याकरणकार आणि त्याचा आपल्या गीतेत वापर करणारे वेदव्यास ढळढळा रडले असतील!

दिग्दर्शकसाहेबांनीही काही प्रसंगांमध्ये डोके चालवून मजा आणली आहे. कॉलेजचे प्राचार्य अजयचे कौतुक करताना म्हणतात, 'तुम एक देवी—जैसी माँ के बेटे हो।' यावर अजय—'Thank you.'

आता आपल्या आईच्या देवीपणाबद्दल किंवा अशा देवीच्या पोटी लाभलेल्या पुत्रपणाचा प्राचार्यांनी उल्लेख केल्यास त्यात त्यांचे आभार मानण्यासारखे काय आहे? किंवा हॉकीत एखाद्या व्यक्तीला सर्वप्रथम आणण्याचे कसबही रामभाऊंसारखा कुशल कोच कम दिग्दर्शकच करू शकतो. राजकुमारचा डब्बलरोल म्हणजे तर त्यांच्या दिग्दर्शनकौशल्याची कमाल आहे. बाप आणि मुलगा हा फरक खरे म्हणजे केशभूषा, रंगभूषा इत्यादी विविध प्रकारे दाखवता आला असता; कारण अभिनयाने तो फरक उभा करणे हे राजकुमारसारख्या अत्यंत सामान्य कुवतीच्या कलाकाराच्या वकुबाबाहेरची गोष्ट होती; पण तेथेही केसांचा जाणवेल न जाणवेल इतका करडेपणा व काळेपणा एवढा एकमेव फरक पाहण्यास मिळतो. बाकी भांगापासून मानेवरील काळ्या डागापर्यंत सर्व बाबतीत बाप=मुलगा. पडद्यावर जेव्हा एका वेळी दोघेजण दिसतात, त्या सर्व दृश्यांमध्ये रंगही अत्यंत विचित्र (गुलाबी, तांबडे आणि भडक) वापरले आहेत आणि त्या सर्व प्रसंगांचे चित्रणही तांत्रिकदृष्ट्या अत्यंत ओबडधोबड आणि भिकार केले आहे. चित्रपटाच्या शेवटाची न्यायालयीन करामत तर औद्योगिक न्यायालयांपासून आंतरराष्ट्रीय न्यायपीठांपर्यंत सगळ्यांना लाजेने मान खाली घालायला लावणारी आहे. राजकुमारने थोडेसे दरडावून विचारताच भराभर त्याला हवी तशी उत्तरे देणारे साक्षीदार फक्त अशा फिल्मी न्यायालयातच पैदा होऊ शकतात. या वेळी विनोदी प्रसंग म्हणून दाखविलेली धुमाळ व जगदीपची शाब्दिक जुगलबंदी पाहून तर मूर्तिमंत विनोदालाही हुंबरडा फोडावासा वाटेल!

संवाद हे 'कर्मयोगी'चे आणखी एक वैशिष्ट्य. एक मघाशी उल्लेख केलेल्या 'Thank you'सारखे गुळगुळीत संवाद, नाही तर एकदम 'मेरी जिंदगीका ताला बंद कर के उसकी चाबी मैं रेगिस्तान में फेंक आया हूँ, न कोई उसे खोलने की कोशिश करे या ना कोई उसे ढूंढने की।' शिवाय प्रसंग, व्यक्तिरेखा अशा फुटकळ गोष्टींकडे यत्किंचितही लक्ष न देता सागर सरहद्दींनी आपल्या उर्दू व संस्कृत दोन्हींवरील न-प्रभुत्वाचे सुरेख प्रदर्शन घडविले.

वर्मा मलिक यांनी गाणीही जरा पटापटच पाडून दिली आहेत. उदाहरणार्थ—एक गाणे आहे—कौन कौन है मेरा फॅन, हाथ उठाओ जंटलमॅन. दुसरी एक कव्वाली आहे—त्यात दोघेजण 'तेरा बाप हूँ मैं, तेरा साप हूँ मैं, तेरा माप भर दूं, तेरा काप कर दूं' असे—ताप, चाप, टाप, थाप—भराभर 'प'कार जुळवून एकमेकांना म्हणत असतात, अगदी धाप लागेपर्यंत! (वा! आपल्यावरही वर्माजींची थोडी छाप पडलेली आहे तर.)

आता 'कर्मयोगी'चा सर्वांत ठळक विशेष म्हणजे राजकुमार. त्याच्या खरखड आवाजातील साचेबद्ध संवादफेकीवर आणि तथाकथित Manly Styles वर बहुसंख्य जनता खूष असते. 'कर्मयोगी'तील त्याचे काम पाहाणे व विशेषतः ऐकणे ही मात्र एक जबरदस्त शिक्षाच आहे! त्याच्या दुहेरी भूमिकेबद्दल मघाशी लिहिलेच. अभिनय अथवा Manly Styles म्हणजे अत्यंत आक्रस्ताळेपणा, हाताच्या चमत्कारिक हालचाली असा त्याचा समज असावा. संवादफेकीतील विविधता म्हणजेही पहिला शब्द कुजबुजता, दुसरा शब्द अतिशय ओरडून, तिसरा शब्द साध्या आवाजात, चौथा शब्द प्रचंड खरखरीत आवाजात, पाचवा शब्द पुन्हा तारस्वरात असा शब्दाशब्दाला बदल अशीही राजकुमारसाहेबांची समजूत असावी. ती चुकीची आहे व ते अजूनही एक पायरी मागे आहेत, असे मला वाटते. संवादफेकीतील विविधता म्हणजे शब्दाशब्दातील बदल नसून 'अक्षराअक्षरातील बदल होय. त्यासाठी जर त्यांनी प्रयत्न केले, तर प्रेक्षकांच्या कानांवर पुरेसा अत्याचार केल्याचे सुख त्यांना लाभू शकेल. या आपल्या प्रामाणिक समजुती सोडून देऊन जेव्हा राजकुमार पडद्यावर वावरतो, तेव्हा खरोखरच त्याचे काम चांगले झाले आहे; पण अशा जागा संपूर्ण चित्रपटात हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच!

तर असा हा कर्मयोगी.

त्यापासून मी घेतलेला धडा एकच—

'चित्रपट पाहणे आपल्या हातात आहे, त्यापासून कोणत्याही प्रकारच्या आनंदाची अपेक्षा करू नये.' ❋

---

# दो लडके, दोनों कडके

## 'वाईट' नाही; पण 'चांगला'ही नाही

---

**सु**मजा,—

चार अट्टल बदमाष एका संपन्न माणसाच्या घरात त्याच्या छोट्या मुलाला पळवून नेण्यासाठी घुसले, त्यांनी त्या पोराला ताब्यातही घेतले; पण ऐन वेळी दोन भुरट्या चोरांनीच त्या पोरावर डल्ला मारला.

तर काय होईल?.

त्याचेच चित्रण बासू चटर्जींनी 'दो लडके, दोनों कडके'मध्ये केले आहे.

एकीकडे पोरगा हरवल्यामुळे त्याचे आईबाप श्री. राज मल्होत्रा व सौ. माया मल्होत्रा (नवीन निश्चल, मिठू मुकर्जी) हवालदिल, तर दुसरीकडे पोरगा न मिळाल्यामुळे बदमाषही काळजीत पडलेले. ज्यांच्या हातात पोरगा सापडला, ते भुरटे हरी (अमोल पालेकर) आणि रामू (असरानी) सुद्धा एवढा मोठा माल राखायचा कसा व पचवायचा कसा या काळजीत पडलेले. या सगळ्यातून एक घोळ आकार घेत जातो. शेवटी मुलगा आई-वापांच्या हातात सुखरूप पडून खलनिर्दालन वगैरे होणे हा शेवट डोळ्यांपुढे

ठेवूनच हा सगळा घोळ घडत असल्यामुळे शेवटी तो कसाबसा आवरसावर गुंडाळून इच्छित शेवटाचे ईप्सित साध्य केले आहे.


बासू चतर्जींनी प्रथमच ही प्रेमकथेपेक्षा वेगळ्या वळणाची, थोडीशी फार्सिकल पातळीवर व थोडीशी रहस्यमय पातळीवर राहणारी रवी घोष यांची कथा निवडली आहे. प्रत्यक्ष चित्रपटातही त्यांनी संपूर्ण कथाभागाचे सरळ सरळ तीन टप्पे केले आहेत आणि साधारणतः आपसातील रचना बदलून हे तीन टप्पे आणि त्यायोगे तीन वेगवेगळे मूडस् प्रेक्षकांपुढे येतील अशी पटकथेची रचना केली आहे. राज व माया पोलिसांच्या मदतीने घेत असलेला मुलाचा शोध आणि त्याला परत मिळविण्यासाठी करीत असलेले प्रयत्न हा संपूर्ण भाग भावनाप्रधान, गंभीर तणावपूर्ण राहतो. रणजित आणि त्याच्या इतर बदमाष साथीदारांचे मुलगा ताब्यात घेण्यासाठी चालू असलेले प्रयत्न हा भाग रहस्यमय अपेक्षित आहे, तर त्या पोराला लपविण्याचे,त्याच्या नावावर त्याच्या वडिलांकडून पैसे लुबाडण्याचे हरी व रामूचे प्रयत्न, मुलाला शोधून देणारास बक्षीस जाहीर झाल्यानंतर त्याच्यामागे चाललेली धावपळ हा भाग बराचसा फार्सिकल आहे. चित्रपटाचा शेवट वगळता हे तीन मूडस् परस्परात फारसे घुसणार नाहीत, अशी पटकथेची बंदिस्त रचनाही बासूदांनी केली आहे. प्रत्यक्षात मात्र, कदाचित त्यांच्या वैयक्तिक स्वभावामुळे, आवडीमुळे वा कौशल्यामुळे असेल; पण चित्रपटातील फार्सिकल भाग जेवढा दाद घेऊन जातो, तितक्या प्रमाणात गंभीर वा रहस्यमय भाग रंगत नाहीत. एखाद्या प्रसंगामधील भावनिक तणाव बासूदांनी जितक्या चांगल्या प्रकारे टिपले आहेत (उदा. रजनीगंधा) तितक्या प्रमाणात घटनांमुळे निर्माण झालेले ताण त्यांना पकडता आले नाहीत, हेही चित्रपटातील असे ताण असलेले प्रसंग न रंगण्याचे एक कारण आहे. प्रत्यक्ष प्रसंगामध्येही छापील व रूढ तंत्रे सांभाळण्याच्या नादात त्या प्रसंगांचे मूडस् वाहून जातात– उदाहरणार्थ रजनीश व त्याचे साथीदार विनीला पळवून न्यायला येतात, त्या वेळी अंधारे वातावरण, बंगल्यातील सामसूम, प्रसंगात रहस्यमय (म्हणजे कर्कश) पार्श्वसंगीत असल्या रूढ गोष्टी त्यांनी पुरवल्या; पण त्याच वेळी रणजितचा चालू असलेला भडक व उथळ आरडाओरडा आणि खलनायकी संपूर्ण प्रसंगाचा चोथा करून टाकतात. याउलट हरी व रामूचे अत्यंत होतकरू फोन व त्यांनी विनीच्या आई-बापांना पैसे देण्याबद्दल दिलेल्या विनोदी सूचना, 'अलीबाबा व ४० चोर' थाटाचा घरावर खडूने खूण करण्याचा प्रसंग इत्यादी प्रसंग त्यातील बारकाव्यांसकट बासूदांनी सुरेख रंगविले आहेत. निळू फुले व प्रेमा नारायणचे किंवा केश्तो मुकर्जींचे सर्व प्रसंग हीही अशीच उदाहरणे; पण हे प्रसंग बऱ्यापैकी रंगत असतानाच न रंगणारे प्रसंग चित्रपट फारच खाली आणतात. त्यामुळेच संपूर्ण चित्रपट 'वाईट' या विशेषणापासून बचावला असला तरी 'चांगला' या विशेषणाच्या पंखाखाली जाऊ शकत नाही.

संपूर्ण चित्रपटात असरानीचे काम म्हणजे अफलातून धमाल. उडाणटप्पू पण मनाने अतिशय चांगला, प्रेमळ असा भुरटा, आवारा पाकीटमार असरानीने भन्नाट उभा केला आहे. बाकी अमोल पालेकर, मौशमी चटर्जी आणि प्रेमा नारायण यांच्या भूमिकाही सुरेख झाल्या आहेत. 'तुम्हारी कसम' पासून नवीन निश्चलला दुय्यम नायकाच्या भूमिका चांगल्याच भावल्या आहेत. आणखी एक विशेष उल्लेख करावासा वाटतो तो निळू फुल्यांचा. किंचित मराठी छाप असलेले बोलणे वगळता सतत लॉटरीमागे लागणारा चाळकरी त्यांनी शेवटी लॉटरी लागल्यानंतरच्या जेवणाच्या प्रसंगापर्यंत सुरेख उभा केला. या चित्रपटाद्वारे त्यांनी हिंदी चित्रसृष्टीत प्रवेश केला आहे.

चित्रपटाचे संगीतकार हेमंतकुमार व गीतकार योगेश. आशा भोसलेंचे 'चंदा के डोले में थी अेक परियों की रानी' हे गाणे अतिशय सुरेख. येसूदासचे 'किसे खबर, कहाँ डगर जीवन की ले जाये' हे गाणे ठीक. हेमंतकुमारनी पार्श्वसंगीत मात्र अत्यंत ढोबळ, कर्कश व कामचलाऊ दिले आहे. अपवाद फक्त मधून मधून वापरलेल्या बुलबुलच्या तुकड्यांचा.

बासूदांनी आपल्या प्रदर्शित चित्रांची संख्या कमी करून त्यांचा दर्जा 'रजनीगंधा' वा 'छोटीसी बात' च्या दर्जापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला, तरी ते प्रेक्षकांना चालण्यासारखे आहे.

□




लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये

## मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

## अन्याय्य दरवाढ

केंद्रीय रेल्वेमंत्री श्री. मधु दंडवते यांनी नव्या वर्षाचा रेल्वेअर्थसंकल्प सादर करताना उपनगरी रेल्वे-प्रवाशांच्या सीझन तिकिटांच्या दरात सुचविलेली प्रचंड दरवाढ अन्याय्य स्वरूपाची आहे. या दरवाढीचे जे समर्थन रेल्वेच्या सूत्रांकडून केले जाते ते तर्कशून्य आणि म्हणूनच न पटणारे आहे.

या दरवाढीचा फटका रंकांपासून रावांपर्यंत तमाम मुंबईकरांना बसणार आहे. रेल्वेतील पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाचे सीझन तिकिटांचे दर या संकल्पित दरवाढीमुळे जवळजवळ १०० टक्के वाढविण्यात आले आहेत. कल्याणहून बोरीबंदरपर्यंतचे मासिक सीझन तिकीट सध्या सोळा रुपयांच्या आसपास आहे. नव्या दरानुसार ते पस्तीस रुपयांपर्यंत जाईल

उपनगरी रेल्वे प्रवासाच्या सीझन तिकिटात गेल्या दहा वर्षात दरवाढ करण्यात आलेली नाही, या एकाच ठळक मुद्द्यावर रेल्वेचे अधिकारी या संकल्पित दरवाढीचे समर्थन करीत आहेत.

१९६८ नंतर अद्यापपर्यंत एकदाही दरवाढ करण्यात आलेली नाही हे जरी खरे असले तरी १०० टक्के दरवाढीचे त्यामुळे समर्थन होऊ शकत नाही व त्यामागे दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे दहा वर्षांत लोकलवाहतुकीत अशी कोणती सुधारणा झाली आहे की, त्यामुळे जनतेने ही दरवाढ निमूटपणे सोसावी? आणि मुख्य म्हणजे तमाम मध्यमवर्गीयांना मासिक सीझन तिकिटासाठी एकदम दुप्पट रक्कम खर्च करण्यास सांगणे हे कोणत्या तर्कशास्त्रात बसते?

रेल्वेची ही दरवाढ रेल्वेने आपली कार्यक्षमता वाढविली असती तर एवढ्या लोकक्षोभाला कारण न ठरती विशेषत मध्य रेल्वेच्या लोकल वाहतुकीबाबत प्रवासी विशेष नाराज आहेत गेल्या सहा सात महिन्यांत प्रक्षुब्ध प्रवाशांनी व्ही. टी स्टेशनवर दोन वेळा दंगल माजविली हे या क्षोभाचेच प्रत्यंतर. दंगल माजविणाऱ्या व दगडफेक करणाऱ्या प्रवाशांचे समर्थन कोणीच करू नये; पण लोकांना दगडफेक करायला काय लागतं? अशी बेफिकीर पृच्छा करून मिटवावी अशी ही समस्या नाही. मुंबईचे लोक वस्तुतः खूपच सहनशील आहेत. ऐन संध्याकाळी, प्रवाशांची प्रचंड गर्दी असताना, घरी जाऊन पोहोचण्याची उत्सुकता असताना, एखादी रुसलेली लोकल शीव आणि कुर्ला किंवा मुलुंड आणि ठाणे अशा दोन स्थानकांच्या दरम्यान पंधरा-वीस मिनिटे निश्चलपणे उभी राहते तेव्हा मुठी आवळीत बसण्यापलीकडे घामेजलेले, श्रमलेले मुंबईकर काहीच करू शकत नाहीत, करीत नाहीत. व्ही. टी. स्टेशनवर अनेकदा, एकदा 'गन्तव्यस्थान' जाहीर झालेली लोकल बदलण्यात येते आणि मग एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जाण्यास प्रवाशांना जी यातायात करावी लागते त्यातले कष्ट केवळ मुंबईकरच जाणोत.

मध्य रेल्वेवर लोकल वाहतुकीसाठी सध्या दोन मार्ग राखीव आहेत. या मार्गांवरून थेट गाड्या वा मालगाड्या जात नाहीत. निदान या मंदगती मार्गावरून तरी दर तीन मिनिटाला एक लोकल सोडणे मध्य रेल्वेला कठीण का वाटावे? ठाणे, कल्याण येथील प्रवाशांच्या सोयीसाठी संध्याकाळच्या वेळी दादरहून गाड्या सोडण्यात याव्यात ही एक अत्यंत विधायक सूचना गेली अनेक वर्षे अनेक जण करीत आहेत. लोकल गाड्यांच्या टंचाईमुळे हे करता येत नाही असे उत्तर या संदर्भात दिले जाते यावर तोडगा म्हणून काहींनी दिव्याहून सुटणारी दिवा-पनवेल लोकल दादर-पनवेल अशी सोडावी अशी सूचना केली होती व ती सकृतदर्शनी तरी व्यवहार्य वाटते.

गाड्यांचे एक सोडा, गाड्या वाढविणे ही मध्य रेल्वेसाठी एक सनातन समस्या आहे व मध्य रेल्वेवर थेट गाड्यांची संख्या प्रचंड असल्याने येणारा ताण लक्षात घेता ती समस्या काही प्रमाणात तरी समजण्यासारखी आहे; पण साधे आणि अत्यंत आवश्यक असे इलेक्ट्रिक इंडिकेटर्स, निदान महत्त्वाच्या स्थानकांवर तरी, बसविणे मध्य रेल्वेला कठीण आहे का? दादरसारख्या प्रचंड गर्दीच्या मध्यवर्ती स्थानकावरही इंडिकेटर्स नसावेत हे आश्चर्यकारकच आहे. मध्यंतरी याच ठिकाणी क्लोज सर्किट टी. व्ही. बसविण्यात आले होते, त्यामागे कोणती कल्पकता होती ते एक मध्य रेल्वेच जाणे! सध्या हे टी. व्ही. सेटस् देखील अदृश्य झाले आहेत.

या आणि अशा अगणित तक्रारी गेली अनेक वर्षे प्रवासी करीत आहेत आणि मध्य रेल्वे नेहमीप्रमाणे त्याकडे दुर्लक्षही करीत आहे. मुंबईतील लोकलप्रवास आज केवळ असह्यच नव्हे, तर असुरक्षितही झाला आहे. मोठ्या प्रमाणावर 'हस्तकलाकारां'चा सुळसुळाट झाल्यामुळे मुंबईतील, विशेषतः नवागतांवर, अनेकदा बरेच काही गमावण्याची पाळी येते. मध्य रेल्वे यासाठी काय करीत आहे?

रेल्वेच्या या संकल्पित दरवाढीविरुद्ध जनता खासदार श्रीमती मृणाल गोरे पदर खोचून पुढे सरसावल्या आहेत त्यांच्या आधीच नगरसेविका श्रीमती इंदुमती पटेल यांनी निदर्शने करून लक्ष वेधून घेतले आहे. दरवाढीला लोकांचा विरोध हा असतोच व या तथ्यावर सर्वच राजकीय पक्ष आपली पोळी भाजून घेणार आहेत अडचण झाली आहे ती जनता पक्षाची! गेल्या तिन्ही निवडणुकांत अवघी मुंबई जनता पक्षाच्या पाठीमागे उभी राहिली होती. या पाठीराख्यांच्या पाठीत जनता पक्षाने खंजीर खुपसला इ इ आरोप करण्याची ही संधी विरोधी पक्ष सोडणार नाहीत. फार काय, पण शिवसेनेसारखा पक्ष 'मुंबई बंद'सारखा एखादा आदेश द्यायला मागे पुढे पाहणार नाही! 'ही दरवाढ कायम राहणार नाही. दंडवतेसाहेब ती थोडी तरी कमी करतील', अशी आशा जनता पक्षाच्या अनेक सहानुभूतीदारांना वाटत आहे. तशी ती कमी झालीच तर त्याचे श्रेय विरोधी पक्ष नक्कीच घेतील. दंडवतेसाहेबांनी याचाही विचार केला आहे का? □

## एका शाळेची 'पुण्यतिथी'

मुंबईतला हुतात्मा चौक म्हणजे विविध क्षेत्रांतील चळवळ्या लोकांचे तीर्थक्षेत्र आहे. आपल्यावर झालेला अन्याय वेशीवर टांगण्यासाठी धरणे धरण्याची किंवा उपोषण करण्याची एक हक्काची

जागा म्हणजे हुतात्मा चौक. काही वर्षांपूर्वी या चौकात कुठल्याही छोटया-मोठया प्रश्नावरून आंदोलन करणाऱ्यांचे मंडप चटकन नजरेत भरत असत. आज मात्र आजूबाजूला लावून ठेवलेल्या मोटारींचा वेढाच या चौकाला असतो आणि त्याच्या आड असलेली आंदोलनाची राहुटी फारच क्वचित एखाद्याच्या लक्षात येते.

सध्या या चौकात ताडदेवच्या सध्या बंद पडलेल्या व्हिक्टोरिया अंधशाळेचे आजी व माजी विद्यार्थी आपली शाळा सुरू व्हावी यासाठी चक्री उपोषणास बसले आहेत.

७ फेब्रुवारी १९७८ पासून ही शाळा बंद आहे ती आजतागयत ! ह्या सत्त्याहत्तर वर्षांच्या जुन्या शाळेला स्वतःची इमारत आहे आणि बऱ्यापैकी ब्रेल ग्रंथसंग्रह असलेली लायब्ररीही आहे. अशा सोयी सुविधा असलेली आणि खास अंधांसाठी अशी महाराष्ट्रातील ही एकमेव अंध–शिक्षणसंस्था आहे. या शाळेचा वार्षिक खर्च सुमारे तीन लाखांच्या जवळपास आहे.

गेल्या वर्षी ही शाळा बंद पडण्यामागे विद्यार्थ्यांचे बेशिस्त वर्तन, शाळेच्या प्राचार्य श्रीमती मेहेर आर्य यांनी विद्यार्थ्यांवर लादलेली जाचक बंधने आणि शाळेचा वारंवार बिघडत चाललेला कारभार इ. कारणे आहेत असे सांगण्यात येते. विद्यार्थी शाळेच्या वाद्यवृंदातील वाद्ये कधीही व कोणत्याही वेळी वाजविण्यास घेऊन जातात, वाचनालयातील पुस्तकांना नीट हाताळत नाहीत, छोटया छोटया कारणांवरून हे विद्यार्थी आंदोलने, उपोषणे इ०चा मार्ग अवलंबितात, एवंच विद्यार्थी बेशिस्त होत चालले आहेत असे शाळेच्या संचालकांचे म्हणणे आहे. याउलट श्रीमती आर्या ह्यांची हुकूमशाही शाळेत सुरू आहे, शाळेत आरोग्यव्यवस्था अत्यंत निकृष्ट दर्जाची आहे, विद्यार्थ्यांच्या भोजनगृहाजवळच उघडी गटारे आहेत, अनेक खोल्यांतील छपरे गळतात पण दुरुस्ती केली जात नाही, एखाद्या विद्यार्थ्याचे पालक गंभीर आजारी असतील किंवा एखाद्याच्या घर्मातील मोठा सण असेल, अशा कोणत्याही महत्त्वाच्या कारणासाठी प्राचार्यबाई विद्यार्थ्यांना घरी जाऊ देत नाहीत, अनेक लहानसहान चुकांसाठी त्या विद्यार्थ्यांना शाळेतून काढून टाकतात इ० तक्रारी या शाळेतील विद्यार्थ्यांच्या आहेत.

विद्यार्थ्यांनी आपल्या काही मागण्यांसाठी उपोषण सुरू केले आणि या तात्कालिक कारणांवरून संचालकांनी शाळेचे कामकाज संपूर्णतः थांबविले.

ह्या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, लहानसहान कारणांवरून निर्माण झालेले मतभेद दूर न झाल्यामुळे विद्यार्थी व संचालकांतील वाद चिघळत गेला व त्याची परिणती शाळा बंद पाडण्यात झाली. शाळा बंद पडण्याचे खापर कोणाही एकावर फोडणे अन्यायाचे ठरेल !

ही शाळा सुरू व्हावी व शासनाने तिथे एक प्रशासक नियुक्त करावा यासाठी या शाळेचे आजी व माजी विद्यार्थी गेल्या एप्रिलपासून सतत प्रयत्नरत आहेत. तत्कालीन विरोधी पक्षनेते श्री. उत्तमराव पाटील प्रभृतींनी या प्रश्नात लक्ष घातले होते. विधानसभेत त्यांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना तत्कालीन समाजकल्याणमंत्र्यांनी ही शाळा जून १९७८ मध्ये सुरू होईल, असे सरकारी छाप उत्तरही दिले होते. श्री. उत्तमराव पाटील सध्या मंत्री आहेत आणि जून १९७९ जवळ येऊन ठेपला आहे; परंतु अद्यापही शाळा सुरू होण्याची चिन्हे नाहीत.

या संबंधात या शाळेच्या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला; पण तो असफल ठरला. अन्य अनेक मंत्र्यांसमोर त्यांनी गाऱ्हाणे मांडले आहे; पण अद्याप त्याचा परिणाम होत नाही हे लक्षात घेऊन त्यांनी महिनाभराचे चक्री उपोषण सुरू केले आहे. गेल्या सात फेब्रुवारीस ही शाळा बंद पडून एक वर्ष झाले. त्या दिवशी ह्या असहाय्य अंध विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेची 'पुण्यतिथी' असल्याचे जाहीर करून चक्री उपोषण सुरू केले.

हे आजी-माजी विद्यार्थी नॅशनल फेडरेशन ऑफ द ब्लाइंड या संघटनेचे सदस्य आहेत. श्री. विजय मर्चंट यांच्या पुढाकाराने निघालेली नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड ही संघटना स्वतंत्र आहे. ह्या दोन्ही संस्थांच्या नावांतील फरक लक्षात घेतला पाहिजे. पहिली संघटना खुद्द अंधजनांचीच आहे, दुसरी त्यांच्या हितचिंतकांची !

ह्या विद्यार्थ्यांनी शाळा सुरू व्हावी यासाठी फारसे प्रयत्न करू नयेत अशी श्री. विजय मर्चंट प्रभृतींची भूमिका आहे. एका विद्यार्थ्याच्या सांगण्यानुसार 'आम्ही तुमच्यासाठी भीक मागत आहोत, तुम्ही स्वतःहून कशाला प्रयत्न करता ?' असा श्री. मर्चंट यांचा सवाल आहे; परंतु विद्यार्थ्यांना हे पटत नाही ! आमच्या उद्धारासाठी आम्हीच प्रयत्न केले पाहिजेत, अन्यथा आम्ही आणखी अपंग बनू अशी विद्यार्थ्यांची भूमिका आहे.

ही समस्या बरीच गुंतागुंतीची आहे. तिचा व्यावहारिक नव्हे तर नेहमीपेक्षा वेगळया पद्धतीने विचार केला पाहिजे. कितीही जटिल समस्या असली तरी शाळा बंद ठेवणे (व तीही इतका काळ) हा त्यावर उपाय ठरू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या चुका नसतीलच असे नाही; पण एरवी साध्या (अपंग नसलेल्या) विद्यार्थ्यांसाठीसुद्धा क्षमेचे धोरण अवलंबिले जाते, मग अंध विद्यार्थ्यांचा तर अधिक सहानुभूतीने विचार करायला हवा ! मानसिकदृष्टया कोणताही अपंग अधिक संवेदनशील असतो हे काय अंधशाळेच्या प्राचार्यांना सांगायला हवे ? हे विद्यार्थी चुकीच्या मार्गाने जात आहेत व राजकीय नेत्यांच्या हातातले बाहुले बनण्याची शक्यता आहे असे शाळेच्या संचालकांना वाटते; पण विद्यार्थ्यांवर आंदोलनाची वेळ का आली ? सामंजस्याने हा प्रश्न सुटावा असे प्रयत्न अन्य कुणा मध्यस्थाने, सरकारने, का करू नयेत ? या अंध विद्यार्थ्यांची शिक्षणाची दोन वर्षे वाया गेली, याची जबाबदारी कुणावर ?

हे सारे प्रश्न मनात येण्याचे कारण ज्या मानवतेच्या दृष्टीने ह्या प्रश्नाचा विचार होणे अनिवार्य होते ती दृष्टी दुर्दैवाने कुठेच दिसत नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या चुका समजावून सांगून सलोखा निर्माण करण्याचे प्रयत्न फारसे झालेले नाहीत. हे विद्यार्थी स्वतःच्या हक्कांबद्दल नको इतके जागृत आहेत असे काहींचे म्हणणे आहे, तर 'आम्ही स्वाभिमानी आहोत व अपंगाने स्वाभिमानी असू नये असेच इतरांना वाटते', अशी या विद्यार्थ्यांची तक्रार आहे.

काहीही असो, मोठमोठे प्रश्न चुटकीसरशी सुटतात, मग शेसव्वाशे अंधांच्या भवितव्याशी निगडित असा हा प्रश्न, दोषी कोण याला महत्त्व न देता, सोडविण्यास इतका वेळ का लागावा ? की To err is human, to forgive is divine हे आपण फक्त पाठ करून थांबणार आहोत ? □